१९९२
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. १०९३



# ब्रिटनचा पोलादी पुरुष

REFBK-0012431

वोरा अॅण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.
मुंबई २

ब्रिटनचा पोलादी पुरुष ८४

# सर विन्स्टन
# चर्चिल

देसाई

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र. 72539

मूल्य दोन रुपये

REFBK-0012431

कुमार साहित्य माला

वोरा अॅण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि., मुंबई २

श्री : ४०३ [ १२–६२ ]

●

© १९६२
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रायव्हेट लि.

●

आवृत्ति पहिली
शके १८८४
सन १९६२

●

कुमार साहित्य माला : ८४

●

मूल्य : रु. २–००



प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्राय. लि. करितां
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

●

मुद्रक :
अ. चिं. रायरीकर
स्वस्तिक मुद्रणालय
४२९ शनिवार पेठ,
पुणें २

या पुस्तकाबरोबरच वाचावयाचीं
कुमार साहित्य मालेंतील
हीं कांहीं तशींच पुस्तकें

●●●●●●●●●●●●●●●●●●●●●●●●●

**चरित्रें :**

● हेन्री फोर्ड ● अब्राहम लिंकन ● राइट बंधु ● पै-पैशानें कुबेरपद (वूलवर्थ) ● दिगंताचा दर्यासारंग (दक्षिण ध्रुववीर बर्ड) ● वुड्रो विल्सन

**कादंबऱ्या :**

● राखेंतील निखारे ● अंधारवड ● प्रवाळाच्या बेटांवर ● वाघजईच्या जंगलांत ● अस्मत ● छोटा सरदार ● दोन शिलेदार ● गुलाबाचें युद्ध ● हिमविश्व ● शाळेची वाट ● दर्यालाल ● कोसॅक ! कोसॅक ! ● गुलब्या ● प्रत्यंचा

**इतिहास :**

● पुण्यपथ पानिपत ● पहिलें महायुद्ध ● दुसरें महायुद्ध ● महाराष्ट्र-इतिहास-दर्शन

**साहसें :**

● कोनटिकी ● पहिली अखंड भरारी ● विश्वाच्या कळसावर ● दक्षिण ध्रुवाचीं क्षितिजें ● गगनचुंबन

आणखी कितीतरी …

भारताचे संरक्षणमंत्री
नामदार यशवंतराव चव्हाण
यांस
सादर समर्पण

# विन्स्टन चर्चिल

१. बालपण
२. लष्करांत
३. हिंदुस्थान
४. मालकंद मोहीम
५. तिराची मोहीम
६. सुडानची मोहीम
७. दक्षिण आफ्रिकन युद्ध
८. कारावास
९. इंग्लंडला परत
१०. मंत्रीपद
११. पहिलें महायुद्ध
१२. पुन्हां पार्लमेंटमध्यें
१३. पराभवांतून विजयाकडे
१४. इंग्लंडचे पंतप्रधान
१५. विजय
१६. निवृत्ति
परिशिष्ट : महत्त्वाचीं भाषणें

## प्रकरण पहिले

## बालपण

92837

सर विन्स्टन चर्चिल ह्यांचा जन्म इंग्लंडमधील मार्लबरो ह्या नांवाच्या इतिहासप्रसिद्ध उमराव घराण्यांत ता. ३० नोव्हेंबर १८७४ रोजीं झाला. त्यांचे आजोबा ड्यूक ऑफ मार्लबरो ह्यांची पंतप्रधान डिस्राएली ह्यांनीं १८७६ सालीं आयर्लंडचे व्हाइसरॉय म्हणून नेमणूक केली होती. चर्चिलचे वडील लॉर्ड रँडॉल्फ चर्चिल हे ड्यूक ऑफ मार्लबरो ह्यांचे सेक्रेटरी होते. चर्चिलचे वडील व्हाइसरॉयच्या राजवाड्यापासून जवळच राहत असत. त्यांच्या निवासस्थानाला झोपडी हें नांव होतें. चर्चिलचीं बालपणांतील तीन वर्षें डब्लिन शहरांत गेलीं. एक कुशाग्रबुद्धीचे मुत्सद्दी आणि राजकारणपटु म्हणून सर विन्स्टन चर्चिल हे आज प्रसिद्ध आहेत. अशा बुद्धीचे लोक जगांत क्वचितच जन्मास येतात. चर्चिलची गणना महाकवि गटे, टॉल्स्टॉय् वगैरे तैलबुद्धीच्या महापुरुषांत केली तर अतिशयोक्ति होणार नाहीं. त्यांनीं आपल्या बालपणींच्या ज्या आठवणी प्रसिद्ध केल्या आहेत त्यांवरून त्यांच्या असामान्य बुद्धिमत्तेची प्रचीति येते.

बहुतेक सर्व खानदानी लोकांप्रमाणें चर्चिलचें प्राथमिक शिक्षण घरांतच एका खासगी शिक्षिकेच्या हाताखालीं झालें. त्या शिक्षिकेचें नांव मिसेस एव्हेरेस्ट असें होतें ती जरी चर्चिलना करड्या शिस्तींत वागवीत असली, तरी चर्चिलचें तिच्यावर अपरंपार प्रेम होतें. आपल्या आत्मचरित्रांत त्यांनीं तिचा आदरपूर्वक उल्लेख केला आहे.

चर्चिलची आई एका धनाढ्य अमेरिकन गृहस्थाची मुलगी होती. ती अप्रतिम सुंदर होती. एका मेळाव्यामध्यें चर्चिलचे वडील लॉर्ड रँडॉल्फ

ह्यांचा आणि तिचा परिचय झाला. त्या परिचयाची परिणति प्रेमांत होऊन तीं दोघें अखेर विवाहबद्ध झालीं. बाल विन्स्टनला आपली लावण्यवती आई एखाद्या अद्‌भुतरम्य कहाणींतील राजकन्येसारखी वाटे. तिची तुलना चर्चिलनीं रात्रीच्या वेळीं आकाशांत चमकणाऱ्या एखाद्या देदिप्यमान चांदणीशीं केली आहे.

१८८० सालीं ग्लॅडस्टननें हुजूर पक्षाचा पराभव केल्यानें चर्चिलचे आजोबा ड्यूक ऑफ मार्लबरो ह्यांना आयर्लंडच्या व्हाईसरॉयपदास मुकावें लागलें. वास्तविक त्या अधिकारासाठीं ते तेवढे आसुमलेले नव्हते. केवळ लॉर्ड डिस्राएली ह्यांच्या भिडेस्तव त्यांनीं ती जागा अंगीकारली होती. व्हाईसरॉय म्हणून त्यांना जो तनखा मिळे, तो मेजवान्यांतच खर्चून जाई. त्यांच्या वाड्यामध्यें आयर्लंडमधील श्रीमंत लोकांसाठीं वरचेवर मेजवान्या झडत असत. चर्चिलच्या आईनें स्वतःला मानवतावादी कार्याला वाहून घेतलें होतें. तिनें अवर्षणानें पीडलेल्या आयरिश शेतकऱ्यांसाठीं एक निधि उभारला होता. पण ह्या थोर कार्याचें आणि ड्यूक ऑफ मार्लबरो त्यांच्या उदार राज्यकारभाराचें चीज झालें नाहीं, आयरिश लोकांनीं त्याबद्दल कधींच कृतज्ञता दाखविली नाहीं, अशी सर विन्स्टन चर्चिल ह्यांनीं आपल्या आत्मचरित्रामध्यें तक्रार केली आहे. आयर्लंडहून इंग्लंडला परतल्यानंतर ड्यूक ऑफ मार्लबरो फार दिवस जगले नाहींत. लवकरच त्यांचें निधन झालें.

वयाच्या सातव्या वर्षापर्यंत चर्चिलचें शिक्षण घरींच झालें. तदनंतर मात्र त्यांना शाळेंत घालण्यांत आलें. त्यांची शाळा त्यांच्या गांवापासून बरीच लांब होती. तेथें ते राहावयाला गेले. आपलें घर सोडून त्या शाळेंत राहावयास जातांना त्यांना मनस्वी दुःख झालें. परंतु त्याला नाइलाज होता. त्यांच्यासारख्या श्रीमंत लोकांचीं मुलें शिक्षणासाठीं वसतीगृहांतच राहत असत. ज्या शाळेंत त्यांनीं प्रवेश केला ती शाळा ईटनच्या धर्तीची होती. ईटनप्रमाणेंच त्या शाळेंतहि मुलांना उत्कृष्ट शिक्षण मिळे. दर वर्गांत अवघे दहा विद्यार्थी असत. त्यामुळें मुलांचें शिक्षण चांगलें होई. त्या वेळीं इंग्लंडमध्यें विजेचा प्रसार सर्वत्र झालेला नव्हता. फारच थोड्या ठिकाणीं

विजेचे दिवे होते. त्यांत चर्चिलच्या शाळेचा अंतर्भाव होत होता. वीज ही एक आश्चर्याची गोष्ट म्हणून त्या वेळीं समजली जाई. फुटबॉल आणि क्रिकेट हे दोन्ही मर्दानी खेळहि मुलांना तेथें शिकविले जात. तसेंच दर तीन महिन्यांनीं मुलांना सहलीस नेण्यांत येई. ती शाळा जरी प्रथम श्रेणींतील असली तरी चर्चिलना ती मुळीच आवडली नाहीं. त्यांचा स्वभाव जरा वात्रट आणि विचक्षण असल्यानें शिक्षकांचा आणि त्यांचा वरचेवर खटका उडे. शिक्षकांना त्यांचा जिज्ञासूपणा आवडत नसे व त्यामुळें ते त्यांच्या रोषास पात्र होत. चर्चिलना ती शाळा न आवडण्याचें आणखी एक कारण म्हणजे 'मुलांना तेथें शारीरिक शिक्षा होत असे' हें होय. एखाद्या मुलाच्या हातून अपराध घडला असल्यास त्याला एका खोलीमध्यें नेऊन अंगावर वळ उठेपर्यंत चोप देण्यांत येई. त्याचा आक्रोश ऐकून इतर मुलें भयभीत होऊन चुपचाप होत.

त्या भयंकर शाळेंत चर्चिलनीं दोन वर्षें काढलीं. तिच्याविषयीं त्यांनीं आपल्या आत्मचरित्रांत किंवा अन्यत्र एकदांहि चांगले शब्द लिहिलेले नाहींत. तिथें त्यांचें शिक्षण चांगलें झालें नाहीं तें नाहींच, पण खेळांमध्यें-देखील ते फारशी प्रगति करूं शकले नाहींत. मात्र त्यांच्यामध्यें वाचनाची आवड निर्माण झाली. वयाच्या नवव्या वर्षी आपण ट्रेझर आयलंड ही कादंबरी वाचली असें त्यांनीं आपल्या आत्मचरित्रांत एके ठिकाणीं म्हटलें आहे. त्यांच्या शिक्षकांच्या मतें ते बुद्धीनें सामान्य होते. त्यांना जरी वाचनाची आवड असली आणि त्यांच्या वयाच्या इतर मुलांच्या मानानें त्यांचें वाचन जरी अधिक झालें असलें तरी त्यांचे शिक्षक त्याची दखल घेत नसत. त्यांच्या दृष्टीनें तो एक वायां गेलेला मुलगा होता.

त्या काळीं शालेय अभ्यासांत लॅटिन भाषेला मोठें महत्त्व होतें. पण चर्चि-लना लॅटिन भाषा येत नसे. त्यांनीं सुरवातीलाच त्या भाषेची दहशत घेतली होती. पुढेंदेखील त्या भाषेंत ते प्रगति करूं शकले नाहींत.

ज्या शाळेंत चर्चिल शिकत असत तिचें नांव 'सेंट जेम्स' असें होतें. त्या शाळेविषयीं त्यांना कधींच आपुलकी वाटली नाहीं तिथून कधीं एकदा आपण दुसऱ्या शाळेंत जातों असें त्यांना होई. पण दुसऱ्या शाळेंत जाणें हें त्यांच्या हातांत नव्हतें. तें त्यांच्या आईबापाच्या इच्छेवर अवलंबून होतें.

अकस्मात् एके दिवशीं ते आजारी पडले. त्यांच्या आईबापांनीं त्यांना घरीं नेले त्यानंतर ते सेंट जेम्समध्यें पुन: गेले नाहींत. १८८३ सालीं त्यांना दुसऱ्या एका शाळेंत घालण्यांत आलें. ती शाळा दोन महिला चालवीत असत. सेंट जेम्सहून ती शाळा जरी लहान असली, तरी तिथलें वातावरण चांगलें होतें. विशेषेंकरून तिथला शिक्षकवर्ग प्रेमळ होता. ती शाळा चर्चिलना फार आवडली. तेथें ते तीन वर्षें होते. त्यांचा तो काळ मोठा आनंदाचा गेला.

वयाच्या तेराव्या वर्षापर्यन्त चर्चिलना कधीं परीक्षेला बसावें लागलें नव्हतें, पण आतां बसावें लागलें. त्यापुढें सतत सात वर्षेंपर्यंत त्यांना परीक्षेला बसण्याचें दिव्य करावें लागलें. अभ्यासांत त्यांची विशेष प्रगति होत नसल्यानें परीक्षेची त्यांना धास्ती वाटायची. त्यांच्या मनांत लॅटिन भाषा शिकण्याचें नव्हतें, कारण ती भाषा त्यांना कठिण वाटत असे. परंतु त्या काळीं त्या भाषेला फार मोठें महत्त्व असल्यानें त्यांच्या शिक्षकांनीं त्यांना ती भाषा शिकण्यास भाग पाडलें. लॅटिन भाषेप्रमाणेंच गणिताचा विषयहि त्या वेळीं महत्त्वाचा होता आणि याहि विषयाचा चर्चिलना लॅटिनप्रमाणें तिट-कारा वाटत असे. त्यांना लॅटिन भाषेचा सक्तीनें अभ्यास करावा लागला, त्याचें कारण हें कीं, त्यांना ‘ हॅरो ’ मध्यें जावयाचें होतें.

पण त्या शाळेंत प्रवेश मिळविण्यासाठीं ज्या प्रवेशपरीक्षेला बसावें लागे, तिला लॅटिन भाषेचा विषय सक्तीचा होता. शेवटीं लॅटिन भाषेचा अभ्यास करूनदेखील त्यांना प्रवेशपरीक्षेंत लॅटिनची प्रश्नपत्रिका सोडवितां आली नाहीं. त्यांनीं ती कोरीच दिली. लॅटिनमध्यें नापास झाल्यानें हॅरोमध्यें आपणांस प्रवेश मिळणार नाहीं असें चर्चिलना वाटत होतें. पण हॅरोचे प्राचार्य मि. वेल्डन ह्यांच्यामध्यें तारतम्य बुद्धि असल्यानें त्यांनीं चर्चिलचे बरेच विषय कच्चे असूनदेखील हॅरोमध्यें त्यांना प्रवेश दिला. त्या यशाविषयीं लिहितांना मि. चर्चिल आपल्या आत्मचरित्रांत म्हणतात कीं, आपल्या सुदैवामुळेंच केवळ आपणांला त्या प्रख्यात शाळेंत प्रवेश मिळाला. परंतु त्यांच्या सुदैवामुळेंच जरी त्यांना हॅरोमध्यें प्रवेश मिळाला असला, तरी त्या शाळेंत ते कधींच चमकले नाहींत. ते नेहमींच मागें असावयाचे. त्यांचे वडील

मोठ्या अधिकारावर असल्यानें आणि इंग्लंडमधील एका इतिहासप्रसिद्ध थोर घराण्यामधून ते आले असल्यानें. वर्गामध्यें त्यांचा क्रमांक पुष्कळच खालीं असलेला पाहून त्यांच्या वडिलांच्या इष्टमित्रांना फार वाईट वाटे.

तासांना बुट्टी मारण्यांतहि चर्चिल निष्णात होते. सतत एक वर्षपर्यंत त्यांनीं तसें केलें. परंतु आपल्या वेळेचा त्यांनीं कधीं दुरुपयोग केला नाहीं. ज्या वेळीं हुशार विद्यार्थी ग्रीक आणि लॅटिन भाषांचा अभ्यास करीत, तेव्हां चर्चिल इंग्रजीचा अभ्यास करीत असत. हॅरोमध्यें मि समरवेल ह्या नांवाचे एक शिक्षक होते. ते इंग्रजी शिकवीत असत. ते स्वभावानें प्रेमळ असल्यानें चर्चिलसारख्या अभ्यासांत मागें असलेल्या विद्यार्थ्यांना ते सहानुभूतीनें शिकवीत. चर्चिलना मि. समरवेल ह्यांचा इंग्रजीचा अभ्यास करण्याच्या कामीं फार मोठा उपयोग झाला. आपल्या आत्मचरित्रांत त्यांनीं ह्या प्रेमळ शिक्षकाचा आदरपूर्वक उल्लेख केला आहे.

मि. चर्चिल हॅरोमध्यें असतांना नंतरच्या काळांत थोर पदास चढलेले अनेक लोक त्या शाळेंत शिकत होते. ह्या लोकांमध्यें एका काळचे भारतमंत्री मि. अमेरी हे एक होते. त्यांचा आणि चर्चिलचा परिचय मोठा विचित्र परिस्थितींत झाला. मागें सांगितलेंच आहे कीं, चर्चिल हे बालपणांत स्वभावानें जरा व्रात्य होते. हॅरोमध्यें पोहण्याचा एक उत्कृष्ट तलाव होता. त्या तलावांत मुलें पोहण्याचा सराव करीत असत. एके दिवशीं बरीच मुलें पोहोण्यासाठीं तलावाच्या कांठावर गोळा झालीं होतीं त्यांत चर्चिल हेहि होते. त्यांच्या जवळच टर्किश टॉवेल पांघरलेला एक बुटका मुलगा तलावाच्या कांठावर उभा होता त्यांना वाटलें कीं, तो मुलगा लहान असल्यानें आपलें कांहीं करूं शकणार नाहीं. म्हणून त्यांनीं मागचा पुढचा यत्किंचितहि विचार न करतां त्या मुलास एकदम पाण्यांत ढकलून दिलें. तो मुलगा पोहण्याच्या कलेंत चांगलाच निष्णात असल्यानें लगेच वर आला. चर्चिलच्या खोडकर-पणामुळें त्याचा चेहरा क्रोधानें लालबुंद झाला होता त्यानें चर्चिलना एकदम उचललें व पाण्यांत फेकून दिलें. तो बुटका मुलगा इतका ताकदवान निघालेला पाहून चर्चिलना मोठें आश्चर्य वाटलें व त्याची त्यांना भीतिहि पण वाटली. ते पोहून वर आले व त्या मुलापाशी जाऊन आपल्या हातून

घडलेल्या अविचाराबद्दल त्यांनीं त्याची क्षमा मागितली. चर्चिलचा तो वात्रटपणा पाहून इतर मुलेंहि चपापलीं होतीं. त्यांच्याकडून त्यांना कळलें कीं, तो बुटका मुलगा दुसरा तिसरा कोणी नसून हॅरोच्या एका पोहण्याच्या संघाचा नायक अमेरी हा होता. अमेरीनीं चर्चिलना क्षमा केली हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. अमेरी चर्चिलहून तीन वर्षांनीं मोठें होते. त्यावेळीं चर्चिलना हॅरोमध्यें येऊन नुकताच एक महिना झाला होता. पुढें ते दोघे राजकारणांत पडले तेव्हां हुजूरपक्षीय मंत्रिमंडळांत एकमेकांचे सहकारी बनले.

चर्चिल अभ्यासांत मागें असले तरी, पाठांतरामध्यें ते सर्वांच्या पुढें होते. त्याबद्दल त्यांना पारितोषिकहि मिळालें होते. नंतर लश्करी महाविद्यालयांत प्रवेश मिळण्यासाठी त्यांना त्याचा उपयोग झाला. त्यांच्याहून पुष्कळ हुशार असलेल्या विद्यार्थ्यांना लश्करी महाविद्यालयात प्रवेश मिळूं शकला नाहीं. चर्चिलच्या आयुष्यांत चढ-उतार फार झालेला आहे. पण नशिबानें त्यांना नेहमींच हात दिला. सँढर्स्टच्या लश्करी महाविद्यालयांत त्यांना केवळ त्यांच्या सुदैवामुळेंच प्रवेश मिळाला. त्यांनीं तें आपल्या आत्मचरित्रांत मान्य केलें आहे.

सँढर्स्टमध्यें प्रवेश मिळविण्यासाठीं जी परीक्षा द्यावी लागत असे, तींत, एका देशाचा नकाशा काढावा लागे. चर्चिलनीं कांहीं देशांच्या नांवांच्या चिठ्या आपल्या हॅटमध्यें टाकून देवाचें नांव घेऊन त्यांतील एक चिठी काढली. ती न्यू-झीलंडची निघाली. दैवावर हवाला टाकून त्यांनीं न्यूझीलंड देशाचा अभ्यास केला. दुसऱ्या दिवशीं जेव्हां भूगोलाची प्रश्न-पत्रिका त्यांच्या हातांत पडली, तेव्हां तींत न्यूझीलंडचें नांव होतें. चर्चिलनीं तो 'पेपर' चांगला सोडविल्यानें त्यांना परीक्षेंत वरची श्रेणी मिळाली व त्यामुळें सँढर्स्टमध्यें त्यांना प्रवेश मिळाला.

चर्चिलना बालपणांत युद्धाची मोठी आवड होती. त्यांच्यापाशीं शिशाचे १५०० सैनिक होते. ते सर्व इंग्लिश होते. त्या शिपायांची त्यांनीं एक तुकडी बनविली होती. शत्रुतुकडीचें नेतृत्व त्यांनीं आपला भाऊ जॅक ह्याच्याकडे सोंपविले होतें. एके दिवशीं त्यांचे वडील मि. रँडॉल्फ चर्चिल हे त्यांच्या

सैन्याच्या रचनेची पाहणी करण्यासाठीं आले. त्यांनीं तब्बल वीस मिनिटें त्या सैन्याच्या बनावाचें निरीक्षण केलें. त्यांच्या चर्येवर समाधानाचें स्मित झळकलें व त्यांनीं चर्चिलना त्यांची लश्करांत जाण्याची इच्छा आहे का म्हणून विचारलें. चर्चिलनीं होय म्हणून सांगितलें. रँडॉल्फ चर्चिल ह्यांना आपल्या मुलामध्यें खरोखर लश्करी गुण आढळले होते; व म्हणून त्यांनीं त्याला तुझी लश्करांत जाण्याची इच्छा आहे का म्हणून प्रश्न केला होता. त्यांच्या मनांत प्रथम चर्चिलना बॅरिस्टर करायचे होतें. पण त्यांच्या अंगीं लश्करी गुण आढळल्यानें त्यांनी तो विचार बदलला.

सँढर्स्टच्या लश्करी महाविद्यालयांत चर्चिलचे दिवस चांगले गेले. त्यांना आतां लॅटिन, गणित आणि फ्रेंच हे नावडते विषय शिकण्याची जरुरी नव्हती. त्यांच्या अभ्यासक्रमांत वेगळ्याच विषयांचा अंतर्भाव झालेला होता. लश्करी डावपेंच, तटबंदी, स्थानिक भूगोल (Topography), कायदा आणि लश्करी व्यवस्था हे त्यांच्या अभ्यासक्रमांतील महत्त्वाचे विषय होते. त्याशिवाय कवायत, व्यायाम, आणि घोड्यावर बसणें, हे तीन व्यवहारी विषय होते. इतर खेळहि होते. पण ते खेळणें न खेळणें हें प्रत्येक कॅडेटच्या इच्छेवर अवलंबून असे.

कॉलेजमधली शिक्षा फार कडक होती. अभ्यास आणि कवायत फार वेळ करावी लागल्यानें मुलें फार थकून जात. लश्करी डावपेंच आणि तटबदी हे चर्चिलचे आवडते विषय होते व त्या विषयांवर त्यांनीं जादा ग्रंथ मागवून घेऊन त्यांचा खास अभ्यास केला होता. व्यवहारी शिक्षणामध्यें तटबंद्या उभारणें, आडोसे बांधणें, वाळूच्या पोत्यांची संरक्षक फळी रचणें, लांकडी मेढेकोट बांधणें, सुरुंग पेरणें, लोहमार्ग सुरुंगांनीं उडवून देणें, झाडें टाकून छोटेछोटे पूल बांधणें, वगैरे गोष्टींचा अंतर्भाव होत असे.

हें शिक्षण अर्थातच प्राथमिक होतें. चर्चिलना पुष्कळ वेळां त्यांच्या हेडक्वार्टरवरून खान्याचीं आमंत्रणें येत. हेडक्वार्टर त्यांच्या कॉलेजपासून एका किलो मीटरच्या अंतरावर होतें. तेथें लश्कराच्या हायकमांडमध्यें काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना शिक्षण देण्यांत येई. ते शिक्षण कनिष्ठ अधिकाऱ्यांच्या शिक्षणाहून वेगळें होतें हें सांगण्याची जरुरी नाहीं. चर्चिलना

घोडदौड करणें फार आवडे. त्यांच्या वडिलांनीं तें लक्षांत घेऊन रॉयल मौंटेड गार्डस्‌च्या ठाण्यावर त्यांची घोड्यावर बसण्याच्या अभ्यासाची खास व्यवस्था केली होती. पुढेंदेखील त्यांचा घोडदौड करण्याचा नाद सुटला नाहीं. उत्कृष्ट घोडे भाड्यानें घेऊन ते घोडदौड करीत. त्या नादापायीं त्यांचा पुष्कळ पैसा खर्च झाला.

चर्चिलनीं सँढर्स्टमध्यें प्रवेश केल्यापासून त्यांच्या दर्जामध्येंहि वाढ झाली. त्यांचे वडील लॉर्ड रँडॉल्फ चर्चिल हे त्यांना आपल्याबरोबर घेऊन आपल्या इष्टमित्रांकडे व आपल्या पक्षांतील पुढाऱ्यांकडे जात. लॉर्ड रँडॉल्फ चर्चिल हे एक कामसू आणि उत्साही गृहस्थ होते. कामाशिवाय त्यांना क्षणभर-देखील चैन पडत नसे. हुजूर पक्षांतील ते एक चांगले पुढारी होते. त्यांच्या शब्दाला त्यांचे सहकारी मान देत. ते वरचेवर व्याख्यानांचे दौरे काढीत. त्यांच्या ह्या राजकीय कार्याचा त्यांच्या प्रकृतीवर प्रतिकूल परिणाम झाल्यावांचून राहिला नाहीं. त्यांना विश्रांति घेण्याचा सल्ला देण्यांत आला होता; पण त्यांनीं तो मानला नाहीं. १८९४ सालच्या वसंत ऋतूंत ते अकस्मात् आजारी पडले. पण आजारांतून उठल्यावर जगपर्यटनास निघाले! चर्चिल आणि त्याचीं भावंडें त्यांना निरोप देण्यासाठीं स्टेशनवर गेलीं होतीं. चर्चिलची आणि त्यांच्या वडिलांची ती शेवटचीच भेट ठरली. तदनंतर ते दोघे एकमेकांना कधीं भेटले नाहींत.

शेवटीं एकदांचें चर्चिलचें सँढर्स्टमधील शिक्षण संपलें. त्या लश्करी महाविद्यालयांत त्यांना मोठ्या मुश्किलीनें प्रवेश मिळाला होता. त्या वेळीं त्यांचा क्रमांक शेवटचा होता. पण त्या विद्यालयांतून शिक्षणक्रम संपवून बाहेर पडतांना त्यांना प्रशस्तिपत्रांसह आठवा क्रमांक मिळाला. त्यांच्या गटामध्यें एकूण १५० कॅडेटस् होते, त्यांत चर्चिल आठवे आले सँढर्स्टमध्यें चर्चिलना करड्या शिस्तींत वागावें लागलें. त्यांच्या आयुष्यांतील तो एक महत्त्वाचा कालखंड होता. त्या शिस्तीचा त्यांना त्यांच्या पुढच्या जीवनांत उपयोग झाला.

१८९४ सालच्या डिसेंबर महिन्यांत चर्चिल घरीं परतले. त्यांना लश्करा-मध्यें अधिकाराची जागा मिळण्याचें निश्चित झालें होतें. संढर्स्टमध्यें त्यांनीं अनेक मित्र जोडले होते. त्यांतील आतां फारच थोडे जिवंत असावेत.

बरेचजण बोअर युद्धांत आणि उरलेले १९१४ सालच्या महायुद्धांत कामास आले. त्या सगळ्यांना चर्चिलनीं आपल्या आत्मचरित्रांत श्रद्धांजलि वाहिली आहे.

चर्चिलना नेहमीच दैवानें हात दिला आहे. दैवाच्या कृपाप्रसादाशिवाय ते आज एवढ्या थोर पदास चढले नसते. त्यांनीं आपल्या आत्मचरित्रांत दैवाविषयीं कृतज्ञता व्यक्त केली आहे. ते म्हणतात–

" ज्या वेळीं मी माझ्या आयुष्यांतील गतस्मृतींना उजाळा देतों, तेव्हां मी दैवाचे आभार मानल्याशिवाय राहत नाहीं. त्याची जर माझ्यावर कृपादृष्टि झाली नसती तर आज मला हे दिवस दिसले नसते. माझ्या आयुष्यांतील सर्व दिवस चांगले गेले आहेत, आणि त्यांतील पुढचा दिवस आदल्या दिवसाहून चांगला गेला आहे. माझें आयुष्य चढ-उतारांनीं व संकटांनीं भरलेलें आहे. पण त्यांतून मी नेहमीच सुखरूप बाहेर पडलों आहें. मी नेहमींच आशावादी होतों आणि आजदेखील आहें." नंतर ते जगांतील सर्व तरुणांना उद्देशून म्हणतात –

" जगांतील तरुणांनो ! महायुद्धामध्यें कामास आलेल्या लोकांची जागा भरून काढण्यासाठीं तुम्ही पुढें आलें पाहिजे. तुम्ही तुमचा एकहि क्षण वायां दवडतां कामा नये. तुमच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठीं तुम्ही तत्पर राहिलें पाहिजे. कारण तो तुमचा वारसाहक्क आहे. तुमचा झेंडा तुम्ही निधड्या छातीनें वर फडकवून पुढें चला. शत्रूची भीति मनांत बाळगूं नका. शत्रूवर तुम्ही बेधडक तुटून पडा. कारण, त्याचा नाश करणें हें तुमचें पवित्र कर्तव्य आहे. पराभवानें खचून जाऊं नका आणि विजयानें हुरळून जाऊं नका. लोकप्रियतेला बळी पडूं नका. मनानें नेहमींच निष्कपट आणि उदार असा. हे गुण ज्याच्या अंगीं असतात त्यांना जगामध्यें नेहमींच मोठा मान असतो. अशा माणसांच्या हातून होणाऱ्या प्रमादांकडे जग दुर्लक्ष करतें. जगाची प्रगति नेहमीं सद्‌गुणी आणि महत्त्वाकांक्षी माणसांनीं केली आहे. त्यांच्यासारखेंच आपणालाहि व्हायचें आहे हें तुम्ही विसरूं नका."

★★★★★★

## प्रकरण दुसरें

# लश्करांत

मागच्या प्रकरणांत सांगितलेंच आहे कीं, चर्चिलचे वडील लॉर्ड रँडॉल्फ चर्चिल हे पृथ्वीपर्यटनास गेले होते. पृथ्वीपर्यटन करून आल्यावर लगेच ते निधन पावले. चर्चिलची आणि त्यांची भेट झाली नाहीं. लॉर्ड रँडॉल्फ चर्चिल मरण पावले त्या रात्रीं चर्चिलना ती बातमी कळविण्यांत आली. मृत्यूपूर्वी त्यांच्या वडिलांची स्मृति गेली होती व ते कुणालाच ओळखूं शकत नव्हते. तथापि मृत्यूसमयीं त्यांना कोणत्याच प्रकारच्या यातना झाल्या नाहींत. त्यांना शांतपणें मृत्यु आला.

चर्चिल आणि त्यांचे वडील ह्या दोघांचे एकमेकांशीं संबंध मैत्रीचे होते. आपल्या वडिलांना पार्लमेंटमध्यें मदत करण्यास जाण्याचा त्यांचा बेत होता. पण तो बेत अमूर्तच राहिला. आतां त्यांना फक्त एकच गोष्ट करतां येण्यासारखी होती आणि ती म्हणजे वडिलांचें अर्धवट राहिलेलें कार्य पुढें चालू ठेवून त्यांच्या आत्म्यास समाधान मिळवून देणें. पण तें कार्य ते ताबडतोब हातीं घेऊं शकत नव्हते.

लॉर्ड रँडॉल्फ पृथ्वीपर्यटनास निघाले, तेव्हां चर्चिल लश्करी महाविद्यालयांतून बाहेर पडले होते व लश्करांत हुद्दा मिळण्याची वाट पाहात होते. जगप्रवासाहून परत आल्यावर आपलें वजन खर्चून एका चांगल्या पलटणीमध्यें त्यांना जागा मिळवून देण्याचा लॉर्ड रँडॉल्फ ह्यांचा बेत होता. पण तें काम त्यांच्या आगमनापूर्वीच त्यांच्या पत्नीनें म्हणजे चर्चिलच्या आईनें कर्नल ब्राबाझाँ ह्या नांवाच्या अधिकाऱ्यामार्फत केलें. कर्नल ब्राबाझाँ हे चर्चिल घराण्याचे मित्र होते व चौथ्या हुस्सार रेजिमेंटचे सेनापति होते. चर्चिलच्या आयुष्यांत ह्या अधिकाऱ्यानें महत्त्वाची भूमिका पार पाडली.

वडिलांच्या मृत्यूनंतर चर्चिलना त्यांच्या आईनें कशाचीच उणीव भासूं दिली नाहीं, इतकेंच नव्हे तर त्यांच्या वडिलांची जागा तिनें भरून काढली.

ती त्यांना मदत करण्यास सदैव तत्पर असे. तिचें वय फारसें नव्हतें ती अवघी चाळीस वर्षांची होती. ती जन्मजात सुंदर असल्यानें प्रौढ वयांत प्रवेश करूनदेखील पूर्वीसारखीच सुंदर वाटत होती. मुलगा आणि आई हें नातें विसरून जाऊन ती चर्चिलना बहिणीप्रमाणें मदत करायची. त्या दोघांमधील तें नातें तिच्या मृत्यूपर्यंत टिकलें.

१८९५ सालच्या मार्च महिन्यांत चर्चिलची नेमणूक चौथ्या हुस्सार रेजिमेंटमध्यें झाली. ती नेमणूक अर्थातच अधिकृत होती. पण तत्पूर्वी सहा आठवडे ते त्या रेजिमेंटमध्यें काम करीत होते. त्या नेमणुकीनंतर लगेच चर्चिलना त्यांच्या रेजिमेंटच्या शिक्षकाच्या हाताखालीं करड्या शिस्तीचे धडे घ्यावे लागले. लश्करी महाविद्यालयांत असतांना त्यांनीं अश्वारोहण कलेचा खास अभ्यास केला होता, व त्या कलेंत आपण पारगत असल्याची त्यांची समजूत होती. पण चौथ्या हुस्सार रेजिमेंटमध्यें गेल्यावर ती समजूत फोल ठरली. त्या रेजिमेटमधील सैनिकाचें घोडदौडीचें शिक्षण त्यांच्या शिक्षणाहून पुष्कळच अधिक होतें. त्या काळी रेजिमेंटमधील नवीन अधिकाऱ्यांना साध्या सैनिकांबरोबर सहा महिनेपर्यंत एकत्र शिक्षण घ्यावें लागत असे. त्या चालीप्रमाणें चर्चिलना तें शिक्षण घ्यावें लागलें.

चर्चिलना बालपणापासून धाडसांचें मोठें आकर्षण वाटत असे. त्यांचीं खेळणीदेखील लढाईचीं असत. त्यांनीं शिशाचे सुमारें दीड हजार शिपाई गोळा केले होते व त्यांची लढाईची रचना करण्यांत त्यांचा दिवसांतील बराच वेळ जात असे, हें मागें आलेंच आहे. युद्धांत प्रत्यक्ष भाग घेऊन पराक्रम गाजविण्याची त्यांची फार मोठी इच्छा होती. पण त्या वेळीं ब्रिटिश साम्राज्यांत कुठेंच युद्ध चालू नव्हतें. सगळीकडे शांतता होती. अफगाण-युद्ध समाप्त झालें होतें. व इजिप्त अथवा सुदानमध्येंहि बंडाळी चालू नव्हती. हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीवरील टोळीवालेहि स्वस्थ होते. त्यामुळें चर्चिलना त्यांच्या युद्धकलेची चुणूक दाखविण्यास संधि मिळेना. तथापि ब्रिटिश साम्राज्य म्हणजे सबंध जग नव्हतें. जग अफाट होतें व त्याच्या कुठल्या ना कुठल्या कोपऱ्यांत अशांतता चालू होती. क्यूबा हा एक असा देश होता की, एकोणिसाव्या शतकाअखेर तेथें स्पॅनिश राज्यकर्ते आणि तिथले वसाहतवाले ह्यांच्यामध्ये संघर्ष उडून त्याची परिणति युद्धामध्यें झाली होती.

सर्व जगाचें लक्ष त्या बेटावर केंद्रित झालें होतें. स्पेननें तिथलें बंड मोडून काढण्यासाठीं सैन्य पाठविण्याचा सपाटा सुरू केला होता. स्पेनचा प्रख्यात सेनापति मार्शल मार्तिनेझ द कांपुश ह्याची त्या कामगिरीवर नेमणूक झाली होती.

चर्चिलनी एकदम क्यूबाला जाण्याचा बेत केला. त्यांच्या लश्करी वर्षाची विभागणी दोन कालावधींमध्यें होत होती. पहिला कालावधि उन्हाळ्याचा होता व तो सात महिन्यांचा होता. दुसरा पांच महिन्यांचा होता व तो हिवाळ्याचा होता. त्या कालावधीमध्यें प्रत्येक अधिकाऱ्याला कमीत कमी अडीच महिन्यांची अखंड रजा मिळत असे. चर्चिलनीं त्या रजेचा उपयोग क्यूबामध्यें धाडसाच्या शोधार्थ जाण्यासाठीं करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या रेजिमेंटच्या कर्नलनेंहि चर्चिलना क्यूबास जाण्यास परवानगी दिली. कारण ते तिकडे अनुभव घेण्यासाठीं जात होते. लश्करी अधिकाऱ्याला युद्धाचा मिळेल तितका अनुभव थोडाच होता. परंतु क्यूबाला जाणें ही प्रवासास जाण्याइतकी सोपी गोष्ट नव्हती. त्यासाठीं स्पॅनिश सरकारची परवानगी लागत होती व ती परवानगी सहजासहजीं मिळत नव्हती. त्या वेळीं स्पेनमध्यें सर हेन्री वुल्फ ह्या नांवाचे जे गृहस्थ इंग्लंडचे वकील होते, ते चर्चिलच्या वडिलांचे मित्र होते. चर्चिलनीं लगेच त्यांना पत्र पाठवून आपणांस क्यूबास जाण्यास स्पॅनिश सरकारची परवानगी मिळवून देण्याची विनंती केली. सर हेन्री ह्यांचें स्पेनच्या दरबारांत मोठें वजन असल्यानें चर्चिलना क्युबाला जाण्यास स्पॅनिश सरकारची परवानगी मिळवून देण्यास त्यांना विशेष सायास पडले नाहींत. इतकेंच नव्हे तर क्यूबा बेटाचे स्पॅनिश कॅप्टन जनरल मार्शल मार्तिनेझ द कांपुश हे बाहु पसरून त्यांचें स्वागत करतील असेंहि सर हेन्री ह्यांनीं चर्चिलना कळविलें.

१८९५ सालच्या नोव्हेंबर महिन्यांत चर्चिल क्यूबाला जाण्यासाठीं न्यूयॉर्कच्या बोटीवर चढले. ज्या वेळी चर्चिलना क्यूबा बेटाचें दर्शन झालें, तेव्हां त्यांना ‘ ट्रेझर आयलंड ’ मध्यें आल्यासारखें वाटलें. तें बेट फारच नयनमनोहर होतें. स्पॅनिश लोक त्याला ‘ आंतील ’ बेटसमूहांतील ‘ मोतीं ’ म्हणून संबोधीत असत त्या बेटाची हवा समशीतोष्ण असून पाऊसहि विपुल

होता. त्या सुंदर बेटावर पाऊल टाकल्यावर आपल्या पूर्वजांना तें बेट कसें गवसलें नाहीं ह्याचें चर्चिलना नवल वाटलें.

क्यूबाची राजधानी हवाना शहरहि चर्चिलना फार आवडलें. ते आणि त्यांच्याबरोबरचे त्यांचे इतर सोबती हवाना शहरांतील एका चांगल्या हॉटेल-मध्यें उतरले. त्यांनी जेवणावर यथेच्छ हात मारला, पुष्कळ चिरुटें ओढलीं आणि पोटभर मोसंबी खाल्ली. शेवटीं ज्या अधिकाऱ्याला पासपोर्ट आणि इतर कागदपत्र सादर करायचे होतें ते त्यांनीं केले. इंग्लंड आणि स्पेन ह्या दोन्ही देशांचे एकमेकांशीं मैत्रीचे संबंध असल्यानें व चर्चिल हे स्पेनच्या बाजूनें लढण्यासाठीं क्यूबांत आले असल्याचा स्पॅनिश अधिकाऱ्यांचा समज झाल्यानें त्यांनीं त्यांचें चांगलें स्वागत केलें. कॅप्टन जनरल मार्तिनेझ हे संरक्षक फळीची आणि तटबंदीची पाहणी करण्याच्या गडबडींत होते. पण त्यांनीं वेळांत वेळ काढून चर्चिल आणि त्यांचे सोबती ह्यांची विचार-पूस केली.

मार्शल मार्तिनेझ द कांपुश ह्यांचा मुख्य तळ त्या वेळीं सांता क्लारा ह्या नांवाच्या गांवीं होता. चर्चिल आणि त्यांचे सोबती गाडीनें त्या शहरीं रवाना झाले. त्यांचा प्रवास सुखाचा झाला. आगगाडी चिलखती होती व शिवाय सशस्त्र पहारेकऱ्यांचें तिला संरक्षण होतें. बंडवाल्यांनी गोळीबार केल्यास गाडींतील लोकांनीं खालीं पडायचें होतें.

मार्शल मार्तिनेझ द कांपुश ह्यांनीं चर्चिल व त्यांचे सोबती ह्यांना मुलाखत देऊन त्यांच्या दिमतीला आपल्या हेडक्वार्टर्सवरील एक बडा अधिकारी दिला. ड्यूक ऑफ तेतुआन ह्या नांवाच्या स्पेनमधील एका उमरावाचा तो मुलगा होता. त्याचा हुद्दा मेजरचा होता. त्याला इंग्रजी भाषा चांगली अवगत होती. त्यानें चर्चिल व त्यांचे सोबती ह्यांना सांगितलें कीं, त्यांची प्रत्यक्ष लढाई बघण्याची इच्छा असल्यास त्यांना एका फिरत्या लश्करी तुकडींत सामील व्हावें लागेल. अशी एक फिरती लश्करी तुकडी दुसऱ्या दिवशीं सकाळीं 'इश्पिरितु सांतु' ह्या नांवाच्या शहराकडे निघत होती. त्या शहराला बंडखोरांनीं वेढा दिला होता व वेढ्यांत सांपडलेल्या लोकांची मुक्तता करण्यासाठीं म्हणून ती तुकडी निघत होती.

जनरल व्हाल्देज ह्या नांवाचा अधिकारी त्या तुकडीचा नेता होता. चर्चिलनीं त्या तुकडींत सामील होण्याचा मनोदय प्रकट केला.

पण एक स्पॅनिश अधिकारी म्हणाला कीं, सगळीकडे गनीम असल्यानें असा प्रवास करणें धोक्याचें आहे. शेवटीं चर्चिलनीं आगगाडीनें सिएन फुएगुस ह्या नांवाच्या शहरापर्यंत जाऊन तिथून जलमार्गें तून ह्या नांवाच्या बंदरांत उतरून व्हाल्देजच्या तुकडीला मिळण्याचा बेत केला. इश्पिरितु सांतु हें क्युबांतील तिसरें मोठें शहर होतें खरें, परंतु त्या शहराची आरोग्यविषयक स्थिति मुळींच चांगली नव्हती. पीतज्वरानें त्या शहरांत कहर केला होता. चर्चिल आणि त्यांचे सोबती त्या रात्रीं एका खानावळींत मुक्कामास राहिले. दुसऱ्या दिवशीं जनरल व्हाल्देज हे तेथें आपल्या तुकडीसह येऊन पोहोंचले, चर्चिलनीं लगेच जनरलसाहेबांची भेट घेण्याचें ठरविलें व ते त्यांच्या हेडक्वार्टर्सवर येऊन दाखल झाले. तत्पूर्वीं जनरलना चर्चिल त्यांच्या भेटीस येणार असल्याची तार पाठविण्यांत आली असल्यानें त्यांनीं त्यांचें चांगलें स्वागत केलें. इंग्लंडसारख्या स्पेनच्या मित्रराष्ट्राचे दोन प्रतिनिधि आपल्या सैन्याबरोबर असल्याबद्दल त्यांनीं आनंद व्यक्त केला.

जनरल व्हाल्देज ह्यांनी आपला मुक्काम हलविला व पुढें चाल करण्यास सुरवात केली. तो प्रवास दीर्घ असाच होता, पण लढाईचीं चिन्हें कुठेंच दिसत नव्हतीं. ता. २९ नोव्हेंबरला जनरल व्हाल्देज ह्यांनीं आररोयु ब्लांकु ह्या नांवाच्या तटबंदीच्या खेड्यांत मुक्काम केला. त्यांनीं आपल्या तुकडींतील अर्धेअधिक सैन्य पुढें रवाना केलें व ते एक हजार सातशें सैनिकांसह मागें राहिले. त्या सैन्यासह शत्रूशीं लढाई देण्याचा त्यांच्या बेत होता. ३० नोव्हेंबरला चर्चिलना विसावें वर्ष लागत होतें. त्या दिवशी त्यांना क्यूबा बेटांत पाऊल टाकल्यापासून पहिल्या प्रथमच गोळीबार ऐकू आला. त्या दिवशीं जनरल व्हाल्देज ह्यांनीं शत्रूचा पाठलाग करण्यासाठीं पुढें कूच करण्याचें ठरविलें होतें, पण तत्पूर्वीच गनिमांनीं त्यांच्या सैन्यावर पिछाडीच्या बाजूनें दोन मीटर्सच्या अंतरावरून गोळीबार सुरू केला. सगळीकडे धुराचें गडद आवरण पसरलें होतें. तें दृश्य अत्यंत परिणामकारक होतें. पण चर्चिल सुरक्षित ठिकाणीं असल्यानें निर्धास्त होते. शेवटीं बऱ्याच

वेळानें धुराचें आवरण वितळून गेलें. त्याबरोबर जनरल व्हाल्देज ह्यांनीं आपल्या सैन्याला बंडखोरांचा पाठलाग करण्याचा हुकूम केला.

एका घनदाट अरण्यांतून ते चालले असतां एके ठिकाणीं त्यांनीं थोडा वेळ न्याहारीसाठीं मुक्काम केला. आपल्या पिशव्यांतील रोटया काढून त्यांनीं त्या खाण्यास नुकतीच कुठें सुरुवात केली होती. तोंच त्या जंगलांत जवळपास दबा धरून राहिलेल्या गनिमांनीं त्यांच्यावर अचानकपणें गोळीबार सुरू केला. चर्चिलच्या समोर कुणाचा तरी एक घोडा उभा होता. शत्रूची गोळी लागून तो घोडा खालीं कोसळला. जनरल व्हाल्देज ह्यांनीं यत्किंचितहि वेळ न गमावतां आपल्या सैनिकांना गनिमांचा पाठलाग करण्याचा हुकूम दिला. पण गनिमांनीं कधींच पलायन केलें होतें. स्पॅनिश सैनिकांच्या हाताला त्यांनीं खालीं टाकलेल्या रिकाम्या काडतुसांशिवाय आणखी कांहींच लागलें नाहीं. त्या दरम्यान शत्रूच्या गोळीनें जखमी झालेल्या घोडयाच्या अंगांतून रक्तस्राव सुरू झाला होता. गोळी त्याच्या बरगडींत घुसली होती. चर्चिलनीं तें दृश्य पाहिलें तेव्हां ते एकदम भयचकित झाले. त्यांच्या प्राणावर आलें होतें पण घोडयावर निभावलें होतें. प्रारब्धानें त्यांचा बचाव केला होता. तो विचार मनांत येतांच चर्चिलनीं मोठया कृतज्ञतेनें दैवाचे आभार मानले.

शेवटीं त्या घनदाट जंगलांतून मार्ग आक्रमण केल्यावर जनरल व्हाल्देजचें सैन्य एका उघडया मैदानांत आलें. तेथें त्यांनीं रात्रीचा मुक्काम करण्याचें ठरविलें. तिथून जवळच एक ओढा वाहत होता. उकाडा भयंकर होत होता. म्हणून चर्चिल व त्यांचे सोबती ह्यांनीं त्या ओढयावर जाऊन आंघोळ करण्याचें ठरविलें. त्यांच्या बरोबर जनरल व्हाल्देज ह्यांच्या चीफ ऑफ स्टाफचे दोन अधिकारी होते. त्या सगळयांनीं आंघोळीसाठीं कपडे काढले होते. तोंच त्यांच्या दिशेनें सूऽऽ करीत एक गोळी आली. त्या गोळीच्या लागोपाठ आणखी एक गोळी आली. तदनंतर सरबत्तीच सुरू झाली. गोळया चर्चिल व त्यांचे सोबती ह्यांच्या डोक्यांवरून जात होत्या. त्यांनीं लगबगीनें कपडे करून ओढयावरून छावणीकडे पळ काढला. ते तेथें येऊन पोहोंचले, तेव्हां तेथें त्यांना रणधुमाळी सुरू असलेली आढळली. बंडवाल्यांपाशीं असलेल्या बंदुका स्पॅनिश सैनिकांच्या मोठा आवाज काढणाऱ्या बंदुकांपेक्षां

सरस होत्या. गोळीबार सुमारें अर्धा तास चालला. बंडवाल्यांचें समाधान झालें असावें. त्यांनीं गोळीबार बंद करून आपल्या मृत आणि जखमी सहकाऱ्यांना उचलून माघार घेतली.

गनीम निघून गेल्यावर स्पॅनिश सैनिकांनीं शांतपणें भोजन आटोपलें. नंतर ते झोपीं जाण्याचा विचार करीत होते, तोंच पुनः गोळीबारास सुरुवात झाली. ह्या वेळचा गोळीबार साधा नव्हता, तर तीव्र स्वरूपाचा होता. त्या गोळीबारांत एक स्पॅनिश सैनिक जखमी झाला. कांहीं वेळानें पूर्वींप्रमाणेंच गनिमांनीं माघार घेतली. त्या दरम्यान चर्चिल झोपी गेले होते. दिवसभराच्या प्रवासानें ते अतिशय दमून गेले होते.

दुसऱ्या दिवशीं पहांटेस जनरल व्हाल्देजच्या सैन्यानें पुढें कूच करण्यास सुरुवात केली. ते ओढा ओलांडीत होते तोंच गनिमांनीं गोळीबार सुरू केला. त्या गोळीबारास स्पॅनिश सैनिकांनीं प्रत्युत्तर दिलें. त्यांचे कांहीं लोक घायाळ झाले, पण त्यांच्यामध्यें गोंधळ माजला नाहीं. त्यांनीं ओढा शिस्तींत ओलांडला. सकाळीं आठ वाजतां जनरल व्हाल्देजचें विनीचें सैन्य एका मैदानांत येऊन पोहोंचलें. त्या मैदानाच्या एका टोंकाला बंडखोरांची छावणी होती. छावणीभोंवतीं त्यांनीं बळकट असा मेढेकोट उभारला होता. जनरल व्हाल्देजनीं बंडखोरांच्या बचावाचा अंदाज करून त्यांच्यावर हल्ला करण्याचा निर्णय घेतला.

स्पॅनिश सैनिकांनीं चढाई सुरू करतांच बंडखोरांनीं त्यांच्यावर सरबत्ती सुरू केली. दोन्ही बाजूंनीं जोरदार गोळीबारास सुरुवात झाली. जनरल व्हाल्देजनीं त्या गोळीबारास न जुमानतां धिमेपणानें पुढें चाल करण्यास प्रारंभ केला. शत्रूच्या तटबंदीपासून ते अवघे तीनशें किंवा चारशें मीटर्संच्या अंतरावर होते. त्यांच्यासमोर पायदळाचे सैनिक जात होते. शत्रूला टेकडीचें आणि जंगलाचें नैसर्गिक संरक्षण मिळालें होतें. ती टेकडी काबीज करणें हें त्यांचें उद्दिष्ट होतें चर्चिलच्या तुकडींत वीस माणसें होतीं. त्यांतील तीन घोडेस्वार त्यांच्या घोड्यांसह घायाळ झाले पण एकहि मरण पावला नाहीं. शेवटीं जनरल व्हाल्देजच्या सैन्यानें बंडखोरांवर मात केली. कांहीं बंडखोर जंगलाच्या दिशेनें पळून गेले, तर बाकीचे ठार किंवा कैदी झाले. स्पॅनिश

सैन्यानें बंडवाल्यांचा मेढेकोट काबीज केला, पण त्यांचा पाटलाग करणें त्यांना शक्य झालें नाहीं.

जनरल व्हाल्देज ह्यांच्यापाशीं बेगमी फक्त एकाच दिवसाची होती, म्हणून त्यांनीं आपल्या तळावर माघार घेतली. चर्चिल व त्यांचे सोबती यांना युद्ध प्रत्यक्ष बघतां आलें होतें. आतां त्यांना क्यूबामध्यें राहण्याचें प्रयोजन नव्हतें म्हणून ते इंग्लंडला परतले.

******

प्रकरण तिसरें

# हिंदुस्थान

१८९६ सालच्या वसंत ऋतूंत चौथी हुस्सार रेजिमेंट हौस्लोला व तिथून हॅम्प्टन कोर्टला गेली. तिथून ती हिंवाळ्यांत हिंदुस्थानला निघावयाची होती. ती रेजिमेंट पूर्वेकडील देशांत तेरा किंवा चौदा वर्षे राहावयाची होती, म्हणून तिच्यामधील अधिकाऱ्यांना त्यांचीं कामें अथवा व्यवहार आवरण्याची ताकीद देण्यांत आली. चर्चिल याच रेजिमेंटमध्यें असल्यानें साहजिकच त्यांचीहि रवानगी या रेजिमेंटबरोबरच हिंदुस्थानकडे होणार होती.

शेवटीं अधिकाऱ्यांनीं आणि रेजिमेंटमधील इतर सैनिकांनीं आपल्या नातेवाईकांचा आणि इष्टमित्रांचा निरोप घेतला व त्यांनीं हिंदुस्थानला जाणारें जहाज साउदॅम्प्टन येथें गांठलें. त्या जहाजावर एक हजार तीनशें सैनिकांची सोय करण्यांत आली होती. तेत्तीस दिवसांच्या प्रवासानंतर तें जहाज मुंबईच्या बंदरास लागलें. चर्चिलना दुसऱ्या विश्वांत आल्यासारखें वाटलें.

कारण, हिंदुस्थान हा देश त्यांना अगदींच अपरिचित होता. मुंबई शहरांतील माड आणि इमारती पाहून त्यांचें मन आल्हादित झालें. जहाजांतून उतरल्यावर त्याच दिवशीं ते आपल्या इतर अधिकारी मित्रांसह पुण्याच्या गाडींत बसले व संध्याकाळीं पुण्याला पोहोचले. १८९६ सालच्या हिवाळयांत चर्चिलना बावीस वर्षें पूर्ण झालीं. आतांपर्यंतचें त्यांचें आयुष्य भाऊगर्दींत गेलें असल्यानें त्यांना वाचन करण्यास सवड मिळाली नव्हती. ती सवड त्यांना हिंदुस्थानांत आल्यावर मिळाली. ते जरी लश्करी महाविद्यालयाचे पदवीधर असले, तरी त्यांचें वाचन असें मुळींच झालें नव्हतें. तसें त्यांनीं थोडें फुटकळ वाचन केलें होतें, पण ज्ञानार्जनाच्या दृष्टीनें त्या वाचनाचा उपयोग नव्हता. म्हणून त्यांनीं पद्धतशीर वाचन करण्याचें ठरविलें. त्यांनीं लगेंच इंग्लंडला आपल्या आईस ग्रंथ पाठवून देण्याबद्दल पत्र लिहिलें. आईनेंहि तत्परतेनें त्यांना ग्रंथ पाठवून दिले. तदनंतर दर महिन्याला नियमितपणें त्यांना इंग्लंडहून ग्रंथांचीं पार्सलें येऊं लागलीं.

गिबन हा चर्चिलचे वडील लॉर्ड रँडॉल्फ ह्यांचा आवडता ग्रंथकार होता. म्हणून चर्चिलनींहि गिबनच्या The Decline and the Fall of Roman Empire ह्या ग्रंथाचे आठहि खंड वाचून काढले. गिबनची शैली त्यांना फार आवडली. तदनंतर त्यांनीं मॅकॉले वाचण्यास प्रारंभ केला. मॅकॉलेनें चर्चिलचे पूर्वज ग्रँड ड्यूक ऑफ मार्लबरो ह्यांच्यावर सडकून टीका केली आहे. चर्चिलनीं ती टीका व्यथित अंतःकरणानें वाचली. मॅकॉले हा एक निर्भीड वृत्तीचा ग्रंथकार होऊन गेला. त्यानें टीकेच्या बाबतींत कुणाचाच मुलाहिजा बाळगला नाहीं. अनेक थोर पुरुषांना त्यानें धारेवर धरलें. पण ही टीका चर्चिलना कांहीं अंशीं एकांगी वाटली. तथापि मॅकॉलेच्या ग्रंथांच्या परिशीलनानें त्यांचा फायदा झाल्यावांचून राहिला नाहीं. ते रोज पांच तास तत्वज्ञान आणि इतिहास ह्या विषयांवरील ग्रंथांचें वाचन करीत. प्लेटो, ॲरिस्टॉटल्स, शोपेनहावर, माल्थस, डार्विन, वगैरे अनेक पंडितांचे ग्रंथ त्यांनीं आवडीनें वाचले. परंतु राहून राहून त्यांना एकाच गोष्टीचें वाईट वाटत होतें; तें हें कीं, त्या ग्रंथांच्या विषयांवर ते वादविवाद अथवा चर्चा करूं शकत नव्हते. त्यांच्या मित्रमंडळींत अथवा छावणींत त्या गंभीर विषयांचें परिशीलन केलेलीं माणसें नव्हतीं. त्या बाबतींत

त्यांना विद्यापीठांत विद्यार्जन करणारे त्यांच्या वयाचे तरुण भाग्यवान् वाटायचे व त्यांचा हेवाहि त्यांना वाटायचा. कारण त्यांच्या शिक्षकांकडून त्यांना मार्गदर्शन होत होतें.

सॉक्रेटिसच्या तत्त्वज्ञानाचा चर्चिलच्या मनावर खोल ठसा उमटला. आपल्या हातांत अधिकार आला, तर प्रचलित शिक्षणक्रमांत विशेषेंकरून सुखवस्तु मुलांच्या शिक्षणक्रमांत बदल घडवून आणण्याचा त्यांनीं बेत केला होता. परंतु त्यांना अशी भीति वाटूं लागली कीं, तसा बदल केला, तर सॉक्रेटिसला ज्याप्रमाणें लोकांनीं विष पिऊन मरण्याची शिक्षा दिली, त्याचप्रमाणें, इंग्लंडचे लोक आपणालाहि विष देण्यास कमी करणार नाहींत !

चर्चिलना धर्माविषयींहि आस्था वाटत असे, परंतु ब्रिटिश लश्करांत सगळ्यांना धार्मिक स्वातंत्र्य होतें. कुणावरहि धार्मिक बंधनें पाळण्याची सक्ति नव्हती. चर्चिल आणि त्यांचे मित्र हिंदुस्थानांत असतांना धर्मावर चर्चा करीत. परंतु विविध धर्मांवरील ग्रंथांचें परिशीलन केल्यावर चर्चिलचें असें ठाम मत झालें कीं, फाजील धर्माभिमान हा माणसाला मारक आहे.

चर्चिलचें धर्माविषयींचें कोणतेंहि मत असो, ते धार्मिक वृत्तीचे असोत वा नसोत. तथापि एक मात्र खरें कीं, ते ईश्वरवादी आहेत, ईश्वरावर त्यांची अढळ श्रद्धा आहे. आणि ईश्वराची प्रार्थना ते सदैव करीत आले आहेत. त्यांच्या श्रद्धेप्रमाणें आणि देवावरील अढळ निष्ठेप्रमाणें त्यांचे आयुष्यांतील सर्व मनोरथ पूर्ण झाले आहेत. त्यांनीं जें जें म्हणून काम मनांत आणलें तें तें पूर्ण झालें.

चर्चिलचे कांहीं चुलतभाऊ, आतेभाऊ आणि मामेभाऊ विश्वविद्यालयीन शिक्षण घेतलेले होते. चर्चिलचे विचार ऐकून ते त्यांची थट्टा करीत. कारण ते धर्म अथवा देव न मानणारे असे लोक होते. त्यांचें असें मत होतें कीं, जगांत माणसांच्या विचारांशिवाय आणखी कांहींच नाहीं. जगांत ज्या ज्या म्हणून गोष्टी आहेत त्या मिथ्या आहेत. विश्वांत जी काय म्हणून निर्मिति होते ती माया आहे. तें एक स्वप्न आहे. आमचें विश्व आम्हींच निर्माण केलें आहे, आमच्या कल्पनांचा जितका अधिक विकास होतो, तितकें जग विविध होतें. आमची स्वप्नमालिका बंद पडल्यास जगाचा विकास कधींच होणार नाहीं. चर्चिलना हे जडवादी विचार कधींच पटले नाहींत.

१८९७ सालच्या उन्हाळ्यांत चर्चिलच्या छावणींत अशी बातमी पसरली कीं, कांहीं ठराविक अधिकाऱ्यांना उन्हाळ्यांत तीन महिन्यांच्या रजेवर पाठविण्याचा वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं निर्णय घेतला आहे. चर्चिलना हिंदुस्थानांत येऊन फार दिवस झाले नव्हते, तरीहि त्यांनीं इंग्लंडला जाण्याचा बेत केला व आपल्या वरिष्ठांकडे रजा मागितली. ती रजा मंजूर करण्यांत आली. ते मे महिन्यांत इंग्लंडला जाणाऱ्या बोटीवर चढले. बरोबर कर्नल हॅमिल्टन ह्या नांवाचे एक अधिकारी होते. हिंदुस्थानांत गोळीबाराचें शिक्षण देणाऱ्या एका शाळेचे ते प्रमुख होते. त्यांच्याकडून चर्चिलना कळलें कीं ग्रीस आणि तुर्कस्तान ह्या दोन देशांमध्यें तेढ निर्माण झाली असून त्याचें पर्यवसान युद्धांत होण्याची भीति आहे. कर्नल हॅमिल्टन हे कांहींसे अद्‌भुतरम्यतावादी गृहस्थ होते. त्यांचा ओढा ग्रीसकडे होता. ग्रीस आणि तुर्कस्थान ह्या दोन्ही देशांमध्यें युद्धाचा भडका उडाल्यास ग्रीकांच्या मदतीस जाण्याचा मनोदय त्यांनीं चर्चिलपाशीं प्रकट केला. पण चर्चिल हे पक्के टोरी असल्यानें व टोरी पक्षाचा कल तुर्कस्थानच्या बाजूनें असल्यानें त्यांना तुर्कस्थानविषयीं सहानुभूति वाटत होती.

युद्ध खरोखरच सुरू झालें तर एखाद्या वर्तमानपत्राचा बातमीदार म्हणून युद्धआघाडीवर जाण्याचा त्यांनीं बेत केला. तुर्कस्थान हें एक बलाढ्य राष्ट्र होतें. त्याचें लश्कर ग्रीक लश्कराहून पांचपट अधिक होतें. शिवाय त्याची शस्त्रसामग्रीहि अद्यावत् होती. चर्चिलनीं जेव्हां हे विचार कर्नल हॅमिल्टन ह्यांच्यापाशीं व्यक्त केले, तेव्हां त्यांना विषाद वाटल्यावांचून राहिला नाहीं. चर्चिल म्हणाले कीं, मी कुठल्याच पक्षांत सामील होणार नाहीं, फक्त युद्धाचें अवलोकन तेवढें करणार. परंतु त्यांची बोट पोर्ट सय्यदला येऊन पोहोंचली तेव्हां त्यांना कळलें कीं, तुर्को-ग्रीक युद्धांत ग्रीसचा पराभव झाला. ग्रीसचा त्या युद्धांत पुरताच नाश होणार होता. परंतु कांहीं बलाढ्य राष्ट्रांची ग्रीसला सहानुभूति होती म्हणून त्याचा सर्वनाश टळला. अशा रीतीनें चर्चिलचा थ्रेसमध्यें जाण्याचा बेत जिथल्या तिथेंच राहिला.

******

■ ■ ■ ■ ■ ■ ■

प्रकरण चौथें

# मालकंद मोहीम

चर्चिल इंग्लंडमध्यें रजेचे दिवस मजेंत घालवीत असतां हिंदुस्थानांत वायव्य सरहद्द प्रांतांत पठाणांची बंडाळी सुरू झाल्याची वार्ता इंग्लंडमध्यें आली. त्या बंडाळीचा बीमोड करण्यासाठीं सैन्यांच्या तीन ब्रिगेडस् पाठविण्याची तयारी केली जात होती. त्या सैन्याचें नेतृत्व सर बिंडन ब्लड ह्या नांवाचे सेनापति करणार होते. चर्चिलनीं लगेच सर बिंडन ह्यांना तार करून वायव्य सरहद्द प्रांताकडे निघणाऱ्या सैन्यांत (मालकंद मोहीम) आपला अंतर्भाव व्हावा अशी विनंति केली. सर साहेबांनीं चर्चिलना पूर्वीं तसें आश्वासन दिलें होतें. ती तार केल्यावर चर्चिलनीं लगेच हिंदुस्थानचा रस्ता धरला.

सर बिंडन ह्यांना चर्चिलनीं जी तार पाठवली होती, तिचें उत्तर त्यांना ते हिंदुस्थानच्या वाटेवर असतां ब्रिंडसी येथें मिळायचें होतें. पण त्यांना तें तिथें मिळालें नाहीं. त्यांना तें एडनलाहि मिळालें नाहीं. शेवटीं त्यांची बोट मुंबई बंदराला लागल्यावर त्यांना तें मिळालें. सर बिंडन आपल्या तारेंत म्हणत होते–" लश्करांत जागा मिळणें कठीण आहे. यायचें असल्यास एखाद्या पत्राचा बातमीदार म्हणून यावें. "

चर्चिलना वायव्य सरहद्द प्रांताकडे जायचें झाल्यास प्रथम त्यांच्या रेजिमेंटची परवानगी काढावी लागणार होती. त्यांची रेजिमेंट दक्षिण हिंदुस्थानांत असल्याने त्यांनीं मुंबईहून सरळ दक्षिणेची गाडी पकडली. रजा संपण्यापूर्वींच त्यांचें आगमन झालेलें पाहून त्यांच्या रेजिमेंटच्या लोकांना आश्चर्य वाटलें. पण त्यांचें चांगलें स्वागत झालें. त्यांनीं पठाणी प्रदेशांत अलाहाबादच्या " पायोनियर " ह्या इंग्रजी पत्राचे बातमीदार म्हणून जावें असें ठरलें. त्यांच्या आईनेंहि इंग्लंडला त्यांचीं मालकंद मोहिमेचीं वार्तापत्रें ' डेलि टेलिग्राफ ' ह्या दैनिकांत प्रसिद्ध करण्याची व्यवस्था केली. त्यांना दर

स्तंभास पांच पौंडांचा मोबदला मिळायचा होता. त्यांना बातमीदार म्हणून जाण्यासाठीं जो खर्च करावा लागणार होता, त्या मानानें त्यांना मिळणारा मोबदला कमीच होता. पण तरीहि त्यांनीं केवळ अनुभव मिळविण्यासाठीं म्हणून मालकंद मोहिमेवर जाण्याचें ठरविलें.

अशा रीतीनें चर्चिल दोन पत्रांचीं शिफारसपत्रें घेऊन आपल्या रेजिमेंटच्या कर्नलसमोर दाखल झाले. कर्नल त्यांच्या इच्छेआड आले नाहींत. त्यांनीं त्यांना त्यांची कामगिरी यशस्वी होवो असा आशीर्वाद देऊन मोहिमेवर जाण्याची परवानगी दिली. त्याच रात्रीं चर्चिलनीं सामानाची बांधाबांध करून एका ऑर्डर्लीसह नौशेराचें तिकिट काढलें. तत्पूर्वी त्यांना नौशेरा बंगलोरहून किती मैल आहे त्याची कल्पना नव्हती. पण आतां जेव्हां त्यांनीं त्याची चौकशी केली. तेव्हां तें बंगलोरहून तीन हजार तीनशें पंचेचाळीस मैल दूर असल्याचें त्यांना कळलें. तें ऐकतांच चर्चिलना आश्चर्याचा धक्का बसला. हिंदुस्थान किती अफाट होता ह्याची त्यांना आतां पुरेपूर कल्पना आली.

तो प्रवास तब्बल पांच दिवसांचा होता व तो चर्चिलना ऐन उन्हाळ्यांत करावा लागला. त्यांनीं आपणांबरोबर बरींच पुस्तकें घेतलीं. त्यामुळें त्यांचा बहुतेक वेळ वाचनांत गेला, प्रवासाचा कंटाळा विशेष भासला नाहीं. तथापि ते पांचहि दिवस एखाद्या बंद कोठडींत घालविल्याचा त्यांना अनुभव आला.

रावळपिंडीला चर्चिलनीं एक दिवस मुक्काम केला. तिथें त्यांचा एक मित्र होता. वायव्य सरहद्दीपासून पिंडी शहर जवळ असल्यानें, तेथें एक प्रकारचें अस्वस्थतेचें वातावरण पसरलें होतें. तिथलें सर्व सैन्य रणक्षेत्रावर जायचें होतें. सर्व सैनिकांच्या रजा रद्द करण्यांत आल्या होत्या व सगळ्यांना जय्यत तयार राहाण्याचा हुकूम मिळाला होता.

चर्चिल रावळपिंडीहून मोठ्या अस्वस्थ मनस्थितींतच नौशेराला निघाले. बंगलोर सोडल्यापासून सहाव्या दिवशीं ते तेथें जाऊन पोहोचले. मालकंद मोहिमेवर जाणाऱ्या सैन्याचा तेथें तळ पडलेला होता. नौशेराहून त्यांना चोवीस मैलांचा प्रवास टांग्यानें करावा लागला. तेथें सर बिंडन ब्लड ह्यांची छावणी पडली होती. धुळीनें माखलेल्या स्थितींतच चर्चिल सर बिंडन

ह्यांच्या भेटीस गेले. पण त्यांची भेट होऊं शकली नाहीं. ते एका तुकडीसह बुनेरवाल बंडवाल्यांच्या बंदोबस्तासाठीं गेले होते.

बुनेरवाल ही एक लढाऊ पठाण जमात होती. आपल्या स्वातंत्र्याचें त्यांनी कैक शतकांपासून रक्षण केलें होतें. १८६३ सालीं ब्रिटिशांनीं त्यांच्यावर स्वारी केली, तेव्हां उभय पक्षांची अतोनात प्राणहानि झाली होती. बुनेरवाल लढवय्यांनीं ब्रिटिशाना अगदीं कडवा प्रतिकार केला होता. शेंकडों ब्रिटिश आणि देशी सैनिकांना त्यांनीं टिपून ठार केलें होतें. त्या मृत सैनिकांचीं प्रेतें हस्तगत करणेंदेखील ब्रिटिशांना शक्य न झाल्यानें तीं बुनेर प्रदेशांत सडून गेलीं होतीं. अशा ह्या कडव्या हिंस्र टोळीवाल्यांचें पारिपत्य करण्याची मोहीम हिंदुस्थान सरकारनें सुरू केली होती. पण ती किती दिवसांत संपणार होती तें मात्र कुणीच सांगूं शकत नव्हता.

सेनापति सर बिंडन ब्लड ह्यांनीं बुनेरवाल पठाणांचा बंदोबस्त अवघ्या पांच दिवसांत केला. पण चर्चिलना तो काळ कल्पांतासारखा मोठा वाटला. त्या क्षणापर्यंत त्यांनीं व्हिस्कीसारख्या मादक पेयांना कधीं स्पर्श केला नव्हता. त्यांना फक्त गोड दारू आणि शांपेन तेवढी पिण्याची संवय होती. पण आतां त्यांना व्हिस्की पिण्याशिवाय गत्यंतर उरलें नाहीं. सतत चार दिवसपर्यंत त्यांनीं व्हिस्कीचा प्रतिकार केला ते चार दिवस त्यांनीं लेमन, चहा, कोमट पाणी, हीं पेयें पिण्यांत घालविलीं. पण त्या पेयांवर वेळ काढणें अशक्य झाल्यानें त्यांना अखेर व्हिस्कीला शरण जावें लागलें.

चर्चिलनीं मोहिमेवर जाण्याची कोणतीच तयारी केली नव्हती. ती तयारी त्यांना सर बिंडन ब्लड यांच्या छावणींत करावी लागली. त्यांना चांगले घोडे विकत घ्यावे लागले व एक मोतद्दार तैनातीस ठेवणें भाग पडलें. इतर सामान त्यांनीं लिलावांत विकत घेतलें.

हिंदुस्थानांतील अँग्लो-भारतीय सैन्यांतील लढाईत मरण पावलेल्या सैनिकांचें सामान त्यांच्या अंत्यविधीनंतर लिलावांत काढून ते पैसे मयताच्या नातेवाईकांकडे पाठवून देण्याची त्या वेळीं प्रथा होती. तें स्वस्तांत पडत असल्यानें बहुतेक सैनिक किंवा अधिकारी तें लिलावांत विकत घेत. चर्चिलनाहि अशाच एका मयत अधिकाऱ्याचें सामान लिलावांत विकत घ्यावें लागलें. तो अधिकारी आदल्याच आठवड्यांत मरण पावला होता.

तथापि तें सामान स्वीकारते वेळीं चर्चिलचें मन कचरल्याशिवाय राहिलें नाहीं. पण त्याला इलाज नव्हता. नवीन सामान विकत घेईपर्यंत फार दिवस जाणार होते. शिवाय मयत सैनिकांचे कपडे आणि इतर वस्तु वापरण्याची त्या वेळीं सर्रास प्रथा होती.

सतत तीन वर्षेपर्यंत मालकंद टेकडी इंग्लिशांनीं आपल्या ताब्यांत ठेवली होती. त्या टेकडीच्या खोऱ्यांतून अनेक रस्ते अनेक ठिकाणीं जात होते. मालकंद टेकडी हातांत असल्यामुळें त्या रस्त्यांचें ब्रिटिशांना रक्षण करणें शक्य होई. त्या रस्त्यांपैकीं एक मुख्य रस्ता चित्रळ संस्थानांत जात होता. त्या वेळीं चित्रळला फार मोठें लश्करी महत्त्व होतें. मालकंद टेकडी टोळीवाल्यांच्या प्रदेशांत होती. ती ब्रिटिशांनीं आपल्या हातांत ठेवल्यानें स्वात खोऱ्यांतील टोळीवाले चिडून गेले होते. कारण, आपल्या प्रदेशांत परकी सैन्याचें अस्तित्व त्यांना नको होतें. सतत कैक शतकांपासून त्यांनीं आपल्या प्रदेशाच्या स्वातंत्र्याचें रक्षण केलें होतें.

ब्रिटिश सत्ताधाऱ्यांना मालकंद टकडी लश्करी महत्त्वाची वाटत असल्यानें त्यांनीं ती टोळीवाल्यांच्या इच्छेविरुद्ध आपल्या ताब्यांत ठेवली होती. त्यांच्या रागालोभाची त्यांना पर्वा नव्हती. कारण ते बलाढ्य होते. पण टोळीवालेहि कांहीं लेचेपेचे नव्हते. ब्रिटिश सत्तेला आव्हान देऊन ते त्यांच्यावर हल्ले चढवीत. परंतु ब्रिटिशांनीं टोळीवाल्यांच्या उद्रेकाला वेगळा रंग दिला होता. ते जगाला सांगत कीं, टोळीवाल्यांचे अत्याचार त्यांच्या धार्मिक अंधश्रद्धेतून उद्भवत आहेत.

अशाच परिस्थितींत स्वात टोळीवाल्यांनीं ती बंडाळी सुरू केली. त्यांनीं मालकंद खिंडींतील ब्रिटिश शिबंद्यांवर आणि चकडारा किल्ल्यावर हल्ले चढविले तो किल्ला स्वात नदीवरील एका छोट्या पुलाचें रक्षण करीत असे. बंडवाल्यांनीं ब्रिटिश सैनिकांबरोबरच शांतताप्रिय नागरिकांवरहि हल्ले करून अनेक स्त्रीपुरुषांना ठार केलें. मालकंद खिंडींतील ब्रिटिश सैनिकांवर त्यांनीं अचानक हल्ला केल्यामुळें त्यांची स्थिति फार शोचनीय झाली. हा हल्ला बंगाल लान्सर्सनीं मोठ्या शिकस्तीनें परतवून लावला खरा, परंतु त्या रेजिमेंटमधील बरेच शिपायी ठार झाले. चकडारा किल्लाहि ब्रिटिशांनीं

लढविला त्यामुळें स्वात नदीवरील झुलता पूल सुरक्षित राहिला व मालकंद मोहिमेंत भाग घेणाऱ्या बारा हजार सैनिकांना व चार हजार घोड्यांना आणि खेचरांना तो पूल ओलांडणें शक्य झालें.

सर बिंडन ब्लड ह्यांनीं कांहीं प्रसंगीं शस्त्रबलाचा उपयोग करून आणि कांहीं प्रसंगीं सामोपचारानें बुनेरवाल टोळीवाल्यांना शांत केलें व ते माघारा परतले. ते स्वत: कप्टन ब्लड ह्या नांवाच्या इंग्लंडमध्यें होऊन गेलेल्या एका पुराणोक्त बंडखोर पुरुषाच्या घराण्यांतले असल्यानें जगांतील कुठल्याहि बंडखोरांविषयीं त्यांना सहानुभूति वाटत असे. सरहद्द प्रांतांतील बंडखोर टोळीवाल्यांचा ब्रिटिश सत्तेला मोठा उपद्रव होत असे. परंतु सर बिंडन ब्लड ह्यांना ते बंडवाले पठाण फार आवडत.

सर बिंडन ब्लड बुनेरवाल टोळीवाल्यांना शांत करून माघारा परतले होते, तोंच इतर टोळीवाल्यांनीं उचल खाल्ली व बंडाळीस सुरुवात केली. त्यांचा बंदोबस्त करणें आवश्यक झाल्यानें सर बिंडन ह्यांना लश्करी मोहीम पुन: सुरू करणें भाग पडलें. त्यांनीं त्या टोळीवाल्यांवर मालकंद मोहिमेंत भाग घेतलेल्या तिन्ही ब्रिगेडस्‌ची रवानगी केली. त्या सैनिकांनीं बंडखोरांच्या प्रदेशांत शिरून सर्वत्र जाळपोळीचें आणि कापाकापीचें सत्र सुरू केलें. त्यांनीं टोळीवाल्यांचीं जनावरें पकडून मारून खाल्ली आणि वैरण मोहिमेंतील जनावरांसाठीं नेली. मोहिमेंत कांहीं मुलकी अधिकाऱ्यांनीहि भाग घेतला होता. हे लोक टोळीवाल्यांच्या प्रदेशांत पोलिटिकल एजंट म्हणून काम करीत असत. परंतु सैन्यांत ते लोकप्रिय नव्हते. कारण लश्करी अधिकारी टोळीवाल्यांना वठणीवर आणण्याच्या ज्या कारवाया करीत त्यांत हे मुलकी अधिकारी कोलदांडा घालीत. टोळीवाल्यांच्या नायकांचें आणि त्यांचें संगनमत असे व त्यामुळें त्यांच्या हितसंबंधांना बाध येणारें कोणतेंच कृत्य करण्यास ते तयार नसत. फार कशाला, टोळीवाल्यांमध्यें ते सैनिकाविरुद्ध बेधडक अपप्रचार करीत.

मालकंद मोहिमेंत भाग घेतलेल्या तिन्ही ब्रिगेडस्‌नीं महंमद प्रदेशांत शिरून नासधूस करण्यास प्रारंभ केला. तें सैन्य आतां मामुंद खोऱ्यासमोर येऊन पोहोंचलें. मामुंद टोळीवाल्यांच्या वाटेला जाण्याचें ब्रिटिश लश्कराला कांहीं प्रयोजन नव्हतें. कारण त्यांच्याशीं ब्रिटिशांचा झगडा चालू नव्हता. पण

दुर्दैवाची गोष्ट ही कीं, मामुंद टोळीवाल्यांना ब्रिटिश लश्करांतील जनावरांची हांव सुटली व त्या रात्रीं कांहीं मामुंद टोळीवाल्यांनीं ब्रिटिश छावणीवर हल्ला चढविला. पण तो हल्ला गंभीर स्वरूपाचा नसल्यानें सर बिंडन ब्लड ह्यांनीं कोणतीच हालचाल केली नाहीं. त्यांनीं दुसऱ्या दिवशीं छावणी मोडून पुढें चाल करण्यास सुरुवात केली. तोंपर्यंत मामुद टोळीवाले शांतच होते. पण दोन दिवसांनीं जेव्हां सैन्याची दुसरी ब्रिगेड त्या भागांत येऊन दाखल झाली, तेव्हां मामुंद टोळीवाले एकदम खडबडले व त्यांनीं मिळेल त्या हत्यारांनिशीं ब्रिटिशांचा प्रतिकार करण्याचा निर्धार केला. ब्रिटिशांनीं खंदक खणून टोळीवाल्यांच्या हल्ल्यांना तोंड देण्याची सिद्धता केली. त्या रात्रीं टोळीवाल्यांनीं हल्ला केला त्यांत अधिकारी आणि सैनिक मिळून चाळीसजण व कित्येक जनावरें कामास आलीं. त्या हल्ल्यामुळें सर बिंडन क्रोधाविष्ट झाले व त्यांनीं टोळीवाल्यांचें पारिपत्य करण्याचा सैन्यास हुकूम केला. दुसऱ्या ब्रिगेडचे सेनापति जनरल जेफ्रे ह्यांच्यावर ती कामगिरी सोंपविण्यांत आली.

दुसऱ्या दिवशी चर्चिल हे बंगाल लान्सर्सच्या पहाऱ्यांत जनरल जेफ्रे ह्यांच्या छावणींत येऊन हजर झाले. त्या दोन्ही ब्रिगेडस्च्या छावण्यांमध्यें पांच मैलांचें अंतर होतें. तो प्रदेश भयंकर खडकाळ असल्यानें चर्चिलना प्रवासांत फार त्रास झाला. अंधार पडण्यापूर्वी चर्चिल जनरल जेफ्रे ह्यांच्या छावणींत येऊन पोहोचले. सबंध रात्रभर छावणीवरून गोळ्या उडत होत्या. परंतु छावणीला भरभक्कम संरक्षण असल्यानें प्राणहानि झाली नाहीं. माणसांपेक्षां जनावरांच्या संरक्षणाची तयारी चांगली करण्यांत आली होती.

दुसऱ्या दिवशीं पहांटेस दुसऱ्या ब्रिगेडस्नीं मामुंद खोऱ्यांत आक्रमण करण्यास सुरुवात केली. तो सोळा सप्टेंबरचा दिवस होता. ब्रिगेडच्या छोट्या छोट्या तीन तुकड्या पाडण्यांत आल्या होत्या. बंडवाल्यांचा बंदोवस्त करण्याचे अधिकार प्रत्येक तुकडीला स्वतंत्रपणें देण्यांत आले होते. चर्चिल मधल्या तुकडीत सामील झाले होते. ह्या तुकडीला खोऱ्याच्या शेवटच्या टोंकापर्यंत जाण्याचा हुकूम होता. तें काम एकहि गोळी न झाडतां सुरळीतपणें पार पडलें. पण खोऱ्याच्या टोंकाला तटासारखी जी एक टेकडी होती तिच्यावर टोळीवाले गोळा झालेले ब्रिटिश सैनिकांना दुर्बिणींतून दिसले. तें

पाहतांच घोडदळाच्या सैनिकांनी यत्किंचितहि वेळ न गमावतां त्या टेकडीच्या दिशेनें आपले घोडे पिटाळले.

चर्चिलनीं आपला घोडा एका देशी सैनिकाच्या हवालीं केला व ते पायदळाच्या सैनिकांमध्यें सामील झाले. ते सगळे तासभर टेकडी चढत होते. अधूनमधून गोळीबाराचा आवाज ऐकूं येत होता. सकाळचा अकरा वाजण्याचा समय होता तो, पण ऊन नुसतें मी म्हणत होतें. चर्चिलनीं मागें वळून पाहिलें तेव्हां त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. सैन्याचा कुठेंच मागमूस नव्हता. त्यांच्यापासून पुढें सुमारें सहाशें मीटर्सच्या अंतरावर बंगाल लान्सर्स त्यांच्या घोड्यांशेजारीं उभे होते. चर्चिलच्या तुकडींत एक हजार दोनशें सैनिक होते. पण त्यांचा कुठेंच पत्ता नव्हता. ते खोऱ्यामध्यें गडप तर झाले नाहींतना असा त्यांना संभ्रम पडला.

चर्चिलनीं आपल्या सभोंवतालीं बघितलें. पांच ब्रिटिश अधिकारी आणि सत्तर ऐंशी शीख सैनिक एवढेंच काय तें सैन्य त्यांच्या जवळपास होतें. मामुदखोऱ्याच्या टोंकाला असलेल्या त्या मूठभर सैनिकांना तिथल्या खेड्यांतील टोळीवाल्यांचा बंदोबस्त करायचा होता.

शेवटीं बराच वेळ चालल्यावर चर्चिल आणि त्यांच्याबरोबरचे सैनिक एका खेड्यांत येऊन पोहोंचले. पण बहुतेक सर्व मामुंद खेड्यांप्रमाणें तें खेडें देखील ओसच होतें. चर्चिल, एक ब्रिटिश अधिकारी आणि आठ शीख सैनिक मिळून दहाजण खेड्याच्या टेकडीच्या बाजूनें राहिले व बाकीचे विश्रांति घेण्यासाठीं घरांच्या सावलींत बसले. इतक्यांत कंपनीचा कॅप्टन तिथें आला व त्यांना म्हणाला कीं, आपण इथून निघून जाऊं या. त्यानें चर्चिल व त्यांचे सोबती यांना तिथेंच थांबण्यास सांगितलें व इतर लोकांसह तो निघून गेला. चर्चिल व त्यांचे सोबती ह्यांच्याकडे त्या सैनिकांच्या पिछाडीचें रक्षण करण्याची कामगिरी सोंपविण्यांत आली होती.

अकस्मात् टेकडीवर बंडवाल्यांची हालचाल दिसूं लागली. खडकांमागें हवेंत तलवारी तळपल्या व निशाणें फडकवलेलींहि दिसूं लागलीं. कांहीं वेळानें गोळीबार सुरू झाला व नंतर टोळीवाले खडकांवरून उड्या मारीत 'ई! ई! ई! बांग! बांग! बांग' अशी आरोळी ठोकीत वानरांप्रमाणे खालीं उतरूं

लागले. शीख सैनिकांनीं त्यांच्यावर गोळीबार सुरू केला. पण त्या गोळीबाराला न जुमानतां ते खालीं येऊं लागले. त्यांच्यामागें आणखीहि टोळीवाले दिसत होते. ते टोळीवाले इतक्या जवळ आले, कीं, चर्चिलना त्यांच्यावर गोळ्या झाडाव्या असें वाटलें. त्यांनीं जवळच असलेल्या एका शीख सैनिकाची बंदूक घेऊन टोळीवाल्यांच्या रोखानें गोळ्या झाडण्यास सुरुवात केली. ब्रिटिश सैनिक जमिनीवर पडून गोळ्या झाडीत होते. त्यामुळें त्यांच्या पैकीं कुणीहि जखमी झाला नाहीं. मात्र गोळ्या त्यांच्या कानावरून जात होत्या.

शेवटीं त्या मूठभर सैनिकांनीं माघार घेण्याचें ठरविलें. ज्या शीख सैनिकानें चर्चिलना आपली बंदूक दिली होती. त्यानें काडतुसें जमिनीवर ठेवलीं होतीं. दारूगोळा शक्यतों शत्रूच्या हातीं पडूं द्यायचा नाहीं, असा युद्धांतला एक नियम आहे. त्या नियमाप्रमाणें चर्चिलनीं काडतुसें उचलून त्या शीख सैनिकाकडे देण्यास सुरुवात केली. तो तीं आपल्या पट्ट्यांत खोवूं लागला. तुकडींतील सैनिक माघार घेण्यासाठीं उठले. तें पाहतांच टेकडीवरील खडकांमागें एक आरोळी ऐकूं आली व सरबत्ती सुरू झाली. माघार घेण्यासाठीं उठलेले ब्रिटिश सैनिक पुन: जमिनीवर आडवे झाले. ते कां आडवे झाले ह्याचा चर्चिल विचार करीत होते, तोंच त्यांच्या ध्यानीं येण्यास उशीर लागला नाहीं, कीं त्यांच्यापैकी दोन ठार आणि तीन जखमी झाले आहेत. एक ब्रिटिश अधिकारी तर आडवा तिडवा झाला होता. त्याचें तोंड रक्तानें माखलें होतें.

बाकीच्या शाबूत सैनिकांनीं आपल्या जखमी सोबत्यांना उचलून खालीं उतरण्यास सुरुवान केली. ते खेड्यांतून जात होते, तोंच घरांमध्यें लपून बसलेले वीस ते तीस पठाण बाहेर आले व त्यांनीं गोळीबार करण्यास सुरुवात केली. चर्चिल आणि एक शीख सैनिक एका जखमी सैनिकाला घेऊन जात होते, तोंच तो शीख सैनिक खालीं कोसळला. त्याच्या पायाला गोळी लागली होती. त्याच वेळीं तुकडीचा गोरा अधिकारीहि ठार होऊन खालीं पडला. त्या दरम्यान दहा-बारा पठाण तलवारी उपसून त्या सैनिकांवर चालून आले. तें पाहतांच त्यांनीं आपल्या जखमी सोबत्यांना तेथेंच टाकून

पळ काढला. पठाणाच्या म्होरक्यानें मृत गोऱ्या अधिकाऱ्याच्या प्रेतावर लागोपाठ तीन चार वार केले. तें पाहतांच चर्चिल देहभान विसरून गेले. त्यांच्या अंगांत एकदम रणदेवता संचारली. त्या पठाणाला ठार करण्याशिवाय त्यांना कांहींच सुचलें नाहीं त्यांच्यापाशीं घोडेस्वाराची अणकुचीदार धारेची तलवार होती. ते द्वंद्वयुद्धांत प्रवीण होते व त्यांना त्याबद्दल पदकहि मिळालेलें होतें. त्यांनीं त्या पठाणाशीं द्वंद्वयुद्ध खेळण्याचें ठरविलें. ते दोघे समोरासमोर दहावीस हातांच्या अंतरावर होते. पठाणानें एक दगड उचलून चर्चिलवर भिरकावला. तोंच त्या पठाणाच्या मागून आणखी तीन पठाण आले. तेव्हां चर्चिलनीं द्वंद्वयुद्ध खेळण्याचा विचार बदलला. त्यांनीं चटकन आपलें रिव्हॉल्व्हर काढलें व त्या पठाणावर लागोपाठ तीन गोळया झाडल्या. त्या गोळया पठाणाला लागल्या कीं काय तें त्यांना दिसलें नाहीं, पण पठाण पळून गेलेला त्यांना दिसला. चर्चिलनीं आपल्या आजूबाजूला पाहिलें. त्यांच्या जवळपास एकहि ब्रिटिश सैनिक नव्हता. ते एकटेच तेवढे मागें राहिले होते. त्यांनीं एकदम पळ काढण्यास सुरुवात केली. ते पहिल्या टेकडीवर येऊन पोहोंचले, तेव्हां दुसऱ्या टेकडीवर शीख सैनिक दबा धरून बसलेले त्यांना दिसले. त्यांनीं त्यांना खूण करून आपणापाशीं बोलाविलें. पण ते शीख सैनिकदेखील मूठभरच होते. त्यांच्या भोंवतालीं पठाण गनीम दबा धरून बसले होते व त्यांच्यावर गोळया झाडीत होते. त्यांनीं पळ काढण्यास सुरुवात केली. ते एकूण वीसजण होते.

माघार घेतांना चर्चिलनीं एका मृत सैनिकाची बंदूक घेऊन पठाणांच्या दिशेनें गोळया झाडण्यास सुरुवात केली. प्रसंग आणीबाणीचा होता. त्या मूठभर सैनिकांना चोहोंबाजूंनीं पठाणांनीं घेरलें होतें. त्यांना कुमक आली नसती तर त्या वेढयांतून त्यांची सुटका होणें कठीण होतें. कुमक मागविण्यासाठीं चर्चिलना पाठविण्याचा कंपनी कमांडरचा विचार होता. त्याच वेळीं त्या सैनिकांची व एका पठाण तुकडीची चकमक उडून बरेच पठाण ठार झाले. पठाणांची हानि जबरदस्त होती. तें पाहून त्यांनीं पळ काढण्यास सुरुवात केली. हिंदी सैनिकांचा माघारीचा मार्ग मोकळा झाला. त्यांनीं देवाचें नांव घेऊन लगबगीनें पळ काढण्यास सुरुवात केली.

आतां तिन्हीसांजा झाल्या होत्या. सकाळीं वेगवेगळ्या दिशांनीं मोहिमेवर गेलेल्या तुकड्या छावणीकडे परतूं लागल्या. त्यांची पुष्कळच हानि झाली होती. पठाणांनीं त्यांना आधींच त्राहि भगवान् करून सोडलें होतें. त्यांतच वादळानेंहि त्यांना झोडपून काढलें. शेवटीं एकदांचे सगळे छावणींत येऊन पोहोंचले. पण जनरल जेफ्रे आणि त्यांचा तोफखाना ह्यांचा पत्ता नव्हता. जनरल सकाळींच बाहेर पडले होते. त्यांच्याबरोबर तोफांशिवाय इंजिनियरिंगची अर्धी कंपनी आणि बारा गोरे अधिकारी होते. आतां रात्र पडली पण जनरल जेफ्रे व त्यांचे सोबती ह्यांचा पत्ता नव्हता. अकस्मात् त्या अंधाऱ्या रात्रीच्या नीरवतेंत तोफेचा आवाज उठला. तो आवाज तीन कोसांवरून आला होता. तदनंतर आणखी आवाज उठले. ती सरबत्ती जेफ्रे ह्यांच्या तोफांची होती. पण तेवढ्या रात्रीं त्यांची कुणाशीं लढाई जुंपली होती तें कळण्याचा मार्ग नव्हता. वेळ रात्रीची असल्यानें जनरल जेफ्रे ह्यांच्या शोधार्थ सैन्य पाठविण्याचीहि सोय नव्हती. कारण सगळीकडे शत्रू होते. शेवटीं पहांटेस बंगाल लान्सर्सच्या सैनिकांना जनरल जेफ्रे ह्यांच्या शोधार्थ पाठविण्याचें ठरलें.

चर्चिलना तोंपर्यंत युद्धाचा अनुभव नव्हता. त्यांना मिळालेला अनुभव अगदीच मामुली होता. आतां त्यांना लढाईचा खराखुरा अनुभव मिळाला. त्या रात्रीं ते पराभव, चिंता आणि उत्कंठा ह्यांनीं भयंकर अस्वस्थ झाले. परिस्थिति अत्यंत आणीबाणीची होती व ती आणखी चिघळण्याची भीति होती. दुसऱ्या दिवशीं बंगाल लान्सर्स जनरल जेफ्रे ह्यांच्या शोधार्थ गेले, तेव्हां ते त्यांना एका पठाण खेड्यांतील वाडीमध्यें खंदक खणून राहिलेले आढळले. त्यांच्या डोक्याला जखम झाली होती. पण ती गंभीर नव्हती. मामुंद टोळीवाल्यांनीं त्यांना रात्रीचें वेढलें होतें. दहा गोऱ्या अधिकाऱ्यांपैकीं चौघे जखमी झाले होते. एकतृतीयांश सैनिक ठार अथवा जखमी झाले होते. शेवटीं एकदांची कुमक आली आणि जनरल जेफ्रे मृत्यूच्या दाढेंतून सुखरूप बाहेर पडले.

इकडे जनरल बिडन ब्लड ह्यांचीहि पुष्कळ हानि झाली होती. जनरल जेफ्रे ह्यांनीं जेव्हां टेकडीवरून खुणांनीं त्यांना आपल्या हानीची कल्पना

दिली, तेव्हां जनरल ब्लड भडकून गेले व त्यांनीं आपल्या सैन्याला टोळीवाल्यांचीं खेडीं तोफा डागून उध्वस्त करण्याचा हुकूम केला. तो हुकूम कांटेकोरपणें अंमलांत आणण्यांत आला. टोळीवाल्यांना आपलीं घरें, बुरूज, जनावरें आणि पिकें नष्ट होत असलेलीं प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं बघावीं लागलीं. पण त्यांनींहि आपल्या शत्रूची हानि कांही कमी केली नव्हती.

******

प्रकरण पांचवें

# तिराची मोहीम

१६ सप्टेंबरच्या चकमकींत बरेच गोरे अधिकारी कामास आले होते. त्यांची जागा भरून काढणें आवश्यक होतें. मामुंद टोळीवाल्यांशीं झालेल्या झटापटींत चर्चिलनीं जरी प्रत्यक्ष भाग घेतला असला तरी ब्रिटिश फौजांतील एक अधिकृत सैनिक म्हणून नव्हे. ते मागें सांगितल्याप्रमाणें, दोन वर्तमानपत्रांचे बातमीदार म्हणून गेले होते. पण आतां अधिकाऱ्यांची कमतरता पडतांच पंजाब पायदळाच्या ३१० तुकडींत त्यांची नेमणूक झाली. त्या नेमणुकीमुळें त्यांची चांगलीच त्रेधातिरपीट उडाली. कारण त्यांना हिंदी भाषा अजिबात येत नव्हती. आणि हिंदी शिपायांना हुकूम द्यायचे झाल्यास हिंदी भाषा अवगत असणें आवश्यक होतें. पण आणीबाणीच्या प्रसंगीं अंतःकरणाची भाषा हीच खरी भाषा असते. दोन भिन्नभाषी माणसें संकटसमयीं एकत्र आलीं असतां त्यांना एकमेकांची अंतःकरणाची भाषा लगेच आकलन होते. चर्चिलनींहि कसेंबसें निभावून नेलें. त्यांना हिंदी भाषा येत नव्हती हें जरी खरें असलें,

तरी अंतःकरणाची भाषा चांगली येत होती. त्या भाषेमुळें त्यांना पंजाबी शिपायांमध्यें काम करणें शक्य झालें.

त्या दरम्यान टोळीवाल्यांच्या प्रदेशांत पेटलेला बंडाचा वणवा सगळीकडे भडकत चालला. १६ सप्टेंबरला मामुंद टोळीवाल्यांनीं ब्रिटिश फौजांवर जो विजय मिळविला त्याचा गाजावाजा शीघ्र गतीनें सगळीकडे झाल्यानें इतर टोळीवाल्यांनींहि बंडाचें निशाण फडकावलें. ह्या टोळीवाल्यांमध्यें आफिरडी टोळीवालेहि होते. हे टोळीवाले सरहद्द प्रांतांत बलाढ्य आणि शूर म्हणून प्रख्यात आहेत. सप्टेंबर महिन्याच्या मध्यापर्यंत ते गप्प होते. पण १६ सप्टेंबरला मामुंद टोळीवाल्यांनीं ब्रिटिश फौजांचा पराभव केल्याचें कळतांच त्या युद्धामध्यें आपण मागें राहिलों तर टोळीवाल्यांच्या प्रदेशांतील आपलें श्रेष्ठत्व जाईल ह्या भीतीनें ते ताबडतोब बंडांत सामील झाले.

आफिरडी टोळीवाल्यांचा प्रदेश 'तिरा' ह्या नांवानें ओळखला जातो. हा टापू पेशावर शहराच्या उत्तरेस व खैबरखिंडीच्या पूर्वेस पसरलेला आहे. तिराचे डोंगर उंच असून तो सबंध प्रदेश पहाडी आहे. आफिरडी टोळीवाल्यांना त्यांच्या शत्रूशीं दीर्घ काल लढा चालू ठेवण्यासाठीं ह्या पहाडी प्रदेशाचा नेहमींच उपयोग होत आला आहे.

आफ्रिडी टोळीवाल्यांनीं बंडास प्रारंभ करतांच हिंदुस्थान सरकारला त्यांच्याविरुद्ध मोहीम सुरू करणें भाग पडलें. ह्या मोहिमेला दोन तुकड्या आणि तीन ब्रिगेड्स मिळून पस्तीस हजार सैन्याची आवश्यकता होती. तें सैन्य पेशावर आणि कोहट ह्या दोन शहरांच्या जवळपास गोळा करण्यांत आलें. त्या क्षणापर्यंत कुठल्याच गोऱ्या सैन्याचे पाय तिराला लागले नव्हते असें सांगतात. अफगाण युद्धानंतरची ती सर्वांत मोठी लश्करी मोहीम होती. त्या मोहिमेचीं सूत्रें ब्रिटिश फौजांतील एक अनुभवी लश्करी अधिकारी जनरल विलियम लॉकहार्ट ह्यांच्याकडे सुपूर्त करण्यांत आलीं होतीं. त्या स्वारीला पूरक मदत म्हणून सर बिंडन ब्लड ह्यांनीं मालकंद एजन्सींतील लश्करी हालचाली तशाच चालू ठेवायच्या होत्या.

तिराच्या मोहिमेंत भाग घेण्याची चर्चिल ह्यांची फार मोठी इच्छा होती. पण जनरल लॉकहार्ट ह्यांच्या लश्करांत त्यांच्या परिचयाचा एकहि

वजनदार अधिकारी नव्हता. नाहीं म्हणायला कर्नल इयान हॅमिल्टन हे एक होते, परंतु ते कोहट खिंड ओलांडतांना घोड्यावरून पडून जखमी झाल्यानें मागें राहिले होते. त्यांचा पाय मोडला होता. अशा परिस्थितींत चर्चिलची स्थिति धड इकडेहि नाहीं आणि धड तिकडेहि नाहीं अशी झाल्यानें त्यांच्या रेजिमेंटच्या कर्नलनीं त्यांना बंगलोरला माघारा बोलविलें.

इकडे तिराच्या स्वारींत ब्रिटिश फौजांची प्रचंड हानि झाली. शेकडों सैनिक आणि सहस्रावधि जनावरें ठार झालीं. त्या अपयशाच्या बातमीनें चर्चिल नाउमेद झाले नाहींत. त्या मोहिमेंत भाग घेण्याची त्यांची अद्याप इच्छा होती. पण त्यांना मदत करणारा कुणीच नव्हता. अशा प्रसंगीं त्यांच्या आईकडून त्यांना मदत व्हायची. पण या वेळीं तिलाहि अपयश आलें. तरीहि चर्चिल नाउमेद झाले नाहींत. त्यांनी कलकत्त्याला व्हाईसरॉय लॉर्ड एल्गिन ह्यांची भेट घेऊन त्यांना आपणांस तिराच्या मोहिमेवर पाठविण्याची विनंती करण्याचें ठरविलें. व्हाईसरॉय लॉर्ड एल्गिन हे तरुण अधिकाऱ्यांना मदत करण्यास नेहमीं तत्पर असतात असें चर्चिलनीं ऐकलें होतें. पण लाट साहेबांची मुलाखत मिळणें हें एक कठीण काम होतें. त्यांच्या ए. डी. सी. ला चर्चिलना मदत करतां आली असती पण त्यानें चर्चिलच्या विनंतीस साफ नकार दिला

चर्चिलनीं अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटून पाहिलें, पण कुठेंच त्यांची डाळ शिजली नाहीं. शेवटीं ते हताश होऊन बंगलोरला माघारी परतले. त्या वर्षीच्या पावसाळ्यांत त्यांनी आपला पहिला ग्रंथ लिहिला. त्यांची 'डेली टेलिग्राफ' या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेलीं मालकंद मोहिमेवरील वार्तापत्रें इंग्लंडमध्यें फारच लोकप्रिय झाली होतीं. अलाहाबादच्या 'पायोनियर' पत्रानेंहि त्यांची तोंडभर स्तुति केली होती. त्या भांडवलावर त्यांनीं साहित्यसृष्टींत प्रवेश करण्याचें ठरविलें. त्यांनीं मालकंद मोहिमेवर एक ग्रंथ लिहिण्याचें ठरविलें. त्याच विषयावर लॉर्ड फिंकासल हेहि एक ग्रंथ लिहीत असल्याचें त्यांच्या मित्रांकडून त्यांना कळलें. त्यामुळें तो ग्रंथ शक्य तितक्या लवकर पुरा करण्याची त्यांना घाई झाली. लॉर्ड फिंकासल आणि चर्चिल ह्या दोघांमधली ती एक शर्यतच म्हटली तरी चालेल. चर्चिलनीं रोज

पांच तास खर्च करून आपला ग्रंथ पूर्ण केला व त्याचें हस्तलिखित इंग्लंडला आपल्या आईकडे पाठवून दिलें. तिनें तो ग्रंथ लाँगमन प्रकाशन संस्थेमार्फत प्रकाशित करण्याचीं व्यवस्था केली.

चर्चिलना आतां लिहिण्याचा सराव झाला असल्यानें त्यांनीं एक कादंबरी लिहिण्यास सुरुवात केली. त्यांच्याबरोबरच्या इतर अधिकाऱ्यांना जेव्हां हें कळलें, तेव्हां त्यांनीं यथेच्छ थट्टा केली. पण त्या थट्टेनें चर्चिल नाउमेद झाले नाहींत. त्यांनीं निर्धारानें ती कादंबरी लिहिली. ती 'मॅक्लीन' मॅगझिनमध्यें 'साव्ऱ्होला' ह्या नांवानें क्रमशः प्रसिद्ध झाली. नंतर ती पुस्तकरूपानें प्रकाशित होऊन तिच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. त्या कादंबरीचा त्यांना सातशें पौंडांचा मोबदला मिळाला. परंतु ही कादंबरी नंतर चर्चिलना आवडली नाहीं. इतकेंच नव्हे तर आपल्या मित्रांना देखील ती न वाचण्याबद्दल ते बजावीत. साहजिकच आहे, विशींतील एका अननुभवी लेखकानें काल्पनिक विषयावर लिहिलेली ती कादंबरी नंतर आवडली नसल्यास नवल नाहीं. त्याच वेळी त्यांचा मालकंद मोहिमेवरील ग्रंथ प्रकाशित होऊन त्याची एक प्रत त्यांच्या हातांत पडली. तो ग्रंथ प्रकाशित होतांच त्यांना आपल्या स्वतःचा कोण अभिमान वाटला ! त्या ग्रंथामुळें त्यांना चांगलीच प्रसिद्धि मिळाली.

इतकेंच नव्हे, तर टीकाकारांनींदेखील त्याची प्रशंसा केली. चर्चिल शाळेंत होते, तेव्हां त्यांचे शिक्षक त्यांना 'सामान्य विद्यार्थी' म्हणून हिणवीत. पण आता ते असामान्य झाले होते. ज्या लोकांनी व्यक्तिशः पत्रें पाठवून त्यांचें अभिनंदन केलें, त्यांत प्रिन्स ऑफ वेल्स (नंतरचे सातवे एडवर्ड) हे एक होते. त्यांना चर्चिलचा ग्रंथ फार आवडला होता. त्या दरम्यान यांनीं तिराच्या मोहिमेंत भाग घेण्याची खटपट सोडली नव्हती. मागें आलेंच आहे कीं, कर्नल इयान हॅमिल्टन ह्या नांवाचे त्यांचे तिराच्या मोहिमेवर गेलेले एक स्नेही घोड्यावरून पडून जखमी झाल्यान माघारी परतले होते. त्यांच्याशीं त्यांचा पत्रव्यवहार चालू होता. ते बरे झाल्यावर चर्चिलना त्यांनीं कळविलें की, त्यांनीं तिराच्या मोहिमेचे सरसेनानी जनरल विलियम लॉकहार्ट ह्यांच्या ए. डी. सी.ना भेटावें म्हणजे ते त्यांना मोहिमेवर जाण्यासाठीं मदत करतील.

जनरल लॉकहार्ट ह्यांचे ए. डी. सी. हल्डाने ह्या नांवाचे गृहस्थ होते. त्यांना कर्नल हॅमिल्टन ह्यांनीं पत्र लिहून चर्चिलना मदत करण्याची विनंती केली होती. चर्चिलना कर्नल हॅमिल्टन ह्यांचें पत्र मीरत येथें मिळालें. ते तिकडे एका फुटबॉलच्या सामन्याला गेले होते. पत्र मिळतांच ते परभारेंच पेशावरला रवाना झाले. तिकडे पोहोंचल्यावर त्यांनीं लगेच मि. हल्डाने ह्यांची भेट घेतली व आपल्या आगमनाचा हेतु त्यांना विदित केला. हल्डाने हे वास्तविक एक करड्या शिस्तीचे अधिकारी होते. पण त्यांनीं चर्चिलना मोठ्या सौजन्यानें वागविलें. त्यांनीं त्यांना आपल्या कचेरींत बसावयास सांगितलें. नंतर ते सर विलियम लॉकहार्ट ह्यांच्या भेटीस गेले. ते त्यांच्या कॅबिनमधून बाहेर आले तेव्हां त्यांच्या चर्येवर समाधानाची छटा झळकत होती. सर विलियम लॉकहार्ट ह्यांनीं एक वरिष्ठ अधिकारी म्हणून चर्चिलना घण्याचें कबूल केलें होतें. हल्डाने ह्यांनीं तो निर्णय लगेच हिंदुस्थान सरकारला व चर्चिलच्या रेजिमेंटच्या कर्नलनाहि कळविण्याची तत्परता दर्शविली.

चर्चिलची एकदम बढती झाली. त्यांच्या नशिबानें त्यांना पुनः एकदां हात दिला. त्यांची नेमणूक गॅझेटमध्येंहि प्रसिद्ध झाली. बंगलोरहून त्यांचे घोडे आणि नोकर पेशावरला पाठविण्यांत आले.

जनरल सर विलियम लॉकहार्ट ह्यांच्या हेडक्वार्टर्सवर चर्चिलच्या परिचयाचें कुणीच नव्हतें. त्यामुळें त्यांचे सुरुवातीचे दिवस एकलकोंडेपणांत गेले. पुढें त्यांचा जनरल साहेबांचे ए. डी. सी. कॅ. हल्डाने ह्यांच्याशीं परिचय झाला व त्याची परिणति स्नेहांत झाली. ते दोघे एकत्र फिरावयास जात व बराच वेळ गप्पागोष्टीहि करीत.

एके दिवशीं कॅ. हल्डाने ह्यांच्याकडून चर्चिलना कळलें कीं, हिंदुस्थानांतून माघारीं पाठविण्यांत आलेल्या एका ब्रिटिश वार्ताहरानें 'फॉर्टनाइटली रिव्ह्यु' ह्या नांवाच्या नियतकालिकांत लेख लिहून तिराच्या मोहिमेची सडकून हजेरी घेतली आहे. ती टीका सर विलियम लॉकहार्ट ह्यांना झोंबल्यामुळें त्यांनीं उपरिनिर्दिष्ट नियतकालिकाला एक लेखाचें खंडन करणारें पत्र लिहिलें असल्याचेंहि चर्चिलना कॅ. हल्डाने ह्यांनीं सांगितलें. त्यांनीं जेव्हां त्या

पत्रासंबंधीं चर्चिलचें मत विचारलें तेव्हां चर्चिल म्हणाले कीं, जनरलनीं तें पत्र लिहायला नको होतें. कारण, तो वार्ताहर माघारी पाठविला गेलेला असल्यानें त्यानें सर लॉकहार्ट ह्यांच्यावर टीका करणें साहजिक आहे. अशी रागाच्या भरांत केलेली टीका लक्षांत घ्यावयाची नसते. चर्चिलचा हा दृष्टिकोन ऐकून कॅ. हल्डाने अस्वस्थ झाले. रात्रीं छावणीमध्यें त्या विषयावर चर्चा झाली. चर्चिलचा दृष्टिकोन सगळ्यांनाच पसंत पडला. परंतु ' फॉर्टनाइटली रिव्ह्यू'कडे पाठविलेलें पत्र कसें परत मिळवावयाचें हा प्रश्न कॅ. हल्डाने ह्यांना पडला. चर्चिलनीं त्यांना सल्ला दिला कीं, त्यांनीं त्या नियतकालिकाच्या संपादकांना तार करून पत्र प्रसिद्ध न करण्याची विनंति करावी. त्या सल्ल्याप्रमाणें कॅ. हल्डाने ह्यांनीं ' फॉर्टनाइटली रिव्ह्यू'च्या संपादकांना तार करून पत्र प्रसिद्ध न करण्याबद्दल बजावलें. अशा रीतीनें केवळ चर्चिल ह्यांच्या समयोचित सल्ल्यामुळें सर विलियम लॉकहार्ट ह्यांच्या मोठेपणाचें रक्षण झालें. तिराची मोहीम व्यापक आणि तीव्र करण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार होता. परंतु उभयपक्षांमध्यें वाटाघाटी होऊन तो प्रश्न सामोपचारानें मिटला.

******

प्रकरण सहावें

## सुडानची मोहीम

वायव्य सरहद्द प्रांतांतील लष्करी मोहीम समाप्त होते न होते तोंच सुडानमध्यें लष्करी मोहीम सुरू होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. इंग्लंडचे पंतप्रधान लॉर्ड सालिस्बरी ह्यांनीं सुडानमध्यें खार्टूम शहरापर्यंत आक्रमण

करून व त्या टापूंतील दरवेशांची सत्ता नष्ट करून तिथल्या प्रजेला जुलमी राजवटीपासून मुक्त करण्याची भापा सुरू केली होती. तिराची मोहीम समाप्त झाल्यावर त्या मोहिमेंत भाग घेणारें लश्कर बरखास्त करण्यांत आलें. त्याच वेळीं सुडानची मोहीम सुरू झाली. त्या मोहिमेचें नेतृत्व जनरल सर हर्बर्ट किचनेर ह्यांच्याकडे देण्यांत आलें, त्यांचें सैन्य वीस हजार होतें. ह्या सैन्यानें नाईल आणि अगबार ह्या दोन्ही नद्यांच्या संगमापर्यंत चाल करून खलिफा महमुद ह्याच्या सैन्याचा पराभव केला. सुडानच्या मोहिमेचा तो पहिला टप्पा होता. तदनंतर दुसऱ्या टप्प्यास सुरुवात झाली.

सुडानच्या मोहिमेंत भाग घेण्याची चर्चिलची इच्छा होतीच पण पूर्वी-प्रमाणें या वेळीहि त्यांना खटपट करावी लागली. अनेक लोकांनीं त्यांच्या प्रयत्नांत कोलदांडा घातला. कारण, कुणीतरी त्या लोकांचे त्यांच्या विरुद्ध कान फुंकले होते. पहिली गोष्ट म्हणजे त्यांचा उत्कर्ष त्यांच्या हितशत्रूंना सहन होत नव्हता. त्यांनीं आतांपर्यंत अनेक लश्करी मोहिमांत भाग घेतला होता. त्या मोहिमांवर वृत्तपत्रांत वार्तापत्रें लिहिलीं होतीं आणि ग्रंथहि लिहिले होते. दुसरी गोष्ट म्हणजे नियमित नोकरी न करतां त्यांना बढतीहि मिळत होती. त्यांच्या दर्जाच्या व वयाच्या इतर अधिकाऱ्यांच्या मानानें त्यांनीं केलेली प्रगति फारच मोठी होती. म्हणून लोक त्यांचा मत्सर करीत होते. सुडानच्या मोहिमेंत चर्चिलना प्रवेश मिळू नये म्हणून त्यांच्या शत्रूंनीं पुष्कळ कारस्थानें केलीं. खुद्द त्या मोहिमेचे सेनापति सर हर्बर्ट किचनेर ह्यांचा-देखील त्यांना विरोध होता. पण चर्चिलची चिकाटी मोठी. त्यांनीं तिसऱ्या मोहिमेंत भाग घेतला असल्यानें त्यांना रजेवर जाण्याचा हक्क होता. ते रजा काढून थेट इंग्लंडला गेले व तिथून सुडानच्या मोहिमेंत भाग घेण्याची त्यांनीं खटपट सुरू केली. ती खटपट यशस्वी होण्याची फारच थोडी आशा होती. पण त्याच वेळीं एक अनपेक्षित घटना घडली आणि चर्चिलची मनीषा फलद्रूप झाली.

त्या वेळचे पंतप्रधान लॉर्ड सालिस्बरी व चर्चिलचे वडील मरहूम लॉर्ड रँडॉल्फ ह्या दोघांचे राजकीय संबंध विशेष सलोख्याचे नव्हते. असें सांगतात कीं, लॉर्ड सालिस्बरी ह्यांनीं चर्चिल ह्यांचा मालकंद मोहिमे-वरील ग्रंथ केवळ योगायोगानें वाचला असतां तो त्यांना फार आवडला.

तदनंतर एके दिवशीं त्यांना चर्चिलचा परिचय करून घेण्याची इच्छा झाली व आपल्या खासगी चिटणीसांमार्फत त्यांना त्यांनीं आपल्या भेटीस बोलाविलें. चर्चिलनीं त्या भेटीच्या निमंत्रणाचा लगेच स्वीकार केला. ती भेट जूनच्या तिसऱ्या आठवड्यांत झाली.

लॉर्ड सालिस्बरी हे हुजूरपक्षीय पंतप्रधान होते. त्यांच्या पक्षाप्रमाणेंच ते अत्यंत कर्मठ होते. ते आधुनिक विचारांचे विरोधक आणि जुन्या परंपरेचे अभिमानी होते. पण विशेष महत्त्वाची गोष्ट ही कीं ते साम्राज्यवादी होते. सुडानची मोहीम त्यांनी स्वत:च्या इच्छेनें सुरू केली होती. चर्चिलची आणि त्यांची मुलाखत परराष्ट्रखात्याच्या कचेरींत झाली.

" तुमचा ग्रंथ मला फार आवडला," लॉर्ड सालिस्बरी म्हणाले.

" तुमच्या ग्रंथाचा विषय तर चांगला आहेच, पण तुमची शैलीदेखील आल्हाददायक आहे. तुमच्या ग्रंथामुळें मला वायव्य सरहद्दीवरील परिस्थितीची पूर्ण कल्पना झाली. ब्रिटिश साम्राज्याचा पंतप्रधान ह्या नात्यानें ती परिस्थिति जाणून घेणें हें माझें कर्तव्य होतें."

लॉर्ड सालिस्बरी हे आपली दहा पंधरा मिनिटांत बोळवण करतील अशी चर्चिल ह्यांची कल्पना होती. पण लॉर्ड सालिस्बरी ह्यांनीं त्या भेटीला अनौपचारिक स्वरूप देऊन जवळजवळ अर्धा तास ते चर्चिलशीं बोलले. मुलाखतीनंतर चर्चिलना ते दारापर्यंत पोहोचविण्याकरितां आले. ते त्यांना म्हणाले,

" माझ्या राजकीय जीवनांतील अनेक महत्त्वाचे दिवस मी तुमच्या वडिलांच्या सहवासांत घालविले आहेत. माझ्या हातून तुमचें एखादें काम व्हायचें असल्यास तें करण्यास मला आनंद होईल. तुम्ही अनमान न करतां तें काम मला बेशक सांगा."

चर्चिलनीं घरीं आल्यावर लॉर्ड सालिस्बरी ह्यांच्या शेवटच्या उद्गारावर बराच वेळ विचार केला. त्या म्हाताऱ्याला पेचांत टाकण्याचा त्यांचा विचार नव्हता, पण इलाज नव्हता. चर्चिलनीं लॉर्ड सालिस्बरी ह्यांच्या खासगी चिटणिसांकडून त्यांच्या कानावर आपली सुडानच्या मोहिमेंत भाग घेण्याची इच्छा घातली. त्याच दिवशीं पंतप्रधानांच्या वतीनें जनरल किचनेर ह्यांना तार गेली. त्या तारेंत म्हटलें होतें की, ' मि. चर्चिल ह्यांना

सुडानच्या मोहिमेंत प्रवेश मिळाला तर पंतप्रधानांना आनंद होईल, पण नकारार्थी उत्तर आलें. सर्व जागा भरल्याचें पंतप्रधानांना कळविण्यांत आलें.

चर्चिलची घोर निराशा झाली. पण ते गप्प बसणारे गृहस्थ नव्हते. त्यांनीं आपल्या वडिलांच्या एका मित्रामार्फत युद्धमंत्र्यांकडे वशिला लावला. सुडानच्या मोहिमेंत ज्या लश्करी तुकड्यांनीं भाग घेतला होता, त्यांतल्या एका तुकडीचा युद्धखात्याशीं प्रत्यक्ष संबंध होता.त्या तुकडींतील अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याचा अधिकार त्या खात्याला होता.

दोन दिवसांनीं युद्धखात्याकडून चर्चिलना कळविण्यांत आलें कीं, त्यांची नेमणूक सीनियर लेफ्टनंट म्हणून २१व्या लान्सर्समध्यें झाली आहे. चर्चिलनीं ती नेमणूक लगेच मान्य केली. मालकंद मोहिमेप्रमाणें या वेळींहि चर्चिलनीं 'मॉर्निंग पोस्ट' ह्या नांवाच्या नियतकालिकाशीं वार्तापत्रें लिहिण्याचा करार केला. त्या नियतकालिकानें त्यांना दर स्तंभाला पंधरा पौंड मोबदला देण्याचें कबूल केलें. नेमणुकीची तार हातीं पडल्याच्या दुसऱ्याच दिवशीं चर्चिल कैरोला रवाना झाले.

सर हर्बर्ट किचनेर हे एक करड्या शिस्तीचे सेनापति होते. चर्चिलची नेमणूक युद्धखात्याने त्यांच्या विरुद्ध केली असल्याने ते आपणांस इंग्लंडला माघारीं पाठवून तर देणार नाहींत ना अशी चर्चिलना भीति वाटत होती. पण सुदैवानें तसें कांहीं घडलें नाहीं.

लॉर्ड किचनेर ह्यांचें सैन्य दरमजल करीत सुडानच्या राजधानीच्या दिशेनें चाललें होतें. दुसऱ्या बाजूनें दरवेशी सेनाहि ब्रिटिशांशीं लढाई देण्याची जय्यत तयारी करीत होती. त्या दोन्ही सैन्यांची गांठ ओंदुरमन येथें पडली. चर्चिल बिनीच्या तुकडींत होते. शत्रूची टेहळणी करण्याचें काम त्या तुकडीकडे होतें. शत्रुसैन्य चालून येत असल्याचें त्या तुकडीच्या निदर्शनास आलें, तेव्हां ती वार्ता ब्रिटिश सैन्याच्या मुख्य तळावर कळविण्याकरितां एक जासूद पाठविण्यांत आला. तें काम चर्चिलकडे सोंपविण्यांत आलें. चर्चिल दौडत माघारीं निघाले. त्यांना दहा किलोमीटरचें अंतर कापायचें होतें. अंग भाजून टाकणारें ऊन सर्वत्र रणरणत होतें. त्या उन्हांतून चर्चिल ब्रिटिश लश्कराकडे भरधांव निघाले होते.

ब्रिटिश सैन्य एकूण पांच ब्रिगेड्सचें होतें. सैन्यामागें तोफखाना आणि त्याच्यामागें दारूगोळा लादलेल्या उंटांची अमर्याद कारवानें येत होतीं. तें दृश्य खरोखरच प्रेक्षणीय होतें. तें दृश्य पाहून चर्चिलच्या अंगावर तर रोमांच उभे राहिले. ब्रिटिश सैन्याबरोबरच नाईल नदींतून वाफेवर चालणाऱ्या आठ मोठ्या गनबोटी ओंदुरमनच्या दिशेनें निघाल्या होत्या. त्याचप्रमाणें वाळवंटाच्या बगलेनें घोडदळाचे दहाबारा 'स्क्वॅड्रन्स' निघाले होते.

जनरल किचनेर ह्यांचें सैन्य दृष्टिपथांत येतांच चर्चिलनीं आपल्या घोड्याचा वेग कमी केला. ते हळूहळू पायदळाच्या सामोरा गेले. जनरल किचनेर एकटेच चालले होते. त्यांच्या दोन्ही बाजूंनीं त्यांच्या युद्धमंडळा-मधले अधिकारी जात होते. चर्चिल उजव्या कोनांत किचनेरच्या जवळ गेले. त्यांनीं अर्धवर्तुळ केलें, घोडा बाजूस ठेवला व सेनापतीच्या थोडें मागें जाऊन त्यांना सलामी ठोकली. किचनेरनीं गंभीर नजरेनें त्यांच्याकडे बघितलें. चर्चिल त्यांना म्हणाले,

"महाराज, मीं २१ व्या लान्सर्सकडून आपणांस शत्रुसैन्याची माहिती सादर करण्यासाठीं आलों आहें."

किचनेरनीं चर्चिलना खुणेनेंच बातमी सांगण्याची आज्ञा केली. त्याबरोबर त्यांनीं अहवाल सांगण्यास सुरुवात केली. किचनेरनीं ती साद्यंत हकीगत निमूटपणें ऐकून घेतली व ते म्हणाले, "शत्रुसैन्याची व आपली गांठ किती वेळानें पडेल असें आपणांस वाटतें?"

"सुमारें दीड तासानें," चर्चिल म्हणाले.

किचनेरनीं मान हलविली व चर्चिलना जाण्यास सांगितलें.

चर्चिलनीं सलामी ठोकून कूच करण्यास सुरुवात केली. दुसऱ्या दिवशीं दरवेशी सैन्याची व चर्चिलच्या बिनीच्या तुकडीची गांठ पडली. चर्चिलनीं आपल्या हाताखालच्या सैनिकांना चारशें मीटर्सच्या अंतरावरून शत्रूवर गोळी-बार करण्याचा हुकूम केला. शत्रुसैन्य खवळलेल्या समुद्राप्रमाणें पुढें सरकत होतें. त्या दरम्यान चर्चिल लॉर्ड किचनेर ह्यांच्या मुख्य सैन्याला जासूद पाठवून शत्रुसैन्याच्या हालचालींची बातमी पुरवीत होते. त्यांच्या हाताखालच्या सैनिकांची व शत्रूच्या बिनीच्या सैन्याची चकमक सुरू झाली, तेव्हां त्यांना

किचनेरकडे पाठविलेला एक घोडेस्वार धांपा टाकीत पळतच आला. त्यानें चर्चिलना सेनापति किचनेर ह्यांचा पुढील निरोप आणला होता : " तुमचें ठाणें जितका वेळ लढवितां येईल तितका वेळ लढवा. आणि आम्हांला शत्रूच्या हालचालींची वरचेवर बातमी कळवा. "

चर्चिलना आणखी काय हवें होतें ? ब्रिटिश फौजांच्या सेनापतींशीं त्यांनीं प्रत्यक्ष दळणदळण ठेवलें होतें व ओंदुरमनच्या लढाईंत भाग घेणारी त्यांची तुकडी पहिली होती. तें भाग्य आणि तो मान खरोखरच मोठा होता यांत शंका नाहीं.

खलिफाचें लश्कर साठ हजारांचें होतें. तें लश्कर सकाळपासून शिस्तींत चाल करून येत होतें. त्या दोन्ही सैन्यांची ध्येयें निरनिराळीं होतीं. ब्रिटिश-सैन्य साम्राज्यवाढीसाठीं सुडानमध्यें आलें होतें; तर खलिफाचें सैन्य धर्मा-साठीं लढणार होतें. खलिफाचें सैन्य कडवें होतें, परंतु त्यांचीं शस्त्रें जुनीं पुराणीं होतीं. ह्याच्या उलट ब्रिटिश सैन्य अवघें वीस हजारांचें होतें खरें, परंतु त्यांचीं शस्त्रें अद्ययावत् होतीं. दरवेशी सैन्य माऱ्याच्या टप्प्यांत येताच नाईल नदींतील ब्रिटिश युद्धनौकांनीं त्याच्यावर एकदम सरबत्ती सुरू केली.

युद्धनौकांवरील तोफा एकूण साठ किंवा सत्तर होत्या. त्या तोफांच्या सरबत्तीमुळें दरवेशी सैन्याच्या हल्ल्याच्या योजनेंत व्यत्यय आला. सहा किंवा सात हजार सैन्य जमिनीवर कोसळलें. दरवेशी सैन्यापाशीं विविध नमुन्याच्या वीस हजार बंदुका होत्या. त्यांतील कांहीं बंदुका आपोआप उडणाऱ्या होत्या तर कांहीं आगीनें उडवायच्या व भरून उडवायच्या होत्या. ज्या वेळीं दर-वेशांनीं पाहिलें कीं, ब्रिटिशांवर भाल्यांचा हल्ला करणें अशक्य आहे, तेव्हां त्यांच्यामधल्या बंदुकधारी सैनिकांनीं खालीं पडून बंदुका झाडण्यास सुरुवात केली. तो गोळीबार शिस्तींत होत नव्हता, हें जरी खरें असलें तरी तो प्रखर होता ह्यांत शंका नाहीं. त्या गोळीबारांत सुमारें दोनशें अँग्लो-इजिप्शियन सैनिक खालीं कोसळले. तथापि अँग्लो-इजिप्शियन सैन्यानें दरवेशांचा पहिला हल्ला परतवून लावण्यांत यश मिळविलें.

शत्रु माघारा फिरल्याचें पाहताच सेनापति किचनेर ह्यांनीं आपल्या सैन्यांतील पांच ब्रिगेडस्ना शत्रुसैन्यावर नदीच्या डाव्या बाजूनें चाल

करण्याचा हुकूम केला. पण शत्रुसैन्याची ती बगल भक्कम अशीच होती. त्याशिवाय खलिफापाशीं पंधरा हजार राखीव सैन्य होतें तें वेगळेंच. ब्रिटिशांनीं दरवेशी सैन्याच्या डाव्या बगलेवर हल्ला चढवितांच तें पंधरा हजार सैन्य दौडत चाल करून आलें. शत्रुसैन्याचा हा दुसरा हल्ला पहिल्यापेक्षां तीव्र होता. त्या सैन्याकडून ब्रिटिश सैन्यांतील बिनीच्या सुडानी ब्रिगेडचा पार धुव्वा उडणार होता. पण त्या ब्रिगेडचे सेनापति जनरल हेक्टर मॅक्डोनल यांच्या प्रसंगावधानामुळें तो नाश टळला. क्षणभर दोन्ही बाजूंचा घनघोर संग्राम होऊन वीस हजार सैनिक धारातीर्थी पडले. आधुनिक शस्त्रांनीं मागासलेल्या शस्त्रांवर विजय मिळविला. अँग्लो–इजिप्शियन सैन्याला दरवेशी फौजांना उधळून लावण्यांत यश आलें. या सैन्यानें पळ काढण्यास सुरुवात केली व हां हां म्हणतां तें सुडानच्या वाळवंटांतील अद्भुतरम्य मृगजळांत शिरून अदृश्य झालें.

दरवेशी फौजांचा मुख्य भाग जरी पळून गेला असला तरी या सैन्याचा बराच मोठा भाग ओंदुरमन शहराच्या बाजूनें होता. त्या सैन्याचा निःपात करण्याचा हुकूम २१ वी लान्सर्स इजिप्शियन घोडदळ आणि आफ्रिकन उंटदळ ह्यांना झाला. २१ वी लान्सर्स तर ओंदुरमन शहराच्या अगदीं नजीक होती. एका जनरलनें त्या सैन्याला चाल करण्याचा हुकूम देतांच घोडदळाच्या चारहि स्क्वॅड्रन्सनीं घोड्यांना टांच देऊन पळण्यास प्रारंभ केला. या घोडेस्वारांमध्यें चर्चिल एका प्लाटूनचें नेतृत्व करीत होते. त्या प्लाटूनमध्यें पंचवीस सैनिक होते. घोडदळ दौडत येत असलेलें पाहातांच दरवेशी सैन्यानें त्यांच्यावर खच्चून गोळीबार सुरू केला. जिवावर उदार झालेल्या एका सैन्याचा तो प्रतिकार होता. त्या तुफानी घोडदौडींत चर्चिलनींहि भाग घेतला होता. अकस्मात् त्यांची नजर त्यांच्यासमोर जमिनीवर कोसळलेल्या दोन दरवेशी सैनिकांकडे गेली. ते दोघे सैनिक एकमेकांच्या शेजारीच होते. चर्चिलनीं आपल्या घोड्यास एकदम टांच लावली. त्याबरोबर त्यांचा घोडा त्या दोघां सैनिकांवरून उडून गेला. पण उडून जातांना त्या दोघांनीं चर्चिलवर एकदमच गोळ्या झाडल्या. चर्चिलनीं मागें वळून पाहिले, तेव्हां त्यांतला एकजण मरून पडलेला त्यांना दिसला, तो

सैनिक त्यांच्याच गोळ्यांनीं ठार झाला कीं काय हें चर्चिलना बघतां आलें नाहीं.

वास्तविक चर्चिल त्या दोघा दरवेशी सैनिकांच्या गोळीबारांत ठार व्हावयाचे. परंतु त्यांच्या घोड्याच्या हुशारीनें ते बचावले. ते दोघे सैनिक जरी खालीं कोसळले असले, तरी तो त्यांचा गनिमी कावा होता. चर्चिल माऱ्याच्या टप्प्यांत येतांच त्यांच्यावर गोळ्या झाडून त्यांना ठार करण्याच्या इराद्याने ते दोघे घायाळ झाल्याच्या मिषानें तेथें पडून राहिले होते. त्यांच्या घोड्याच्या तें ध्यानीं आल्यानें त्यानें त्यांच्यावरून एकदम उड्डाण केलें होतें. घोडा यत्किंचितहि न थांबतां पळतच टेकडीवर गेला. चर्चिलनीं आजूबाजूस दृष्टिक्षेप केला. दरवेशी सैनिक जिकडे तिकडे पळत असलेले त्यांना दिसले. त्यांच्या समोरच एक दरवेशी सैनिक पडलेला होता. तो भेदरलेला दिसत होता खरा, परंतु चर्चिलच्या घोड्याच्या पायावर आपल्या वाकड्या तलवारीचा वार करण्याच्या पवित्र्यांत तो असलेला चर्चिलना दिसला. चर्चिलनीं प्रसंगावधान राखून घोड्याचा लगाम खेंचला व त्या दरवेशी सैनिकावर पिस्तुलाच्या दोन गोळ्या झाडल्या. अकस्मात् त्याच वेळीं आणखी एक दरवेशी सैनिक आपली तलवार उपसून त्यांच्यावर चाल करून आला. तो सैनिक चर्चिलच्या इतका जवळ आला कीं, त्यांना त्याच्या तलवारीचादेखील स्पर्श झाला. चर्चिलनीं त्याच्यावरहि आपलें पिस्तुल झाडलें. त्याला गोळी लागली कीं काय तें चर्चिल पाहूं शकले नाहीत, पण तो पळून गेलेला त्यांना दिसला. त्याच वेळीं आणखी एक अरब घोडेस्वार त्यांच्या रोखानें आला. त्याच्यावरहि चर्चिलनीं गोळी झाडली. पण तो सैनिक बगल देऊन निघून गेला.

चर्चिल त्या टेकडीवर एकटेच होते. त्यांच्या प्लाटूनमधील सैनिकांचा कुठेंच मागमूस नव्हता. सगळीकडे दरवेशी सैनिक दिसत होते. त्यांच्या मुख्य सैन्याचा जरी मोड झाला असला तरी ते जिवावर उदार होऊन ब्रिटिश सैन्यावर तुरळक हल्ले चढवीत होते. त्यांच्या तावडींत सांपडणाऱ्या अँग्लो-इजिप्शियन सैनिकांना यमसदनास पाठविण्याचा त्यांनीं सपाटा सुरू केला होता.

चर्चिलना लढाई सुरू झाल्यासून भीतीचा असा स्पर्श झाला नव्हता. त्यांच्या अंगांत रणदेवतेनें संचार केला होता. पण आतां जेव्हां ते त्या जिवावर उदार होऊन लढणाऱ्या दरवेशी सैन्यामध्यें एकटेच सांपडले, तेव्हां त्यांना भीति वाटली. त्यांच्यापासून थोडयाच अंतरावर दोन बंदुकधारी दरवेशी सैनिक त्यांना दिसलें. त्यांनीं चर्चिलवर बंदुका रोखतांच त्यांनीं घोडयास टांच देऊन एकदम पळ काढला. सुमारें चारशें मीटर्सचें अंतर कापल्यावर त्यांना त्यांची प्लाटून दिसली. त्यांच्या प्लाटून शिवाय आणखी तीन प्लाटून जवळच होत्या. अकस्मात् चर्चिलच्या प्लाटूनमध्यें एक दरवेशी सैनिक उपस्थित झाला. तो कुठून आला तें कळण्याला मार्ग नव्हता. तो एखाद्या झाडींत किंवा जमिनींतील खड्डयांत लपून बसला असण्याची शक्यता होती. चर्चिलच्या प्लाटूनमधले सैनिक त्याच्यावर एकदम तुटून पडले. पण त्यानें सगळयांना गुंगारा दिला. तो जखमी झाला होता. पण चर्चिल समोर दिसतांच तो आपला भाला उगारून त्यांच्यावर चाल करून आला. चर्चिलनीं त्याच्यावर गोळी झाडली. तो एकदम खालीं कोसळला आणि गतप्राण झाला. एका निमिषार्धांत त्यांनीं एका मनुष्याला ठार केलें होतें. पण त्यांना त्या मनुष्याविषयीं विचार करण्यास सवड नव्हती. त्यांच्या पिस्तुलांतील गोळया संपल्या होत्या त्यांनीं त्यांत आणखी दहा गोळया भरल्या.

पण आतां लढाई समाप्त व्हायला आली होती. दरवेशी सैन्यानें रणांगणांतून पळ काढण्यास सुरुवात केली होती. ओंदुरमनची लढाई अँग्लो-इजिप्शियन सैन्यानें जिकली होती. त्या लढाईंत उभय पक्षांची पुष्कळ प्राणहानि झाली. परंतु अँग्लो-इजिप्शियनांच्या प्राणहानीच्या मानानें दरवेश्यांची प्राणहानि फार मोठी होती.

******

प्रकरण सातवें

# दक्षिण आफ्रिकन युद्ध

ओंदुरमनच्या लढाईंत दरवेशी सैन्याचा पराभव झाल्यावर चर्चिलच्या २१ व्या लान्सर्स तुकडीला रजा देण्यांत आली. चर्चिल एका शिडाच्या जहाजांत बसून कैरोला रवाना झाले व तिथून त्यांनीं इंग्लंडचा मार्ग धरला. ओंदुरमनच्या लढाईंत चर्चिलचा एक मित्र गंभीर जखमी झाला होता. त्याला त्यांनीं आपल्या दंडावरील त्वचेचा एक नाण्याएवढा तुकडा त्याची जखम बरी होण्याकरितां दिला. ती खूण चर्चिलच्या दंडावर जन्मभर राहिली.

चर्चिलचे आई-बाप लंडनमधील उच्च समाजांत वावरत असल्यानें त्यांचें उत्पन्न त्यांना खर्चाला पुरत नसे. त्यांचें उत्पन्न फार मोठें नसल्यानें चर्चिलचे वडील लॉर्ड रँडॉल्फ हे कांहींच बचत करूं शकले नव्हते. त्यांना कर्ज बरेंच झालें होतें व त्यांच्या मृत्यूनंतर त्या कर्जांत भरच पडत चालली होती. लॉर्ड रँडॉल्फ चर्चिल ह्यांनीं दक्षिण आफ्रिकेंतील सोन्याच्या खाणीचे कांहीं शेअर्स विकत घेतले होते. त्यांच्या मृत्यूनंतर त्या शेअर्सची किंमत वीस पटींनीं वाढली होती. पुढें ती किंमत उत्तरोत्तर वाढत गेली. लॉर्ड रँडॉल्फ जर जगते तर त्या उत्पन्नांत सुखांत राहिले असते. चर्चिलच्या मातोश्रींनीं ते शेअर्स विकून टाकून आपल्या नवऱ्याचें कर्ज फेडून टाकलें. त्यामुळें चर्चिल कुटुंबाची इस्टेट निर्वेध बनली व त्या इस्टेटीच्या उत्पन्नांत त्यांना सुखानें जगणें शक्य झालें.

पण चर्चिलनीं निर्धार केला होता कीं, कांहीं झालें तरी वडिलांच्या इस्टेटी-वर जगायचें नाहीं. लश्करांत त्यांना वर्षाकांठीं पांचशें पौंड पगार मिळत असे. पण तो पगार त्यांना पुरत नसल्यानें त्यांना घरून पैसे मागवावे लागत. त्यांना पोलो खेळण्याचा नाद होता. तो खेळ खर्चिक असल्यानें त्यांत चर्चिलनें बरेच पैसे जात. त्यांना कर्जहि झालें होतें. तें कर्ज वाढत गेल्याचे

लश्करांतील नोकरी सोडून किफायतशीर असा दुसरा व्यवसाय स्वीकारण्याचा त्यांचा विचार चालला होता. त्यांच्या लेखनाचा त्यांना जो मोबदला मिळाला होता, तो त्यांनीं लश्करांत नोकरी करून मिळविलेल्या सबंध पगाराहून पांच पटींनीं अधिक होता.शेवटीं त्यांनीं पुष्कळ विचार करून लश्करांतील नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला. त्यांनीं ' मॉर्निंग पोस्ट ' ह्या नांवाच्या पत्रांत सुडानच्या युद्धावर जीं वार्तापत्रें लिहिलीं होतीं, त्यांबद्दल त्यांना तीनशें पौंडांचा मोबदला मिळाला होता त्या पैशामुळें त्यांना लेखनव्यवसाय करण्यास हुरूप आला व त्यांनीं सुडानच्या मोहिमेवर एक ग्रंथ लिहिण्याचा संकल्प केला. त्यांचा लेखनव्यवसाय सुरळीत चालला असता तर त्यांना आपल्या आईकडे समाधानांत राहतां येणार होतें. शिवाय त्यांची पणजी लंडनडेरीची मार्क्विस फ्रांसिस ॲन हिच्या इस्टेटींतून त्यांना कांहीं पैसे मिळत होते. ते पैसे आणि लेखनव्यवसायांतून मिळणारे पैसे यांतून आपला खर्च भागेल असा विचार करून चर्चिलनीं आपल्या लश्करांतील कमिशनचा राजिनामा दिला.

चर्चिलचे वडील लॉर्ड रँडॉल्फ चर्चिल हे हुजूर पक्षाचे एक आधारस्तंभ होते. चर्चिलनीं लश्करांतील नोकरीचा राजिनामा दिल्यावर त्यांच्या वडिलांच्या मित्रांनीं त्यांना राजकारणांत ओढण्याचें ठरविलें. त्यांना आपल्या पक्षाचा उमेदवार म्हणून निवडणुकीस उभें करण्याचाहि त्यांचा विचार होता पण मुख्य प्रश्न होता तो खर्चाचा. तरीहि चर्चिलनीं आपल्या पक्षाच्या एका सभेंत विचारपरिप्लुत भाषण केलें. तें त्यांचें जाहीर सभेंतील पहिलेंच भाषण होतें. तें इतकें प्रभावी झालें कीं, वर्तमानपत्रांनीं देखील त्याची दखल घेतली. ' मॉर्निंग पोस्ट' नें तर त्या भाषणावर एक स्तंभ मजकूर लिहून चर्चिलना शाबासकी दिली. त्या दरम्यान त्यांचा लेखनव्यवसाय चालूच होता.

पण १८९९ सालच्या वसंत ऋतूंत चर्चिलच्या निर्दशनास आलें कीं, विन्स्टन चर्चिल या नांवाचा आणखी एक लेखक असून त्याच्या दोन कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. हा लेखक वास्तविक अमेरिकन होता, पण कांहीं लोकांनीं चर्चिलची त्या लेखकाशीं गल्लत केली. इतकेंच नव्हे तर त्या अमेरिकन लेखकाऐवजीं चर्चिलना त्याच्यासाठीं अभिनंदनपर पत्रेंहि लिहिलीं. चर्चिलना त्याविषयीं अर्थातच विचार करणें भाग पडलें. त्यांनीं अमेरिकन

92837

र्चिलना पत्र लिहून आपणहि विन्स्टन चर्चिल असल्याचें त्यांना कळविलें व पुढें विन्स्टन स्पेन्सर चर्चिल ह्या नांवानें आपलें साहित्य प्रकाशित करण्यास सुरुवात केली. अमेरिकन चर्चिलकडून ब्रिटिश चर्चिलना त्यांच्या पत्राचें उत्तर आलें. आणि पुढें जेव्हां चर्चिल अमेरिकेला गेले तेव्हां त्या अमेरिकन चर्चिलनीं त्यांचा परिचय करून घेऊन त्यांना एक खानाहि दिला.

हुजूरपक्षानें चर्चिलना पार्लमेंटमध्यें निवडून आणण्याचें ठरविलें होतें हें मागें आलेंच आहे. आपणांला निवडणुकीचा खर्च झेपणार नाहीं म्हणून चर्चिल निवडणुकीस उभे राहण्यास कां कूं करीत होते. पण तरीहि त्यांनीं एका फेरनिवडणुकीस उभें राहण्याचें ठरविलें. ही निवडणूक 'ओल्डहॅम' ह्या द्विमतदार संघाची होती. ह्या मतदार संघाच्या दोन्हीहि जागा रिकाम्या झालेल्या होत्या. हुजूर पक्षानें त्या दोन्हीहि लढविल्या, पण त्यांचे दोघेहि उमेदवार पराभूत झाले. चर्चिलचा एक हजार तीनशें मतांनीं पराभव झाला. त्यांचा सहकारी मात्र अवघ्या तीस मतांनी पराभूत झाला.

चर्चिलच्या मित्रांना ते पराभूत झालेले पाहून फार वाईट वाटलें. पण त्यांनीं मात्र तो पराभव खेळकरपणानें सहन केला. निवडणुकीची धामधूम संपल्यावर चर्चिलनीं आपलें लक्ष सुडानच्या मोहिमेवरील ग्रंथावर केंद्रित केलें. त्यांनीं तो ग्रंथ अल्पावधींतच पुरा केला. त्या ग्रंथांत त्यांनीं जनरल किचनेर ह्यांच्यावर सडकून टीका केली आहे. किचनेरनीं सुडानच्या 'मार्थी'चें थडगें आपल्या सैनिकांकरवीं उध्वस्त केलें होतें. चर्चिलना किचनेरच्या ह्या कृत्याचा तिटकारा आला. आतां ते सैन्यांत नसल्यानें त्यांना किचनेरचा मुलाहिजा बाळगण्याची जरुरी नव्हती. किचनेरची गणना त्यांनी अडाणी जंगली माणसांत केली आहे.

प्रस्तुत घटनेवर पार्लमेंटमध्यें देखील कडाक्याचा वादविवाद झाला. 'मँचेस्टर गार्डीयन'नेंहि किचनेरची निर्भर्त्सना केली होती. ती टीका चर्चिलना फार आवडली. उदारमतवादी पक्षहि किचनेरवर भयंकर संतप्त झाला. त्या पक्षानें किचनेरच्या जंगलीपणाचा जाहीर निषेध केला. टोरींनीं किचनेरना सांभाळण्याचा प्रयत्न केला. पण चर्चिलना आपल्या पक्षाचें वर्तन बिलकुल आवडलें नाहीं. चर्चिलनीं आपला प्रचंड ग्रंथ पुरा केला. तो

ऑक्टोबर महिन्यांत प्रकाशित व्हायचा होता. पण तत्पूर्वींच दक्षिण अफ्रिकेंत बोअर युद्धाचा भडका उडाला.

बोअर युद्धास १८९९ सालच्या पावसाळ्यांत आकस्मितपणें तोंड फुटलें. त्या युद्धाची तयारी बोअर लोक गुप्तपणें कितीतरी दिवसांपासून करीत होते. त्यांनीं जर्मनींतून आणि हॉलंडमधून मोठ्या प्रमाणांत युद्धसामग्रीची आयात चालविली होती व जर्मन स्थापत्य विशारदांच्या हाताखालीं जोहन्सबर्ग शहराची तटबंदी चालविली होती. ब्रिटिश सरकारला त्या तयारीचा सुगावा लागल्यानें नाताळ आणि केप प्रांतांतील आपल्या शिबंद्यांना कुमक पाठवून त्या बळकट करण्यास त्यानें सुरुवात केली. बोअर लोकांना अर्थातच ब्रिटिशांच्या सैन्यवाढीचें धोरण पसंत पडलें नाहीं. ता. ८ ऑक्टोबरला ट्रान्सव्हाल रिपब्लिकनें ब्रिटिश सरकारला निर्वाणीचा खलिता पाठवून आपल्या सरहद्दींतील सैन्य मागें घेण्याची व त्या भागांत आणखी सैन्य न आणण्याची मागणी केली. खलित्याची मुदत तीन दिवसांनीं संपत होती. त्या दरम्यान ब्रिटिशांनीं सैन्य काढून घेतलें नसल्यास युद्ध अटळ होतें.

युद्ध अद्याप चालू झालें नव्हतें पण तें होण्याचें टळत नव्हतें. एके दिवशीं 'मॉर्निंग पोस्ट'कडून चर्चिलना विचारण्यांत आलें कीं, तुम्ही 'पोस्ट' चे वार्ताहर म्हणून दक्षिण आफ्रिकेला जातां का ? त्यांना दरमहा अडीचशें पौंड पगार मिळणार होता. शिवाय त्यांचा इतर खर्चहि तें पत्र करणार होतें. चर्चिलनीं लगेच तो प्रस्ताव स्वीकारून दक्षिण आफ्रिकेला निघणाऱ्या एका जहाजावर जागा देखील पक्की केली. तें जहाज दि. ११ ऑक्टोबरला 'साउदॅप्टन' बंदराहून दक्षिण आफ्रिकेला रवाना झालें. त्या दिवशीं बोअर खलित्याची मुदत संपत होती.

त्या वेळीं जहाजांवर आजच्याप्रमाणें बिनतारी संदेशाची व्यवस्था नव्हती. त्यामुळें जहाजांवर कोणत्याच प्रकारची बातमी मिळणें अशक्य होतें. सतत बारा दिवसपर्यन्त तें जहाज समुद्रांत होतें. जगापासून जहाजावरील लोकांचा संबंध तुटलेला होता. त्याच्यावर बोअर युद्धाचीं सूत्रें हलविण्यासाठीं निघालेलें सेनापति सर रेडवर्स बुलर हे आपल्या स्टाफवरील अधिकाऱ्यांसह होते. ते एक धोरणी अधिकारी म्हणून प्रसिद्ध होते. ते कमी बोलत पण सर्व कृतीनें दाखवीत. बाराव्या दिवशीं एक छोटी बोट जहाजाच्या

दिशेनें आली. त्या बोटीवर एक काळा बोर्ड उभारलेला होता. ती बोट जहाजाच्या जवळून गेली, तेव्हां त्या फळचावर लिहिलेली मोठ्या अक्षरांतली बातमी लोकांना वाचावयास मिळाली.

‘ बोअर्सचा तीन लढयांत पराभव.

जनरल पेन्न सायामॉड्स् ठार. ’

ती बातमी वाचून सर रेडवर्स बुलर हें स्तंभितच होऊन गेले. पण एक ब्रिटिश सेनापति ठार झाला होता. आणि बोअर सैन्याचा तीन लढयांत पराभव झाला होता. बोटीवरील प्रवासी पार गोंधळून गेले. पण जनरल बुलर निश्चल होते. एक अधिकारी त्यांच्यापाशीं येऊन अदबीनें म्हणाला,

“ तिकडे आतां कांहीं उरलें नसावें असें वाटतें. ” तें ऐकतांच सर बुलर गंभीर होत म्हणाले,

“ आम्हांला प्रिटोरियाबाहेर आणखी एक तरी लढाई द्यावी लागेल असें मला वाटतें.”

जनरल बुलर ह्यांचा लश्करी अंदाज खोटा ठरला नाहीं. शेवटीं एकदांचें जहाज दक्षिण आफ्रिकेच्या टेबल बे बंदरास लागलें. सर बुलर हे त्या जहाजानें येणार असल्याचें नाताळमधील सरकारी अधिकाऱ्यांना माहीत होतें. म्हणून ते आपला अहवाल सादर करण्यासाठीं बोटीवर आले. निर्वाणीच्या खलित्याची मुदत संपतांक्षणीं बोअर सैन्य नाताळमध्यें शिरलें होतें. त्यांनीं डंडीपर्यन्त आक्रमण करून ब्रिटिश शिबंद्यांवर हल्ले चढविले होते. ब्रिटिशांनीं त्यांचा पहिला पराभव टलन हिलच्या लढाईंत केला. ती लढाई ब्रिटिशांनीं जिंकली खरी, परंतु जनरल पेन्न सायमॉड्स् हे त्या लढाईत ठार झाले व बोअर सैन्यानें त्यांच्या चार हजार सैन्याची कोंडी केली. हें सैन्य जनरल सर जॉर्ज व्हाईट ह्यांच्या सैन्याला जाऊन मिळण्यासाठीं म्हणन माघार घेत होतें.

जनरल सर जॉर्ज व्हाइट ह्यांच्या सैन्यांत बारा हजार शिपाई, पन्नास तोफा आणि एक घोडेस्वारांची ब्रिगेड होती. ह्या सैन्याला इंग्लंडमधून आणि हिंदुस्थानांतून कुमक पाठविण्यांत येत होती. पण तें सैन्य येईपर्यंत त्यांनीं माघार घ्यावी असा त्यांना सल्ला देण्यांत आला होता.

चर्चिलना दक्षिण आफ्रिकेंत पाय ठेवतांक्षणीं सर्व परिस्थितीचें आकलन झालें. ब्रिटिश फौजांची सर्वत्र पिछेहाट चालली होती. पण त्या बातम्या दडपून टाकण्यांत आल्या होत्या. फक्त ब्रिटिश फौजांच्या विजयाच्या बातम्या तेवढ्या जाहीर करण्यांत येत होत्या. चर्चिलना नाताळला जायचें होतें. पण त्या संस्थानचें दळणवळण तुटल्यानें नाताळ अलग पडलें होतें. तिकडे जायचें झाल्यास एक हजार एकशेंवीस किलोमीटर्सचा प्रवास गाडीनें पोर्ट एलिझाबेथपर्यंत करणें आवश्यक होतें. तिथून पुन्हां दरबानला जावें लागणार होतें. एकूण त्या प्रवासास चार दिवस लागणार होते. आणि तो प्रवास अत्यंत धोक्याचा होता. तरीहि चर्चिलनीं तो केला. त्यांच्याबरोबर 'मँचेस्टर गार्डियन'चा एक वार्ताहर होता. त्यांची नाताळला जाणारी गाडी ही शेवटची गाडी ठरली.

ईस्ट लंडनला पोहोंचल्यावर चर्चिलनीं दरबानला जाण्याकरितां एक दीडशें टनांची होडी भाड्यानें घेतली. वाटेंत भयंकर तुफान झालें. चर्चिलना वाटलें आपणांस जलसमाधि मिळते. पण ईश्वरकृपेनें तसें कांहीं घडलें नाहीं आणि चर्चिल सुखरूपपणें दरबानला जाऊन पोहोचले. तिथून पिटर मारिट्झबर्ग-पर्यंतचा प्रवास करण्यास त्यांना आणखी एक रात्र लागली. तिथलें रुग्णालय जखमी सैनिकांनीं भरून गेलें होतें. त्या सैनिकांमध्यें चर्चिलचे कांहीं मित्र होते. त्याच रात्रीं चर्चिलनीं ईस्टकोर्टचा रस्ता धरला. तें एक शेंकडों घरांचें खेडें होतें. तिथून पुढें गाड्या जात नव्हत्या.

चर्चिलना लेडीस्मिथला जायचें होतें. तिथें त्यांचे स्नेही जनरल इयान हॅमिल्टन हे होते. त्यांनीं त्यांची व्यवस्था करण्याचें कबूल केलें होतें. पण गेट बंद होतें. बोअर्सनीं कोलेन्सो स्टेशन ताब्यांत घेतलें होतें व रेल्वेमार्गा-वरील पूलहि ताब्यांत घेतला होता. जनरल फ्रेंच व त्यांचा स्टाफ ह्यांनीं बोअर्सच्या गोळीबारांतच रेल्वेवरून जाण्यांत यश मिळविलें. ती शेवटची गाडी होती. ती लेडीस्मिथहून केपला निघाली होती. तेथें ब्रिटिश सैनिकांची जुळवाजुळव चालली होती. रेल्वे बंद झाल्यामुळें चर्चिलना ईस्टकोर्ट येथें मूठभर सैनिकांबरोबर थांबावें लागलें. हें सैन्य तिथें नाताळच्या दक्षिण भागाचें रक्षण करण्यासाठीं आणण्यांत आलें होतें.

चर्चिलना त्या सैनिकांमध्यें त्यांचे कांहीं शाळूसोबती भेटले. त्यांत लियो अमेरी हे एक होते. ते 'टाईम्स'चे वार्ताहर म्हणून गेले होते. कॅ. हल्डानेहेहि तेथें होते. ते सगळे त्या छोटया शहरांत आठवडाभर रखडत राहिले. तिथून त्यांना पुढें जायचें होतें, पण जायचें कसें हा प्रश्न होता. शेवटीं तिथल्या शिबंदीच्या सेनापतीनें एक चिलखती गाडी पुढें पाठविण्याची धाडसी योजना आंखली. त्या गाडीला सहा डबे होते. त्यांत शिपायांच्या दोन कंपन्या कोंबण्यांत आल्या. शिवाय एक नाविक तोफहि त्या गाडीला कांहीं खलाश्यांसह जोडण्यांत आली. गाडीनें चिवेलीपर्यंतचा प्रवास बिनधोक केला. तिथून ती गाडी पुढें जाण्याची तयारी करीत होती. तोंच जवळच्या टेंकडीवर त्यांना बोअर सैनिक गोळा झालेले दिसले. तें पाहतांच खालीं उतरलेले सैनिक लगबगीनें गाडींत शिरले व त्यांनीं गाडी भरवेगानें सोडली. बोअर सैनिकांनी गाडीवर तोफा डागण्यास सुरुवात केली. दुर्दैवानें तोफेचा एक गोळा लागून गाडीचे दोन डबे कलंडले. कांहीं सैनिक जखमी झाले, तर बाकीच्यांनीं खालीं उतरून डब्यांच्या आडोशास राहून मोर्चे धरले. बोअर सैनिकांचा गोळीबार भयंकर स्वरूपाचा होता. त्या गोळीबारांतच ब्रिटिश सैनिकांनीं उलटलेले डबे नीट करण्याचा प्रयत्न केला. त्या कामांत चर्चिलनींहि मोठी कामगिरी बजावली.

शेवटीं एकदांचे कलंडलेले डबे रुळावर नीट उभे करण्यांत त्या सैनिकांना यश आलें. बोअर सैनिकांच्या गोळीबारांत एकूण चाळीस सैनिक जखमी झाले. गाडी आतां चालू झाली. पण ती सावकाश चालविण्यांत आली. कारण बोअर सैनिकांची सरबत्ती भयंकर होती. जखमी सैनिकांना गाडींत बसवून बाकीचे सैनिक पायींच जाऊं लागले. चर्चिल गाडीच्या ड्रायव्हरशेजारीं बसले होते. ड्रायव्हरनें गाडीचा वेग वाढविला. पण त्यामुळें पायीं चालणारे सैनिक मागें राहूं लागले. तें पाहतांच चर्चिलनीं ड्रायव्हरला गाडी थांबविण्यास सांगितलें. तोंच ब्ल्यू क्रँटझ् नदीवरील पूल आला. चर्चिलनीं ड्रायव्हरला गाडी पुलापलीकडे नेऊन थांबविण्यास सांगितलें व ते गाडींतून खालीं उतरले. त्यांना कॅ. हल्डाने ह्यांच्याशीं बोलायचें होतें.

त्या दरम्यान बोअर सैनिकांचा गोळीबार चालूच होता. त्या गोळीबारांतून चर्चिल गाडीच्या मागें दोनशें मीटर्सच्या अंतरावरून चालले होते. तिथून जवळच कॅ. हल्डाने आणि त्यांच्याबरोबरचे ब्रिटिश सैनिक होते. चर्चिल त्यांच्याकडे जात होते, पण काय आश्चर्य त्या जागीं त्यांना ब्रिटिश सैनिक दिसले नाहीत. त्यांच्या जागीं तेथें दोन मुलकी माणसें दिसलीं. ते रस्ता दुरुस्त करणारे लोक असतील असें चर्चिलना वाटलें. पण लगेच ते बोअर्स तर नाहींत ना असा त्यांना संशय आला.

तो धोका लक्षांत घेतांच चर्चिलनीं आपला मोहरा मागें वळविला. तें पाहतांच बोअर्सनीं त्यांच्यावर गोळीबार करण्यास सुरुवात केली. चर्चिलनीं धूम ठोकली. एके ठिकाणीं त्यांना एक छोटीशी झोपडी दिसली. लोहमार्गावर काम करणाऱ्या मजुरांची ती झोपडी होती. त्या झोपडीच्या अलीकडे एक चर होता. चर्चिलनीं त्या चरांत उडी घेऊन तेथें थोडा वेळ ते दडून बसले. चर्चिलच्या मनांत त्या झोपडींत लपायचें होतें. पण त्या झोपडीच्या पलीकडे दोनशें यार्डांच्या अंतरावर त्यांना नदीचा खडकाळ किनारा दिसला. त्या खडकांमध्यें जाऊन लपावें असा विचार करून चर्चिल चरांतून वर उठत होते तोंच एका बोअर घोडेस्वाराची नजर त्यांच्याकडे गेली. त्याच्या खांद्याला बंदूक लटकत होती. त्यानें मोठ्यानें ओरडून चर्चिलना आपणांकडे येण्यास सांगितलें. चर्चिलच्या मनांत त्या घोडेस्वारावर आपलें पिस्तुल झाडण्याचा विचार आला. पण त्यांच्या दुर्दैवानें त्यांचें पिस्तुल हरवलें असल्याचें त्यांना आढळून आलें. गाडीचे डबे रुळांवर उभे करतांना त्यांचें पिस्तुल तेथें पडलें होतें. तें पिस्तुल बोअर्सना मिळालें व चर्चिलना तें नंतर परत करण्यांत आलें. चर्चिल येत नाहींत असें पाहतांच त्या बंदुकधारी बोअर घोडेस्वारानें त्यांच्यावर आपली बंदूक रोखली. चर्चिलना आतां शरण जाण्याशिवाय गत्यंतर उरलें नाहीं. त्यांचे इतर सोबतीहि बोअर्सच्या हातांत पडले होते. ही घटना दि. २५ डिसेंबर १८९९ रोजीं घडली.

बोअर युद्धानंतर तीन वर्षांनीं जव्हां बोअर सेनापति इंग्लंडला युद्धानें उध्वस्त झालेल्या प्रदेशाची पुनर्घटना करण्यासाठीं कर्ज मागण्यासाठीं आले, तेव्हां चर्चिलची आणि त्यांची भेट झाली असतां चर्चिलनीं दक्षिण आफ्रिकेंत

आपणांस अटक झाल्याची गोष्ट त्यांच्यापाशीं काढली. बोअर सेनाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाचें नेतृत्व जनरल बोथा ह्यांच्याकडे होतें.

" तुम्ही मला ओळखलें नाहीं का ?" जनरल बोथा चर्चिलना म्हणाले. " तुम्हांला पकडणारा घोडेस्वार तो मीच ! " ते विजयानें म्हणाले.

जनरल बोथा हे सुरुवातीला युद्धाच्या विरुद्ध असल्यानें त्यांच्याकडे अधिकाराची एकहि जागा देण्यांत आली नव्हती. त्यांनीं चर्चिलना पकडलें त्याच दिवशीं पहिल्या प्रथम युद्धांत भाग घेतला होता. ते त्या दिवशीं एका बोअर तुकडीचें नेतृत्व करीत होते व सगळ्यांच्या समोर होते म्हणून चर्चिलना अटक करणें त्यांना शक्य झालें. आपणांला पकडणारे गृहस्थ बोथा असल्याचें कळतांच चर्चिलच्या मनांत त्यांच्याविषयीं एक प्रकारची आदर-मिश्रित आपुलकीची भावना निर्माण झाली. चर्चिलची आणि जनरल बोथा ह्यांची दुसरी भेट १९०६सालीं झाली. त्या वेळीं चर्चिल इंग्लंडचे उपवसाहत-मंत्री होते, तर बोथा दक्षिण आफ्रिकेचे पंतप्रधान होते. ते इंग्लंडला राष्ट्र कुलांतील देशांच्या पंतप्रधानांच्या बैठकीला आले होते. त्यांच्या सन्मानार्थ एक खाना देण्यांत आला होता. त्या मेजवानीला चर्चिलच्या मातोश्री उपस्थित होत्या. मेजवानीच्या हॉलमध्यें प्रवेश केल्यावर जनरल बोथा आपल्या जागेकडे जात चर्चिलच्या आईजवळ थांबून तिला म्हणाले, " मी आणि चर्चिलनीं दोघांनीं पावसांत आणि चांगल्या हवेंत दिवस घालविले आहेत. " जनरल बोथा ह्यांच्या मनांत इंग्लंडच्या राजेसाहेबांना एक हिरा अर्पण करावयाचा होता. त्या बाबतींत त्यांनीं पहिला विचारविनिमय कुणाशीं केला असेल तर तो चर्चिलशीं. तो हिरा 'कुलिनन' हा होय.

१९१४ सालीं पहिलें महायुद्ध सुरू होण्याच्या कांहीं दिवस अगोदर म्हणजे १९१३ सालीं जनरल बोथा ह्यांनीं चर्चिलना युद्ध सुरू होणार असल्याचा इशारा दिला होता. जनरल बोथा जर्मनींत गरम झऱ्यांचा उपचार घेण्यासाठीं गले होते. तिथून परतल्यावर लंडन शहरीं चर्चिलची आणि त्यांची भेट झाली. तेव्हां ते चर्चिलना म्हणाले, " जर्मनींत युद्धाचे वारे जोरानें वाहत आहेत, तेव्हां तुम्हीं आतांच तयारीला लागा. जर्मनांच्या वचनावर विसंबून गाफील राहूं नका ते दगलबाज आहेत. तुमचें भलें त्यांना पाहवत नाहीं.

ज्या दिवशीं युद्ध सुरू होईल त्या दिवशीं मी माझ्या जागेवर रुजू होईन. त्यांनीं तुमच्यावर हल्ला केला कीं, मी त्यांना त्यांच्या आफ्रिकेंतील वसाहतींतून हांकलून लावीन. पण तत्पूर्वी तुमचें आरमार तुम्ही सज्ज करून ठेवा. गाफील राहूं नका."

पहिलें महायुद्ध सुरू झालें, तेव्हां दक्षिण आफ्रिकेचे दोन मंत्री इंग्लंडमध्यें होते. त्यांतील एक मंत्री डी ग्राफ ह्यांनीं ती वार्ता लगेच जनरल बोथा ह्यांना तारेनें कळविली. पण त्या दिवशीं बोथा राजधानींत नव्हते, ते ट्रान्सव्हालला गेले होतें.त्यांचें काम राजधानींत जनरल स्मट्स हे करीत होते.त्यांनीं डी ग्राफची तार घेऊन वाचली व ती बाजूस ठेवली. कांहीं वेळानें त्यांनीं ती पुनः उचलून वाचली व ते आपल्या मनांत म्हणाले, 'हें कांही तरी गंभीर प्रकरण दिसतेंय्'. नंतर त्यांनीं ती तार लगेच पंतप्रधान बोथा ह्यांना पाठवून दिली. त्याच रात्रीं बोथा लौरेन्स मार्किस येथून निघून दुसऱ्या दिवशीं एका जर्मन बोटीनें केपला परतणार होते. पण ऐन वेळीं डी ग्राफ ह्यांची तार त्यांच्या हातांत पडल्यानें त्यांनीं जर्मन बोटीनें प्रवास करण्याचा बेत रहित केला. ते जर दुर्दैवानें जर्मन बोटीवर असते तर जर्मनांनीं त्यांना कैद केलें असतें.

अशा त्या बोथांनीं किंवा बोअर सैनिकांनीं चर्चिलना पकडून ब्रिटिश युद्धकैद्यांमध्यें आणून सोडलें. त्यांत बरेच जण जखमी होते. ते आपल्या नशिबाला दोष देत जमिनीवर बसून राहिले. कांहीं वेळानें त्या सगळ्यांना रांगेंत उभें राहण्याचा हुकूम झाला. पण चर्चिलना त्यांनीं बाजूस काढलें. आपली जबानी घेण्याचा त्यांचा विचार असेल असें चर्चिलना वाटलें व त्यांनीं आंतून काय सांगायचें त्याची तयारी केली त्या दरम्यान तंबूमध्यें बोअर अधिकाऱ्यांची कांहीं तरी सल्लामसलत झाली व त्यांनीं चर्चिलना बाकीच्या ब्रिटिश युद्धकैद्यांत सामील होण्याची सूचना केली. चर्चिलना तें ऐकून आनंद झाला. इतक्यांत तंबूतून एक बोअर सैनिक बाहेर आला व चर्चिलना म्हणाला, " तुला ते मुक्त करीत नाहींत. तूं वार्ताहर आहेस हें जरी त्यांना माहीत असलें तरी, तूं एका लॉर्डचा मुलगा आहेस. लॉर्डस्चे मुलगे युद्धकैदी म्हणून नेहमींच सांपडत नाहींत." चर्चिल जरी युद्धकैदी बनले असले, तरी बोअर लोकांकडून त्यांना चांगली वागणूक मिळाली.

******

प्रकरण आठवें

# कारावास

दि. १८ नोव्हेम्बर १८९९ रोजीं बोअर सैनिकांनीं ब्रिटिश युद्धकैद्यांना प्रिटोरियाला हलविलें. सामान्य सैनिकांच्या राहण्याची व्यवस्था शर्यतीच्या मैदानांत करण्यांत आली, तर चारहि अधिकाऱ्यांना एका शाळेमध्यें ठेवण्यांत आलें. वाटेंत त्यांना एकमेकांशीं बोलण्याची संधि मिळाली तेव्हां त्यांनीं पळून जाण्याच्या योजनेवर खल केला. ज्या शाळेंत त्यांना ठेवण्यांत आलें होतें, तेथें पहारा कडक नव्हता. इमारतीच्या आवारांत फिरण्याची त्यांना मोकळीक होती. एका आठवड्यानंतर त्यांचा पलायनाचा बेत नक्की झाला.

शाळेंत एकूण साठ अधिकारी होते व त्यांच्या दिमतीला दहा ब्रिटिश सैनिक देण्यांत आले होते. त्यांच्यावर चाळीस बोअर पोलीस पहारा करीत होते. पैकीं दहाजण इमारतीच्या चोहोंबाजूंस ठेवलेले होतें. आणखी दहाजण शहरांत सुटीवर जात, तर बाकीचे वीस जण तंबूमध्यें चकाट्या पिटण्यांत, धूम्रपान करण्यांत अथवा पत्ते खेळण्यांत वेळ घालवीत. शाळेची इमारत ज्या आवारांत होती त्याच्या एका टोंकाला तंबू होता. आवार चौकोनी होतें. तंबूमध्यें रात्रपाळीवर नसलेले तीस 'झार्प' अथवा बोअर पोलीस झोपत असत. साध्या ब्रिटिश सैनिकांना आणि कनिष्ठ अधिकाऱ्यांना ज्या शर्यतीच्या मैदानांत ठेवलें होतें तें मैदान शाळेपासून दीड मैलाच्या अंतरावर होतें.

चर्चिल आणि त्यांचे मित्र ह्यांनीं पळून जाण्याचा विचार नक्की केला. बोअर पोलिसांना गुंगारा देऊन शाळेबाहेर पडणें त्यांना कठीण वाटलें नाहीं. पण पुढचा प्रश्न कठीण होता. ते लगेच पकडले जाण्याची भीति होती. आतां फक्त एकच मार्ग होता. आणि तो म्हणजे शाळेच्या तुरुंगांतून बाहेर

पडणारांनीं दोन हजार सामान्य सैनिकांचीहि मुक्तता करणें. त्या सगळ्यांना बोअर पोलीस काबूंत ठेवू शकणार नव्हते. कारण, सबंध प्रिटोरिया शहरांत बंदूक चालविण्याचें शिक्षण असलेले पांचशें लोकदेखील नव्हते. पण तरीहि ती सामुदायिक पलायनाची योजना तितकीशी व्यवहार्य नव्हती. त्या योजनेवर त्यांनीं आणखी विचार केला व शेवटीं ती यशस्वी होणें कठीण आहे असा निर्णय घेऊन प्रत्येकानें वैयक्तिकपणें पळून जावें असें ठरलें.

चर्चिल एका बाजूनें पळून जाण्याचा विचार करीत होते, तर दुसऱ्या बाजूनें वार्ताहर म्हणून आपली विनशर्त मुक्तता व्हावी म्हणून बोअर अधिकाऱ्यांशीं वाटाघाटी करीत होते. बोअर अधिकाऱ्यांचा त्यांच्यावर असा आरोप होता कीं, ते जरी वार्ताहर असले तरी चिलखती गाडीच्या लढाईत प्रत्यक्ष भाग घेऊन त्यांनीं बिगरलढाऊ लोकांच्या दर्जाचा भंग केला होता. त्याच वेळीं चर्चिलच्या धाडसाची रसभरीत वार्ता नाताळच्या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली. त्यांनीं चिलखती गाडी आणि जखमी सैनिक शत्रूच्या हातीं पडूं न देण्याची धाडसी कामगिरी बजावल्याबद्दल नाताळमधील ब्रिटिश पत्रांनीं त्यांची स्तुति केली. बोअर अधिकाऱ्यांनीं कदाचित् वार्ताहर म्हणून चर्चिलची मुक्तता केली असती परंतु नाताळमधील ब्रिटिश पत्रांचे अंक त्यांच्या हातांत पडतांच ते चिडून गेले. चर्चिलनीं त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले कीं, मी चिलखती गाडीच्या लढाईंत एकहि गोळी झाडली नाहीं. त्यावर जनरल ज्युबर्ट ह्यांनीं असें प्रतिपादन केलें कीं, त्यांनीं जरी बंदूक हातांत धरलेली नसली तरी चिलखती गाडी बोअर सैनिकांच्या हातांतून निसटून जावी म्हणून प्रयत्न केला.

शेवटीं बोअर अधिकारी बऱ्या बोलानें आपली मुक्तता करायला तयार नाहींत हें जेव्हां चर्चिलनीं पाहिलें तेव्हां त्यांनीं त्यांच्या हातावर तुरी देण्याचा बेत कायम केला. ज्या शाळेंत त्यांना ठेवण्यांत आलें होतें तिच्या दोन बाजूंस लोखंडी गजांचें कुंपण आणि दोन बाजूंनीं पांचसहा हात उंचीचा बुरूज होता. त्या कुंपणाबाहेर कुणीहि पडूं शकत होतें. चर्चिल आणि त्यांचे सोबती ह्यांच्या कित्येक दिवसांच्या निरीक्षणानंतर ध्यानीं आलें कीं, ज्या वेळीं पहारेकरी पूर्वेच्या बाजूनें पहारा करीत तेव्हां त्यांना शाळेच्या कचेरीशेजारच्या बुरुजाजवळचा वरचा थोडा भाग दिसत नव्हता.

सगळीकडे मोठ्या प्रकाशाचे दिवे जरी बसविण्यांत आले असले तरी तो भाग काळोखांतच असे. चर्चिलनीं पळून जाण्यासाठीं त्याचा उपयोग करण्याचें ठरविलें.

ता. ११ डिसेंबरला कॅ. हल्डाने, ले. ब्रोकी व चर्चिल या तिघांनीं पळून जाण्याचा प्रयत्न केला, पण तो अयशस्वी झाला त्या अयशस्वी प्रयत्नानें चर्चिल नाउमेद झाले नाहींत. उलट कशाहि रीतीनें तुरुंगांतून बाहेर पडण्याचा त्यांचा निर्धार कायम झाला. त्यांना तुरुंगांत चैन पडेनासें झालें. ता. १२ डिसेंबरला त्यांनीं पळून जाण्याचा दुसऱ्यांदा प्रयत्न केला. ते शाळेच्या आवारांतून कचेरीच्या वाटोळ्या कॅबिनमध्यें जाऊन लपून राहिले. तिथून त्यांनीं बराच वेळ पहारेकऱ्यांच्या हालचालींचें निरीक्षण केलें. ते दोघे पहारेकरी कांहीं वेळ एकत्र होते. नंतर एकमेकांपासून दूर झाले. चर्चिलनीं त्या संधीचा त्वरित उपयोग केला. ते एकदम तटावर चढले. तटावर चढतांना दोनदां ते खालीं पडले, पण तिसऱ्यांदा वर चढण्यांत त्यांना यश आलें. तरीहि त्यांचा कोट काटेरी तारेंत अडकला तो सोडविण्यांत आणखी थोडा वेळ गेला. त्या दरम्यान त्यांचें पहारेकऱ्यांकडे लक्ष होतेंच. ते दोघे चर्चिलपासून पंधरा मीटर्सच्या अंतरावर एकमेकांशीं बोलत उभे होते. त्यांची पाठ चर्चिलच्या बाजूला होती. इतक्यांत एकानें सिगरेट ओढण्यासाठीं काडी ओढतांच चर्चिल झटकन तटावरून पलीकडच्या बागेंत उतरले व तिथल्या झुडुपांत लपून बसले. त्यांच्यामागें त्यांच्या मित्रांनीं येण्याचें कबूल केलें होतें. त्यांची वाट पाहत ते तेथें एक तास थांबले. पण त्यांना फरारी होण्याचें धाडस झालें नाहीं. तें पाहून चर्चिल बागेंतून बाहेर पडले. आतां ते मुक्त झाले होते.

चर्चिल थेट प्रिटोरिया शहरांत गेले. तेथें त्यांना कुणीच ओळखत नव्हतें. त्यांच्याकडे कुणाचेंच लक्ष गेलें नाहीं. तथापि असें जरी असलें तरी ते शत्रू-प्रदेशांत असल्यानें पुनः पकडले जाण्याची भीति होती. त्यांना मदत करणारा त्या प्रदेशांत कुणीच नव्हता. लौरेन्स मार्किस हें पोर्तुगीज वसाहतींतील शहर तिथून चारशें ऐंशीं किलोमीटर्स दूर होतें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्यांचें पलायन उघडकीस येणार होतें व मग त्यांची सगळीकडे शोधाशोध होणार होती. युद्धपरिस्थितिमुळें रेल्वे गाड्यांवर पहारे बसविण्यांत आले होते.

गाड्यांतून प्रवास करणाऱ्या लोकांची तपासणी होत होती. अशा परिस्थितींत रेल्वेनें प्रवास करणें धोक्याचें होतें. चर्चिलच्या खिशांत पासष्ट पौंड आणि चॉकलेटचे चार बार होते. पण होकायंत्र आणि नकाशा हीं दोन्ही त्यांच्या मित्रांकडे राहिलीं होतीं. आणि सर्वांत मोठी अडचण म्हणजे त्यांना डच भाषा येत नव्हती आणि तेथील देशी भाषाहि येत नव्हती.

चर्चिलनीं मनांत एक विचार केला. त्यांनीं लौरेन्स मार्किसला जाणाऱ्या लोहमार्गानें चालण्याचें ठरविलें. त्यांनीं आकाशांत बघितलें. शुक्राचा देदीप्यमान तारा आकाशांत झळाळत होता. एक वर्षामागें ते नाईल नदीच्या तीरावर वाळवंटांत हरवले तेव्हां त्यांना शुक्राच्या ताऱ्यानेंच वाट दाखविली होती. आणि या वेळींहि तो त्यांच्या मदतीला होता. सुमारें एक किलोमीटरचें अंतर तोडल्यावर त्यांना एक लोहमार्ग लागला. पण तो लोहमार्ग लौरेन्स मार्किसला जाणारा कीं पिटर्सबर्गला जाणारा तें त्यांना कळेना. तरीहि त्यांनीं त्या मार्गानें चालण्यास सुरुवात केली. ठिकठिकाणीं पहारेकऱ्यांच्या शेकोटया दिसत होत्या.

रेल्वे पुलावर सर्वत्र पहारे बसविण्यांत आले होते दोन तास चालल्यावर त्यांना एक रेल्वे स्टेशन लागलें. ते मार्गावरून बाजूस होऊन एका भिंती-आड लपले. एक तास निघून गेला, त्या दरम्यान ते भयंकर बेचैन झाले होते. अकस्मात् त्यांना एक शिटी ऐकूं आली. एक गाडी येत होती. ती गाडी स्टेशनमध्यें पांच मिनिटें थांबली आणि नंतर चालू झाली. ती एक मालगाडी होती ती गाडी हळू चालत असतांना चर्चिलनीं एक वागीण पकडण्याचा प्रयत्न केला. त्यांचा पहिला प्रयत्न यशस्वी झाला नाहीं, पण दुसरा झाला. ज्या वागीणीमध्यें ते चढले ती दगडी कोळशाच्या रिकाम्या पोत्यांची होती. चर्चिल त्या पोत्यांच्या गठ्ठ्याआड लपून बसले. पोतीं गरम असल्यानें चर्चिलना त्यांची चांगलीच ऊब मिळाली. पण ती मालगाडी कुठें जात होती. आणि गोण्या कुठें उतरविण्यांत येणार होत्या तें त्यांना माहीत नव्हतें. ती काळजी मनांत असूनदेखील त्यांना झोप आली. ते थकून गेले होते. शिवाय त्यांचे डोळेहि पेंगाळूं लागले होते. दिवस उजाडण्यापूर्वीच ते जागे झाले. कारण उजाडल्यावर ते लोकांना दिसणार होते. एके ठिकाणीं गाडीची गति

कमी होतांच ते खालीं उतरले. त्यांचे पाय दुखले, पण जखम वगैरे कांहीं झाली नाहीं.

अजून उजाडलें नव्हतें. ते एका खोऱ्यामध्यें उतरले होते. सभोंवतालीं टेकड्या आणि दंवानें ओलसर झालेलें गवत होतें. त्यांना भयंकर तहान लागली होती म्हणून ते पाण्याचा शोध करूं लागले. एके ठिकाणीं त्यांना पाण्याचें एक छोटेंसें तळें आढळलें. पाणी स्वच्छ होतें म्हणून ते तें पोटभर प्याले. त्यांना दिवस उजाडून पुनः रात्र पडेपर्यंत तिथेंच कुठेंतरी लपून बसायचें होतें. रात्र पडल्यावर ते पुनः एखादी मालगाडी पकडून प्रवास करणार होते. ते दिवसभर एका झाडीत लपून राहिले. त्यांच्या खिशांत चॉकलेट आणि बिस्किटांची पूड होती. त्या दोन्हीवर त्यांनीं दिवस घालविला. शेवटीं एकदांचा दिवस मावळला आणि रात्र पडली. चर्चिल मालगाडी पकडण्यासाठीं लोहमार्गावर गेले. पण मध्यरात्र झाली तरी एकहि गाडी आली नाहीं. चर्चिल हताश झाले व त्यांनीं लोहमार्गावरून चालण्यास सुरुवात केली. बराच वेळ चालल्यावर त्यांना एक पूल लागला पण त्यावर पहरा असल्याने त्यांनीं त्याच्या बगलेनें चालण्यास सुरुवात केली. परंतु तें एक कुरण होतें. त्यांत ते पार भिजून गेले. शेवटीं बराच वेळ चालल्यावर त्यांना दूरवर कुठें तरी दिवे दिसले. त्या दिव्यांच्या रोखानें ते चालूं लागले. तें एक रेल्वे स्टेशन होतें. त्याच्या आवारांत दोन गाड्या उभ्या होत्या. त्या गाड्या कुठें जात होत्या तें त्यांना बघायचें होतें म्हणून ते त्या गाड्यांच्या जवळ जात होते तोंच कुणाचें तरी हंसणें आणि एका युरोपियनाच्या बोलण्याचा आवाज त्यांना ऐकूं आला. तें हंसणें निग्रोचें होतें. चर्चिल तिथून बाजूस झाले.

त्या स्टेशनमध्यें गाडी पकडणें अशक्य होतें. त्यानीं हताश होऊन स्टेशन-समोरील मैदानांतून चालण्यास सुरुवात केली. एखाद्या निग्रोच्या झोपडींत जाऊन थोडा वेळ विश्रांति घेण्याचा त्यांचा विचार होता. निग्रो लोक बोअर लोकांचा द्वेष करीत असत, ब्रिटिशांचे ते चाहते होते. चर्चिलनीं चालण्यास सुरुवात केली. दूरवर कुठेंतरी त्यांना शेकोटयांच्या प्रकाशासारखा प्रकाश दिसत होता. त्या प्रकाशाच्या दिशेनें ते चालत राहिले पण कांहीं केल्या ते त्या शेकोटयांजवळ पोहोचेनात. ते तब्बल एक किंवा दीड तास चालत

होते. अखेरीस पहाटेस तीन वाजतां ते त्या शेकोटयांच्या प्रकाशाजवळ येऊन पोहोंचले.

पण तें खेडें निग्रो लोकांचें नव्हतें, तर एका दगडी कोळश्याच्या खाणीवरील ती वसाहत होती. चर्चिलना दुरून ज्या आगटया दिसल्या होत्या त्या आगटया म्हणजे यंत्रांच्या भट्टया होत्या. जवळच दोन किंवा तीन इमारती होत्या. त्यांच्यामध्यें एक दोनमजली दगडी घर होतें. चर्चिलच्या मनांत मागें फिरण्याचा विचार घोळूं लागला. पण ते आतां थकून गेले होते. भुकेनें आणि तापानें गलितगात्र झाले होते. त्या स्थितींत त्यांच्या अंगांत आणखी चालण्याचें त्राण नव्हतें, ते हताश झाले होते, पण त्यांना एक आशेचा किरण दिसत होता. त्या भागांत कांही इंग्लिश कुटुंबें राहात असल्याचें त्यांनीं ऐकलें होतें. बोअर लोकांनीं आपणांमध्यें त्या इंग्लिश लोकांना राहूं दिलें होतें, कारण त्यांच्याशिवाय दगडी कोळश्याच्या खाणी चालूं शकत नव्हत्या. तें घर एखाद्या इंग्लिश गृहस्थाचें असल्यास देवच पावला असा विचार करून चर्चिलनीं त्या दुमजली घराचें दार ठोठावलें. घरवाला दुसरा कुणी असल्यास आपल्याजवळ असलेल्या पैशांची लांच चारून त्याला आपलासा करून घ्यावें असें त्यांनीं ठरविलें. इतकेंच नव्हे तर त्यांना बोअर प्रदेशाबाहेर पळून जाण्यास मदत करणाऱ्या इसमास ते एक हजार पौंड देण्यास देखील तयार होते. त्यांनीं दोनदां दार ठोठवल्यावर घराच्या माडीची खिडकी उघडली गेली व कुणीतरीं बोअर भाषेंत "कोण" म्हणून विचारलें.

चर्चिलची घोर निराशा झाली. आपण एका बोअर गृहस्थाच्या घरीं आलों असें त्यांना वाटलें. पण आतां ते माघारी जाऊं शकत नव्हते. ते म्हणाले,

"मी मदत मागण्यासाठीं आलों आहें. मला अपघात झाला आहे."

चर्चिलना वर कुजबूज ऐकू आली. नंतर जिन्यांत पावलें वाजलीं. एका मजबूत शरीरयष्टीच्या इसमानें दार उघडलें.

"तुम्हांला काय पाहिजे ?" त्यानें इंग्रजींत विचारलें. त्या प्रश्नाला कांहींतरी उत्तर देणें आवश्यक होतें. "मी एक नागरिक आहें. मी माझ्या तुकडीला जाऊन मिळण्यासाठीं निघालों होतों. पण गाडींतून पडलों माझा

एक हात मोडला असावा असें मला वाटतें." त्या अपरिचित इसमानें चर्चिल-कडे निरखून पाहिलें व तो म्हणाला,

"ठीक आहे, आंत या."

तो इसम आंत गेला व बाजूचें एक दार उघडून चर्चिलना आंत येण्यास सांगितलें. ती खोली अंधारी होती. चर्चिलना आपण पुनः तुरुंगांत तर येऊन पडलों नाहीं ना अशी भीति वाटली. पण ती भीति तात्पुरतीच ठरली. कारण तो इसम कांहीं वेळानें एक दिवा घेऊन आला, तो त्याने टेबलावर ठेवला. चर्चिलनीं त्या खोलीचें निरीक्षण करण्यास सुरुवात केली. ती एक जेवण्याची आणि लिहिण्याची अशी दुहेरी उपयोगाची खोली होती. त्यांत एक मोठें टेबल, एक कपाट आणि कांहीं खुर्च्या होत्या, त्या अनोळखी इसमानें आपल्या उजव्या हातापाशीं टेबलावर रिव्हॉल्व्हर ठेवलें व तो चर्चिलना उद्देशून शांतपणें म्हणाला.

"तुमच्या अपघाताची माहिती तुम्ही मला तपशीलवार सांगितलीत तर ती मला ऐकून घेणें आवडेल." "मी खरी हकीकत सांगितली तर बरें असें मला वाटतें," चर्चिल म्हणाले. "मलाहि तसेंच वाटतें" तो इसम शांत-पणें म्हणाला.

"माझें नांव विन्स्टन चर्चिल. मी 'मॉर्निंग पोस्ट'चा युद्धवार्ताहर आहें. काल रात्रीं मी प्रिटोरियांतून फरारी झालों. मी सरहद्दीकडे निघालों आहें. माझ्यापाशीं खूप पैसे आहेत. आपण मला मदत करूं शकाल का ?"

क्षणभर त्या खोलींत स्तब्धता पसरली तो इसम खुर्चीवरून उठला व दाराकडे गेला. त्यानें दारास कुलूप लावलें, चर्चिलना वाटलें आपली कंबख्तीच भरली. पण नाहीं, तो इसम चर्चिलपाशीं आला व त्यांना म्हणाला. "तुम्ही इकडे आलांत ही देवाची तुमच्यावर मोठीच कृपा म्हटली पाहिजे ! ह्या तीस किलोमीटर्सच्या परिघांत हें एकच घर असें आहे कीं, जेथें तुम्हांला पोलि-सांच्या हातांत पडण्याची भीति नाहीं. इकडे आम्हीं सर्वजण इंग्रज आहोंत. आम्ही तुम्हांला मदत करूं."

तें ऐकतांच चर्चिलना एकदम हर्षवायु झाला. त्यांना खरोखरच देव पावला होता. ते आपल्या लोकांत येऊन पडले होते. आतां त्यांना कसलीच भीति नव्हती.

चर्चिल ज्यांच्याकडे आले होते, त्या इंग्रज गृहस्थांचें नांव जॉन हॉवर्ड असें होतें. ते एका कोळशाच्या खाणीचे मॅनेजर होते. ते जरी ट्रॉन्सवालचे नागरिक असले, तरी ते इंग्रज असल्यानें त्यांना सैन्यांत बोलवण्यांत आलें नव्हतें. त्यांच्याबरोबर आणखी चौघे इंग्रज होते, त्यांतील एकजण एंजीनिअर, एक त्यांचा सेक्रेटरी आणि दोघे मायनर्स होते. ते पांचहि जण उपयुक्त होते म्हणून बोअर लोकांनीं त्यांना आपणांमध्यें राहूं दिलें होतें. परंतु त्याच्यावर एक निर्बंध होता आणि तो म्हणजे सक्त तटस्थता पाळण्याचा.

हॉवर्ड ह्यांनीं चर्चिलना आश्रय देऊन मोठाच धोका पत्करला होता. शत्रूला आश्रय दिल्याबद्दल त्यांच्या हातून राजद्रोहाचा गुन्हा घडत होता. तो गुन्हा पोलिसांना कळला असता तर त्यांना गोळ्या घालून ठार करण्याची शिक्षा होण्याची भीति होती. हॉवर्ड ह्यांच्याकडून चर्चिलना कळलें कीं, गांवचा पाटील हॉवर्डकडे चर्चिलची चौकशी करण्यासाठीं आला होता. त्यानें सगळीकडे चर्चिल फरारी झाल्याची दवंडी पिटली होती. त्या भागांत सर्वत्र डच गुप्त हेरांचा संचार होता. खुद्द हॉवर्ड ह्यांच्या घरांत दोन डच मोलकरणी होत्या. चर्चिलचें आगमन झालें तेव्हां त्या घरांतच झोपलेल्या होत्या.

हॉवर्ड ह्यांनीं चर्चिलना व्हिस्की आणि खाण्याचे जिन्नस आणून दिले. खाणें झाल्यावर चर्चिलना एका खाणीच्या विहिरींत नेऊन लपवून ठेवण्यांत आलें. तेथें एक तगडा इंग्रज गृहस्थ होता. त्यानें चर्चिलशी हस्तांदोलन केलें व तो त्यांना म्हणाला : " येत्या निवडणुकांत ओल्डहॅमचे मतदार तुम्हांलाच निवडून देतील." तो इसम ओल्डहॅमचा होता. चर्चिलबरोबर ते चारहि गृहस्थ त्यांच्या लपून राहण्याच्या जागेपर्यंत आले. ते नंतर निघून गेले आणि चर्चिल तेथें एकटेच राहिले.

त्या ठिकाणीं चर्चिल १९ डिसेंबरपर्यंत राहिले. त्या दरम्यान त्यांच्या पलायनासंबंधीं वर्तमानपत्रांत नाना प्रकारच्या अफवा प्रसिद्ध झाल्या होत्या. कुणीं म्हटलें होतें कीं, ते पकडले गेले, आणखीं एका वृत्तपत्रांत आलें होतें कीं ते सरहद्द ओलांडीत असतां पोलिसांच्या गोळीबारांत ठार झाले. इकडे त्यांच्या यजमानानें आपल्या चार सहकाऱ्यांशीं सल्लामसलत करून त्यांना सरहद्दीबाहेर पोचविण्याची तयारी चालविली. दि. १९ डिसेंबरच्या पहांटेस

चर्चिलना त्यांच्या लपलेल्या जागेंतून बाहेर काढून लोंकरीनें भरलेल्या एका वागिणीमध्यें लपविण्यांत आलें. तदनंतर तीन तासांनीं ती मालगाडी अज्ञात दिशेनें चालू झाली.

त्या दिवशीं ती मालगाडी दिवसभर ट्रान्सव्हालमधून जात होती. रात्रीं ती एका स्टेशनवर थांबली. चर्चिलना झोंप येत होती, पण ते झोपूं शकले नाहींत. त्यांना पकडलें जाण्याची सारखी भीति वाटत होती. पण तरीहि त्यांना झोंप लागली. ते जागे झाले, तेव्हां गाडी पुनः सुरू झाली होती. दुपारी ती कोमाटी पोर्ट ह्या नांवाच्या स्टेशनवर येऊन थांबली. तें एक मोठें रेल्वे जंक्शन होतें. तेथें गाडी रात्रीचे अकरा वाजेपर्यन्त थांबली. सर्व वागिणींची तपासणी करून करण्यांत आल्यावर त्या दुसऱ्या एका गाडीला जोडण्यांत आल्या. नंतर ती गाडी सुरूं झाली. कोमाटी पोर्ट हें ट्रान्सवालच्या सरहद्दीवरील शेवटचें स्टेशन होतें. तिथून पुढें मोझांबिक ह्या पोर्तुगीज वसाहतीचा प्रदेश सुरू झाल्यावर चर्चिलनीं आपल्या लपलेल्या जागेंतून तोंड काढून बाहेर बघितलें. त्यांना रोस्तानु गार्सिया हीं पोर्तुगीज अक्षरें दिसलीं. त्यांच्या आनंदाला पारावरच उरला नाहीं. ते मुक्त झाले होते त्यांना आतां कसलाच धोका नव्हता. तो आनंद साजरा करण्यासाठीं त्यांनीं हवेंत रिव्हॉल्वरच्या दोन गोळ्या झाडल्या. तें रिव्हॉल्वर त्यांच्या लपलेल्या जागेंत त्यांच्या ट्रान्सवालमधील इंग्रज मित्रांनीं त्यांच्या संरक्षणासाठीं आणून ठेवलें होतें.

शेवटीं एकदांची ती मालगाडी 'लौरेन्स् मार्किस्' ला येऊन पोहोंचली. त्या वागिणीमध्यें चर्चिल सतत तीन दिवस होते. लौरेन्स् मार्किसला ते हळूच वागिणींतून खालीं उतरले व निग्रो लोकांत जाऊन मिसळले. ज्या लोकरीच्या वागिणींतून चर्चिलना लौरेन्स् मार्किसला पाठविण्यांत आलें, ती लोकर बर्जेनर ह्या नांवाच्या डच गृहस्थाची होती. त्या गृहस्थाला इंग्रजांविषयीं प्रेम वाटत होतें म्हणून हॉवर्ड ह्यांनीं त्यांच्यावर चर्चिलना लौरेन्स मार्किसला पोंचविण्याची कामगिरी सोंपविली होती.

मि. बर्जेनर लौरेन्स मार्किसच्या स्टेशनबाहेर चर्चिलची वाट पाहत थांबले. चर्चिल तेथें आल्यावर त्यांनीं त्यांना आपणामागें येण्याची खूण केली. ते दोघे आपणांमध्यें वीस मीटर्सचें अंतर सोडून जाऊं लागले.

कांहीं वेळानें वर्जेन एका कौलारू घरासमोर येऊन थांबले. ती ब्रिटिश वकिलात होती.

कॉन्सलच्या चिटणिसाला चर्चिल तेथें पोहोचतील असें वाटलें नव्हतें. " आज तुम्हांला कॉंसल भेटूं शकणार नाहींत, तुम्ही उद्यां या " असें तो चिटणीस चर्चिलना म्हणाला.

तें उत्तर ऐकतांच चर्चिल रागानें भयंकर बेफाम झाले, ते चिटणिसावर एकदम ओरडले. तो आरडाओरडा ऐकून कॉंसल स्वत: खिडकींत आला. तदनंतर चर्चिलचें चांगलें आगत स्वागत झालें.

त्याच रात्रीं चर्चिल लौरेन्स मार्किसहून बोटीनें दरबानला रवाना झाले. त्यांच्या सुरक्षिततेविषयीं ब्रिटिश कौंसलला भीति वाटत होती. कारण शहरांत बोअर लोकांचा सुळसुळाट होता. सुदैवाची गोष्ट ही कीं, लौरेन्स मार्किस शहरांत कांहीं इंग्रज लोकहि होते, त्यांनीं चर्चिलना संरक्षण देऊं केलें.

दरबानला चर्चिल ह्यांचें एखाद्या विजयी वीरासारखें मोठें स्वागत झालें. बंदर लतापल्लवांनीं शृंगारण्यांत आलें होतें. त्यांच्या स्वागतासाठीं धक्क्यावर पुष्कळ लोक गोळा झाले होते. बँडहि वाजत होते, दर्यासारंग, सेनापति आणि नगराध्यक्ष ह्यांनीं चर्चिलशीं हस्तांदोलन केलें. लोकांनीं त्यांना उचलून खांद्यावर घेऊन त्यांची नगरपालिकेपर्यन्त मिरवणूक काढली. तेथें त्यांना त्यांच्या इच्छेविरुद्ध एक छोटेंसें भाषण करावें लागलें. त्यांच्या-वर जगाच्या सर्व भागांतून अभिनंदनाच्या तारांचा वर्षाव झाला. त्याच रात्रीं ते इंग्रज सैन्याला जाऊन मिळण्यासाठीं सरहद्दीकडे रवाना झाले. तेथेंहि त्यांचें प्रचंड स्वागत झालें. तो नाताळच्या आदला दिवस होता.

******

प्रकरण नववें

# इंग्लंडला परत

दक्षिण आफ्रिकेंतील युद्ध १९०२ सालापर्यंत चाललें. त्या वर्षाच्या ३१ मेला तें समाप्त झालें. परंतु चर्चिल १९०० सालींच त्या युद्धांतून बाहेर पडले. तथापि इंग्लंडला माघारी परतण्यापूर्वी त्यांच्या हातून आणखी कांहीं पराक्रम घडल्याशिवाय राहिले नाहींत. लौरेन्स मार्किसहून दरबानला आल्यावर त्यांनीं लगेच युद्धांत भाग घेतला. लेडीस्मिथ येथील ब्रिटिश शिबंदीला बोअर सैन्यानें वेढा दिला होता हें मागें आलेंच आहे. त्या शिबंदीच्या मुक्ततेसाठीं ब्रिटिश सैन्यानें जी लढाई दिली तींत चर्चिलनीं भाग घेतला. त्या लढाईत चर्चिलचा घोडा जखमी होऊन ते खालीं पडले. ते बोअर सैनिकांकडून पकडले जाणार होते, पण एका इंग्रज सैनिकानें त्यांचा बचाव केला. त्या पराक्रमाबद्दल त्या सैनिकाला डी. सी. एम्. चा बहुमान बहाल करण्यांत आला. चर्चिल जर त्या वेळीं पुनः बोअर सैन्याच्या हातांत पडते तर त्यांनीं त्यांचें काय केलें असतें त्याची कल्पनाच केलेली बरी !

लेडी स्मिथ ह्या ठाण्याच्या मुक्ततेप्रमाणें चर्चिलनीं जोहान्सबर्ग शहराच्या मुक्ततेंतहि भाग घेतला. त्या शहरावर त्यांचे मित्र इयान हॅमिल्टन हे चालून गेले होते. नंतर प्रिटोरिया शहराच्या पाडावांतहि त्यांनीं भाग घेतला. त्या शहरांत त्यांना बऱ्याच इंग्रज युद्धबंद्यांसह कैद करून ठेवण्यांत आलें होतें, व तिथून ते फरारी झाले होते, हें मागें आलेंच आहे. त्या शहरांतून फरारी होणारे ते जसे पहिले होते, तसेच त्यांत विजयी प्रवेश करणारेहि ते पहिले होते. त्यांनीं त्या शहरांत प्रवेश केल्यावर पहिल्या प्रथम जर कोणतें कार्य केलें असेल, तर ब्रिटिश युद्धबंद्यांना मुक्त करण्याचें. किंबहुना त्याच युद्ध-कैद्यांनीं मुक्त झाल्यावर त्या शहरावर युनियन जॅक फडकावलें असें म्हटलें तरी चालेल.

असें सांगतात कीं, चर्चिल लौरेन्स मार्किसहून दरबानला आले तेव्हां, त्यांच्या स्वागतासाठीं धक्क्यावर ब्रिटिश फौजांचे सरसेनानी सर रेड्वर्स बुलर हेहि हजर होते. चर्चिलच्या धाडसानें ते स्तिमित होऊन गेले व त्यांनीं त्यांना विचारलें, " मी तुमच्यासाठीं काय करूं ?" त्यावर चर्चिल म्हणाले, " मला सैन्यांत कमिशन द्या. "

ती गोष्ट अर्थातच कठीण होती. कारण चर्चिल हे सैन्यांतील आपल्या कमिशनचा राजिनामा देऊन, नागरी जीवनांत शिरले होते. पुन. ते दक्षिण आफ्रिकेला एका पत्राचे वार्तांहर म्हणून आले होते. एखाद्या लश्करी अधिकाऱ्याला एकाच वेळी वृत्तपत्र प्रतिनिधि आणि सैनिक अशीं दोन्ही कामें बरोबर करतां येत नव्हतीं. युद्धखात्यानें खास हुकूम काढून हीं दोन्ही कामें बरोबर करण्यास मनाई केली होती. तथापि असें जरी असलें, तरी सर रेड्वर्स बुलर हे मोठ्या अधिकाराचे सेनापति असल्यानें त्यांनीं चर्चिल ह्यांना हंगामी लश्करी तुकडींत लेफ्टनंटचें कमिशन दिलें. त्या तुकडीचें नेतृत्व कर्नल ह्या नांवाचे अधिकारी करीत होते. पुढें ते लॉर्ड बिंग ऑफ व्हिमी ह्या नांवानें प्रसिद्धीस आले.

चर्चिलची तुकडी घोडदळाची होती. प्रिटोरियाच्या पाडावानंतर त्यांनीं डायमंड हिलच्या लढाईंतहि भाग घेतला. तदनंतर त्यांनीं इंग्लंडला परतण्याचा निर्णय घेतला.

१९०० च्या जुलै महिन्यांत चर्चिलची बोट साउदॅम्प्टन बंदरास लागली. बोटीवर सगळे उतारू त्यांच्याचकडे पाहात राहिले होते. त्यांच्या धाडसांनीं त्यांना मोठीच कीर्ति मिळवून दिली असल्यानें ते लोकांच्या कौतुकास आणि उत्सुकतेस पात्र झाले होते. त्यांनीं निवडणुकीला ओल्डहॅम मतदार संघांतून उभें राहण्याचें अगोदरच ठरवून टाकलें होतें. म्हणून बोटीवर ते आपल्या निवडणुकांतील भाषणें लिहून काढीत होते व त्यांची तालीमहि करीत होते. साउदॅम्प्टन बंदरांत त्यांचें प्रचंड स्वागत झालें: तें स्वागत पाहून कांहीं हुजूर पक्षीय पुढाऱ्यांना चर्चिल पंतप्रधानपदासाठीं खटपट तर करणार नाहींत ना अशी भीति वाटल्यावांचून राहिली नाहीं.

लंडन शहरांत ते त्यांच्या आईच्या पुर्नविवाहास उपस्थित राहिले. तिचा विवाह जॉर्ज कॉर्नवालीस-वेस्ट ह्यांच्याशीं झाला. ते एक धंदेवाईक सैनिक

होते. आईचा विवाह आटपून चर्चिल थट ओल्डहॅमला गेले व त्यांनीं निवडणूक प्रचाराच्या मोहिमेंत भाग घेतला.

त्या वर्षीच्या निवडणुका ह्या विसाव्या शतकांतील पहिल्या आणि राणी व्हिक्टोरिया हिच्या अमदानींतील शेवटच्या निवडणुका होत्या. चर्चिलना इतर अकरा मतदार संघांनीं आपल्यातर्फे उभें राहण्याची विनंती केली होती. पण त्यांनीं त्या विनंतींस साभार नकार देऊन ज्या मतदार संघांत त्यांचा आदल्या वर्षीच्या फेरनिवडणुकींत पराभव झाला होता, त्याचीच निवड केली. ओल्डहॅममध्यें त्यांनीं विजयी प्रवेश केला. त्यांच्या मिरवणुकींत वाद्यें होतीं व "इंग्लंडचा महावीर" असे फलक होते. ओल्डहॅमच्या सर्व रस्त्यांतून ती मिरवणूक फिरली त्यांचे मागच्या फेरनिवडणुकांतील प्रतिस्पर्धि एम्मोट्ट आणि रान्सिमन हे दोघे या वेळींहि त्यांना विरोध करीत होते. ते उदार-मतवादी पक्षाचे उमेदवार होते, तर चर्चिल हे टोरी पक्षाचे होते. त्यांचे दुसरे सहकारी क्रिस्प हे होते.

दोन महिन्यांत चर्चिल एकूण १५० सभांमध्यें बोलले. निवडणूक एकूण चुरशीची झाली. एकादा किल्ला सर करावा त्याप्रमाणें ओल्डहॅम मतदार संघांतील निवडणूक आपण जिंकूं अशी चर्चिलना आशा वाटत होती. पण तसें घडलें नाहीं. एम्मोट्ट ह्यांना चर्चिलपेक्षां अधिक मतें पडलीं. ते पहिले तर चर्चिल दुसरे. तथापि त्यांचा विजय जरी डावा असला. तरी त्यांच्यावर अभिनंदनाचा सर्वांत अधिक वर्षाव झाला, देशाच्या सर्व भागांतून त्यांना अभिनंदनपर संदेश आले. अशा रीतीनें वयाच्या अवघ्या पंचविसाव्या वर्षी चर्चिल पार्लमेंटचे सभासद झाले. खरोखर कुणीहि हेवा करावा असा हा त्यांचा विजय होता.

मागें आलेंच आहे कीं, चर्चिलचा जन्म जरी एका उमराव घराण्यांत झाला असला तरी त्यांचे वडील श्रीमंत नव्हते. त्यांनीं लश्करांतील नोकरी किफा-यतशीर नाहीं म्हणून ती सोडून लेखनाचा पेशा पत्करला होता. त्या धंद्यांत त्यांना तोंपर्यंत सहा ते सात हजार पौंड मिळाले होते. पण ते सर्व पैसे निव-डणुकीच्या खर्चासाठीं खलास झाले होते. चर्चिल हे जरी वयानें त्या वेळीं लहान असले, तरी ते त्यांच्या वयाच्या खानदानी वर्गांतील तरुणांप्रमाणें

वाटेल तसा पैसा खर्च करीत नसत. त्यांचा खर्च वेताचाच असे. पण तरीहि त्यांना पैशाची अडचण भासत होती. दुसरी गोष्ट म्हणजे त्या काळीं पार्लमेंटच्या सभासदांना पगार नव्हता.

अशा परिस्थितींत पैसा कसा मिळवावा असा प्रश्न चर्चिलसमोर उभा राहिला. त्याच वेळीं त्यांना कुणाकडून तरी कळलें कीं, ज्यांना वक्तृत्वकला अवगत आहे ते अमेरिकेंत व्याख्यानाचा दौरा काढून चांगले पैसे कमावूं शकतात. चर्चिल वक्तृत्वकलेंत निपुण असल्याचें त्यांच्या निवडणुकांतील भाषणांवरून सिद्ध झालें होतें. त्यांनीं अमेरिकेला व्याख्यानांच्या दौऱ्यावर जाण्याची योजना आंखली. तत्पूर्वी त्यांनीं इंग्लंडमधून एक दौरा काढला. त्या भाषणांत त्यांना ऑर्थर कॉननडॉइल ह्यांसारखे प्रख्यात गुप्तपोलीस कादंबरीकार आणि लॉर्ड डफरीन ह्यांच्यासारखे अध्यक्ष लाभले. त्या दौऱ्यांत त्यांनीं सात हजार पौंडांची रक्कम मिळविली. अमेरिकेला निघेपर्यंत त्यांचा हा पैसा कमावण्याचा धंदेवाईक व्याख्यानांचा दौरा चालू राहिला.

परंतु अमेरिकेचा दौरा फारसा यशस्वी झाला नाहीं. चर्चिलचीं साम्राज्यवादी मतें इंग्लंडच्या साम्राज्यशाहीच्या मगरमिठींतून मुक्त झालेल्या त्या जुन्या वसाहतींतील लोकांना पटेनात. बोअर युद्धांत अमेरिकन लोकांची सहानुभूति बोअरांच्या बाजूनें होती. कारण तें युद्ध दक्षिण आफ्रिकेच्या स्वातंत्र्याचें असल्याची त्यांची भावना होती. चर्चिलचें पहिलें भाषण न्यूयॉर्क शहरीं प्रख्यात कादंबरीकार मार्क ट्वेन ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झालें. त्या भाषणाला बरेच श्रोते उपस्थित होते. हॉल भरलेला होता पण ते लोक चर्चिलच्या भाषणापेक्षां मार्क ट्वेन ह्यांनाच बघण्याकरितां अधिक आले होते. चर्चिलच्या बाल्टिमोर येथील भाषणाला मूठभर श्रोते उपस्थित होते, आणि शिकॅगो शहरांत तर त्यांच्या सभेला चांगलाच विरोध झाला. एकदां तर त्यांना सभास्थान सोडून बाहेर जावें लागतें कीं काय अशी परिस्थिति निर्माण झाली. परंतु नंतर श्रोते चर्चिलचीं मतें ऐकून घेऊं लागले. त्यांच्या सभांना श्रोत्यांची उपस्थितिहि चांगली होऊं लागली. आणि बोस्टन शहरांत तर लोकांनीं ब्रिटिशांना सहानुभूति दर्शविण्याकरितां निदर्शनेंहि केलीं. पण एकंदरींत चर्चिलचा अमेरिकन लोकांविषयीं चांगला ग्रह झाला. ते लोक शांत आणि टीकाखोर असले, तरी आतिथ्यशील आणि सुस्वभावी होते.

चर्चिल अमेरिकेंत तब्बल पांच महिने राहिले. अमेरिकेहून इंग्लंडला माघारी परतण्यापूर्वी त्यांनीं कॅनडांतहि एक व्याख्यानांचा दौरा काढला. ते रोज भाषणें करीत. फक्त रविवारीं तेवढी विश्रांति घेत. ते एके ठिकाणीं दोन रात्रीं क्वचितच झोपले. त्यांनीं पैसा वाटेल तसा खर्च केला नाहीं. त्या दौऱ्यांत त्यांना नगद पन्नास हजार डॉलर्स मिळाले.

दि. २२ जानेवारी १९०१ रोजीं महाराणी व्हिक्टोरिया ह्यांचें निधन झालें. त्यांच्या मागें त्यांचे पुत्र सप्तम एडवर्ड हे गादीवर आले. त्यांच्या राज्यारोहणानें इंग्लंडमध्यें नवीन राजकीय कारकीर्द सुरू झाली. चर्चिल हे टोरी पक्षातर्फे निवडून आले होते, पण त्यांची विचारसरणी उदारमतवादी होती. पार्लमेंटमधील त्यांचें पहिलें भाषण अतिशय प्रभावी झालें. पण त्यांच्यासारख्या तरुण सभासदानें त्यांच्याहून वयस्क अशा सभासदांसमोर वक्तृत्वकलेचें प्रदर्शन करावयास नको होतें,अशी कांहीं सभासदांनीं टीका केली. विन्स्टन चर्चिलचे वडील लॉर्ड रँडॉल्फ हे देखील एक प्रभावी वक्ते होते. परंतु त्यांनीं देखील आपल्या वक्तृत्वाचे चमकदार पैलू पार्लमेंटमध्यें दाखविण्यास दोन महिनेपर्यंत कळ काढली होती. पण चर्चिलनीं पार्लमेंटमध्यें प्रवेश केल्याच्या तिसऱ्याच दिवशीं तें दणदणीत भाषण करून पार्लमेंटमध्यें पुष्कळ वर्षें ठिय्या देऊन राहिलेल्या दुढ्ढाचार्यांचा रोष संपादन केला. टोरी पक्षांतील वृद्ध सभासदांनीं तर त्या दिवशीं मनांत पक्की खूणगांठ बांधली कीं, हें अद्भुत बालक आपल्या वेसणींत राहणें कठीण आहे. आणि त्याच दिवसापासून टोरी पुढाऱ्यांचे आणि चर्चिलचे मतभेद होण्यास सुरुवात झाली. ते मतभेद उत्तरोत्तर वाढत गेले.

१९०३ सालीं चर्चिलच्या उदारमतवादी विचारसरणीला टोरी पक्षामध्यें बंडखोरपणाचें उघड स्वरूप प्राप्त झालें. टोरी पक्षाचे एक अध्वर्यु जोसेफ चेंबर्लेन हें 'साम्राज्यांतर्गत मुक्त व्यापारा'चे पुरस्कर्ते होते ते बर्मिंगहॅम ह्या औद्योगिक शहरांतून पार्लमेंटमध्यें निवडून आले असल्यानें आणि मोठ्या उद्योगपतींचे ते पार्लमेंटमधील प्रतिनिधि असल्यानें त्यांनीं साम्राज्यांतर्गत खुल्या व्यापाराचा पुरस्कार केला असल्यास नवल नव्हतें. पण चर्चिल ह्यांच्यासारख्या फटकळ टोरी एम्. पीं. ना जोसेफ चेंबर्लेन ह्यांच्या साम्राज्यांतर्गत खुल्या व्यापाराच्या पुरस्कारामागील हेतूचा संशय येऊन

त्यांनीं त्या धोरणावर टीका करण्यास सुरवात केली. ती टीका अर्थातच कट्टर टोरी एम्. पीं. ना आवडली नाहीं. इतकेंच नव्हे तर एके दिवशीं चर्चिल पार्लमेंटमध्यें भाषण करीत असतां सरकारपक्षाच्या टोरी एम्. पीं. नी त्यांची हुर्यो करून त्यांना भाषण करणें अशक्य करून सोडलें. त्या प्रसंगाचे प्रतिध्वनि दुसऱ्या दिवशीं वर्तमानपत्रांत उमटल्याशिवाय राहिले नाहींत. त्या घटनेमुळें चर्चिलना आणखी प्रसिद्धि मिळाली.

पार्लमेंटचें तें अधिवेशन चर्चिलच्या आयुष्यांत एक महत्त्वाचें आणि वादळ निर्माण करणारें अधिवेशन ठरलें. चर्चिलना आतां टोरी सदस्यांबरोबर सहकार्य करणें अशक्य झालें. त्यांनीं एके दिवशीं आपली जागा बदलून ते सरळ उदारमतवादी सदस्यांमध्यें जाऊन बसले.

******

## प्रकरण दहावें

## मंत्रीपद

१९०६ च्या सार्वत्रिक निवडणुकांत उदारमतवादी पक्षानें चर्चिलना मँचेस्टर वायव्य मतदारसंघांत आपला मतदार म्हणून उभें केलें. ह्या मतदार संघांतून सर विल्यम हुल्डस्वर्थ ह्या नांवाचे टोरी एम्. पी. निवडून येत असत. पण त्यांचा आतां वृद्धापकाल झाला होता व ते राजकारणांतून निवृत्त झाले होते. त्यांच्या जागीं टोरी पक्षानें १९०६ सालच्या निवडणुकांत जॉन्सन हिक्स ह्या नांवाच्या एका तरुण सॉलिसिटरला आपला उमेदवार म्हणून उभें केलें. चर्चिल आणि त्यांचे प्रतिस्पर्धी विलियम जॉन्सन हिक्स ह्या दोघांमध्यें मोठाच विरोधाभास होता. चर्चिल हे जरी श्रद्धाळु असले तरी धर्मभोळे आणि धर्मांध नव्हते. ह्याच्या उलट जॉन्सन हिक्स हे

धर्मभोळे आणि ब्रिटिश चर्चचे कट्टर अनुयायी होते. चर्चिल हे व्हिस्कीचा पुरस्कार करणारे होते. तर जॉन्सन हिक्स हे व्हिस्कीच्या विरुद्ध होते.

मँचेस्टरमध्यें ज्यू लोकांची बरीच मोठी वस्ती आहे. टोरी सरकारनें इंग्लंड-मधील परकी लोकांसंबंधानें 'अलावन्स बिल' ह्या नांवाचा जो कायदा पसार करून घेतला होता त्याबद्दल इंग्लंडमधील ज्यू लोकांमध्यें नापसंतीची भावना निर्माण झाली होती. चर्चिलना तें माहीत होतें. म्हणून ज्यू लोकांचीं मतें आपणांस मिळावीं यासाठीं त्यांनीं एका निवडणूक प्रचाराच्या भाषणांत अलावन्स बिलावर टीका केली व यहुदी धर्मासंबंधानें गौरवपूर्ण उद्‌गार काढले. ज्यू लोकांना चर्चिल हे मोझेससारखे एक प्रेषितच वाटले व ते एकदम त्यांच्या बाजूचे झाले. फार कशाला, ज्यू लोकांच्या एका सभेंत एका ज्यू पुढाऱ्यानें आपल्या लोकांना उद्देशून जाहीर केलें कीं, "जो कुणी चर्चिल-विरुद्ध मत देईल तो ज्यू जमातीचा शत्रु ठरेल." दुसऱ्या एका ज्यू पुढाऱ्यानें 'विन्स्टन विल्सम (मोहक) ला मतें द्या." अशी घोषणा केली. त्यावर चर्चिलनीं अशी कोटी केली कीं, "मतदान झाल्यावर शनवारीं तुम्ही मला विजयी विन्स्टन असें म्हणा."

ज्यू पुढाऱ्यांनीं जरी भावनेच्या भरांत आपल्या लोकांना चर्चिलना मत देण्याची विनंती केली असली, तरी कांहीं ज्यू असे होते कीं ते हुजूर पक्षाचे अनुयायी होते. त्यांनीं हुजूर उमेदवार जॉन्सन हिक्स ह्यांना रविवारीं आपल्या भागांत सभा घेण्याची सूचना केली. हिक्स त्यांना म्हणाले कीं 'नाहीं, जोंपर्यंत मी तुमचा उमेदवार किंवा प्रतिनिधि आहें तोंपर्यंत मी रविवारीं निवडणूक प्रचार कधीच करणार नाहीं.' त्या उद्‌गारांनीं हिक्सचें भवितव्य निश्चत केलें. सर्व ज्यूंनीं आपलीं मतें चर्चिलना दिलीं. चर्चिल हुजूर उमेद-वाराचा पराभव करून उदारमतवादी पक्षाचे सभासद म्हणून पार्लमेंटमध्यें निवडून आले. पण ह्या ठिकाणी एका गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे तो हा कीं, चर्चिलना जर ज्यू लोकांची मतें मिळालीं नसतीं, तर ते विजयी झाले असते कीं काय ह्याची शंका आहे. कारण, त्या निवडणूक प्रचारांत हुजूर पक्षांच्या प्रचारकांनीं चर्चिलना जसा त्रास दिला तसाच त्रास त्यांना स्त्रियांना मतदानाचा हक्क असावा असा प्रचार करणाऱ्या 'सफ्राजेट' चळवळींतील लोकांनींहि दिला. ख्रिस्ताबेल पॅन्खर्स्ट ह्या नांवाची स्त्री सफ्राजेटस्ची पुढारी

होती. तिनें आणि तिच्या अनुयायांनीं चर्चिलच्या निवडणूक प्रचाराच्या सभांमध्यें वारंवार अडथळे आणले व कांहींदां त्या सभा उधळून लावण्याचाहि प्रयत्न केला.

चर्चिल पार्लमेंटमध्यें दुसऱ्यांदां निवडून आले, तेव्हां त्यांचें वय ३१ होतें. त्या वयांत त्यांनीं पार्लमेंटच्या तीन निवडणुका लढविल्या होत्या. पैकीं पहिल्या फेरनिवडणुकींत त्यांना अपयश आलें होतें, तर दुसऱ्या दोन्ही सार्वत्रिक निवडणुकांत ते यशस्वी झाले होते. पहिल्या सार्वत्रिक निवडणुकांत ते हुजूर पक्षाच्या तिकिटावर निवडून आले होते, तर दुसऱ्या निवडणुकांत उदारमतवादी पक्षाच्या त्या निवडणुकांत हुजुरांचा प्रचंड पराभव झाला.

उदारमतवादी पक्षाच्या मंत्रिमंडळांत चर्चिलना उपवसाहतमंत्री म्हणून घेण्यांत आलें मंत्रिमंडळांतील तेच मंत्री तरुण होते. त्यांचे ज्येष्ठ वसाहतमंत्री अर्ल ऑफ एल्गिन हे होते. ते हिंदुस्थानांतून नुकतेच इंग्लंडला परतले होते. हिंदुस्थानांत ते व्हाइसरॉय होते. त्यांची कारकीर्द यशस्वी झाल्याबद्दल उदारमतवादी पुढाऱ्यांनीं त्यांना निवडणुकांत उभें करून निवडून आणलें होतें व त्यांच्याकडे वसाहतमंत्रीपद सुपूर्त केलें होतें. त्यांनीं हिंदुस्थानांत सर्वोच्च स्थान भूषविलें असल्यानें इंग्लंडमध्येंहि आपणांस मानानें वागविण्यांत यावें अशी त्यांची इच्छा होती. विशेषेंकरून त्यांचे उपमंत्री चर्चिल ह्यांच्याकडून ते त्या मुर्वतीची अपेक्षा करीत होते. परंतु चर्चिल हे जरी वयानें लहान असले आणि राज्यकारभारांतील त्यांचा अनुभवहि जरी थोडा असला तरी ते कुणाचा मुलाहिजा बाळगणारे गृहस्थ नव्हते. त्याचा परिणाम असा झाला कीं, अर्ल ऑफ एल्गिनचें आणि त्यांचें विशेष पटेनासें झालें. चर्चिलच्या मनांत वसाहतींच्या राज्यकारभारांत सुधारणा घडवून आणायचीं होती म्हणून त्यांनीं एक कैफियत तयार करून ती वसाहतमंत्री अर्ल ऑफ एल्गिन ह्यांना सादर केली होती. पण त्यांनीं त्या कैफियतीचा विचारसुद्धां केला नाहीं. अशा रीतीनें त्या दोघांमधील मतभेद वाढत जाऊं लागले.

त्याच वेळीं पंतप्रधान हेन्री कँपबेल-बॅनरमन हे आजारी पडल्यानें त्यांनीं आपल्या पंतप्रधानकीचा राजीनामा दिला. त्यांचे जागीं हर्बर्ट ॲस्किथ ह्यांची पंतप्रधान म्हणून निवड झाली. त्यांनीं आपल्या मंत्रिमंडळांत चर्चिल ह्यांना बढती देऊन बोर्ड ऑफ ट्रेडचे अध्यक्ष नेमले. ती जागा मंत्र्याची होती.

पण त्या वेळीं पार्लमेंटचा असा एक कायदा होता कीं, ज्या मंत्र्याला मंत्रि-मंडळांत वढती मिळेल त्यानें त्या वढतीला त्याच्या मतदार संघांतील लोकांचा पाठिंबा आहे कीं नाहीं ह्याची चांचणी घ्यावी. त्या कायद्याप्रमाणें चर्चिलना त्यांना मिळालेल्या नवीन जागेबद्दल त्यांच्या मतदारसंघाचा कौल घेणें भाग पडलें. ह्या वेळीं त्यांना त्यांचे जुने प्रतिस्पर्धी जॉन्सन हिक्स ह्यांनीं विरोध केला. ती निवडणूक मोठी चुरशीची होऊन तींत चर्चिलचा पराभव झाला. ही घटना १९०८ सालच्या वसंत ऋतूंत घडली. या वेळीहि त्यांनां सफ्राजेटस्नीं फार त्रास दिला.

चर्चिलच्या पराभवानंतर त्यांनी अशी प्रौढी मिरविण्यास सुरुवात केली कीं चर्चिलचा पराभव आम्हीं केला. पण चर्चिल त्या पराभवानें हताश झाले नाहींत. ते पूर्वींसारखेच धीरगंभीर राहिले. दुसरी गोष्ट अशी कीं, त्यांचा हा पराभव फार मोठा नव्हता. त्यांच्या प्रतिस्पर्ध्याला त्यांच्यापेक्षां अवघीं ४९२ मतें अधिक मिळालीं होतीं.

पण चर्चिल ह्यांचा तो पराभव नुसता तात्पुरता होता. त्यांचा पराभव होतो न होतो, तोंच स्कॉटलंडमध्यें डंडी मतदार संघांत फेर-निवडणूक झाली. त्या मतदारसंघांतून निवडून आलेले उदारमतवादी उमेदवार एडमंड रॉबर्टस्न ह्यांना उमराव करण्यांत आल्यानें त्यांची जागा खालीं झाली होती. स्कॉटिश उदारमतवाल्यांनीं चर्चिलना ती जागा लढविण्यास पाचारण केलें. त्यांनीं त्या विनंतीचा स्वीकार करून फेरनिवडणुकीला अर्ज केला आणि विशेष गोष्ट ही कीं त्यांच्या हुजूर आणि मजूर प्रतिस्पर्ध्याहून तीन हजार अधिक मतांनीं ते विजयी झाले.

मँचेस्टर वायव्य मतदार संघांत चर्चिलचा जो पराभव झाला तोआपणच घडवून आणला, अशी वल्गना सफ्राजेटस् चळवळीच्या पुढारी स्त्रिया करीत होत्या. परंतु चर्चिल डंडी येथील फेरनिवडणुकीला उभे राहणार असल्याचें कळतांच त्यांच्या विजयावर चांगलेंच विरजण पडलें. तरीहि त्यांनीं डंडीपर्यंत चर्चिलचा पाठलाग करून त्यांच्याविरुद्ध अपप्रचार केला. परंतु त्या अप-प्रचाराचा डंडीच्या नागरिकांवर कोणताच परिणाम झाला नाहीं. त्यांनीं चर्चिलना प्रचंड बहुमतानें निवडून आणलें. आपल्या अपप्रचारानें डंडीच्या नागरिकांचें मन चर्चिलविषयीं कलुषित होऊन ते त्यांना मतें देणार नाहींत

असा आत्मविश्वास सफ्राजेटस्‌ना वाटत होता. इतकेंच नव्हे तर त्यांनीं तसें बोलून दाखविण्यास देखील सुरुवात केली होती. पण चर्चिलचा प्रचंड बहुमतानें विजय होतांच त्यांचीं तोंडें बघण्यासारखीं झालीं.

१९०८ सालच्या सप्टेंबर महिन्यांत विन्स्टन चर्चिल ह्यांच्या क्लॅमंटाइन होझियर ह्या नांवाच्या एका सुस्वरूप मुलीशी विवाह झाला. क्लॅमंटाइनचे वडील कर्नल होझियर हे तिसऱ्या ड्रॅगन्समधील एक अधिकारी होते. तिची आई ही स्कॉटलडमधील अर्ल ऑफ एर्ली ह्या उमरावाची नात होती. चर्चिल आणि मिस् क्लॅमंटाइन होझियर ह्या दोघांची पहिली भेट एका मेळाव्यामध्यें झाली होती. तेथेंच तीं दोघें एकमेकांच्या प्रेमांत पडलीं. लॉर्ड ह्यू सेसिल ह्यांनीं त्या विवाहांत चर्चिलचे 'बेस्ट मॅन' म्हणून काम केलें. ह्या विवाहांतील एक विलक्षण गोष्ट म्हणजे ही कीं सर्वसामान्य रीतिरिवाजाला न अनुसरतां चर्चिलनीं काळ्या रंगाचे बूट न वापरतां उदी रंगाचे बूट वापरले. अशा रीतीनें त्यांनीं आपला जन्मजात बंडखोरपणा लग्नासारख्या मंगल समारंभांत देखील दाखविला. पण हा विवाह फारच यशस्वी झाला. चर्चिल हे जसे एक यशस्वी राजकारणी म्हणून प्रसिद्धीस आले, तसेच एक चांगले कुटुंबवत्सल गृहस्थ म्हणून त्यांचा सर्वत्र बोलबाला झाला.

विवाहानंतर चर्चिल मधुचंद्रासाठीं त्यांचे पूर्वज ड्यूक ऑफ मार्लबरो ह्यांनीं बांधलेल्या 'ब्लॅन्‌हिम' ह्या नांवाच्या राजवाड्यांत गेले. ड्यूक ऑफ मार्लबरो ह्यांनीं ब्लॅन्‌हिम्‌ची प्रख्यात लढाई जिंकली होती म्हणून त्या वाड्यास ब्लॅनहिम् हें नांव ठेवलें होतें. तिथें कांहीं दिवस घालविल्यावर तें नवविवाहित दांपत्य इटालीच्या प्रवासास गेले. तिथून परतल्यावर त्यांनीं लंडन शहरीं 'क्वीन ॲन् गेट' वर एक लहानसें घर भाड्यानें घेऊन संसार थाटला. त्यांचा संसार आटोपशीर होता ह्याचें कारण तीं दोघें जरी उमराव घराण्यांतून आलीं असलीं, तरी त्यांना वडिलार्जित इस्टेटीचा वारसा लाभला नव्हता. चर्चिलना आपला संसार स्वतः बचत केलेल्या पैशांवर उभारावा लागला होता. त्यांच्या पत्नीनें मोठा हुंडा आणला नव्हता. क्वीन ॲन गेटवर थोडे दिवस राहिल्यावर चर्चिल मग 'एक्लेस्टन स्कॅअर' वर पहिल्या घराहून जरा मोठ्या घरांत राहावयास गेले. त्यांची

तिथलीहि राहणी बेताचीच होती. कारण त्यांना स्वतः मिळवून प्रपंच भागवावा लागत असल्यानें ऐषआरामी जीवन असें जगतां आलें नाहीं.

१९०७ सालापासून पहिल्या महायुद्धापर्यंत चर्चिलच्या आयुष्यांत जबरदस्त अशीं स्थित्यंतरें घडलीं. ते प्रथम टोरी होते, नंतर उदारमतवादी बनले. वसाहतखात्याचे उपमंत्री असतांना त्यांचीं मतें उदारमतवादी आणि कांहींशीं जहाल होतीं. हिंदुस्थानला स्वराज्य देण्याच्या ते जरी विरुद्ध असले, तरी मागासलेल्या वसाहतींतील लोकांची उन्नति घडवून आणण्यासाठीं त्यांनीं एक क्रांतिकारक योजना आंखली होती. परंतु त्या योजनेला वसाहतमंत्र्यांनीं केराची टोपली दाखविल्यानें ते वसाहतींतील मागासलेल्या लोकांसाठीं काहीं करूं शकले नाहींत. तदनंतर ते बोर्ड ऑफ ट्रेडचे अध्यक्ष झाले. तेथेंहि कांहीं तरी न भूतो असें करून दाखविण्याचा त्यांचा विचार होता. पण लोकशाही-मध्यें एकटा मनुष्य स्वतंत्र बुद्धीनें कांहीं करूं शकत नाहीं ह्याचा चर्चिलना पुनः अनुभव आला. त्यांच्या ह्या चळवळया आणि धाडसी स्वभावामुळें ते ज्येष्ठ मुत्सद्यांमध्यें फारच अप्रिय बनले. त्यांच्या चरित्रकारांनीं त्यांचें " देशांतील सर्वांत अप्रिय राजकारणी " म्हणून वर्णन केलें आहे.

वसाहतखात्याचे उपमंत्री असतांना चर्चिलनीं, माल्टा, सायप्रस, ब्रिटिश ईस्ट आफ्रिका, युगांडा, सुडान, इजिप्त वगैरे वसाहतींमध्यें प्रत्यक्ष पाहणीचा दौरा काढला. हा प्रवास त्यांनीं जरी उपमंत्री या नात्यानें केला असला तरी अर्थार्जनाकडेहि त्यांचें दुर्लक्ष झालें नाहीं. त्यांनीं ' स्ट्रँड ' ह्या नांवाच्या मासिकांत प्रवासवर्णनें लिहून चांगलीच कमाई केली. ह्या प्रवासांत त्यांना अनुभवांची शिदोरीहि चांगली मिळाली. तथापि कांहीं मत्सरी लोकांनीं त्यांच्या ह्या दौऱ्यासंबंधीं टीका करण्यासहि कमी केलें नाहीं.

चर्चिल आपल्या कामांत जरी नेहमी तत्पर असले, तरी आपल्या पोषाखा-विषयीं ते बेफिकीर असत. त्यांचा हा बेफिकीरपणा लोकांच्या डोळ्यांत चांगलाच भरत असे. असें सांगतात कीं, एकदां ते पार्लमेंटच्या एका रात्रींच्या बैठकीस त्याच्या अंगांत असलेल्या गुलाबी रंगाच्या पायजम्यासहितच गेले. अशीच घटना आणखी एकदां घडली. इंग्लंडच्या राजेसाहेबांनीं त्यांना प्रीव्ही कौंसिलरचा दर्जा दिला होता. त्या समारंभास उपस्थित राहण्या-साठीं ते विंडसर किल्ल्यांत गेले. सतत शंभर वर्षांपासून अशी प्रथा होती

कीं, नवीन प्रीव्ही कौंसिलर्सनीं त्या समारंभास 'टेल कोट' घालून उपस्थित राहावें. त्या प्रथेप्रमाणें इतर कौंसिलर्स 'टेल कोट' मध्यें होते. फक्त चर्चिल तेवढे 'टेल कोट' न घालतां गेले होते. आणि त्यांच्या अंगांतला नेहमीं वापरण्याचा को तरी कसा होता ? तो त्यांच्या आजोबांच्या कोटासारखा जुना पुराणा वाटत होता. चर्चिलचें तें ध्यान बघतांच समारंभाला जमलेल्या लोकांमध्यें एकच कुजबूज सुरू झाली. सगळयांनाच त्या गोष्टीचा धक्का बसला. पण राजेसाहेबांनीं मात्र प्रसंगावधान राखून वेळ निभावून नेली. त्यांनीं त्या घटनेकडे दुर्लक्ष केलें. इतकेंच नव्हे, तर सगळे लोक निघून गेल्यावर त्यांनीं चर्चिलशीं थोडा वेळ गप्पाहि मारल्या. ही घटना राजे एडवर्ड ह्यांच्या वेळीं घडली.

१९१० सालीं जेव्हां उदारमतवादी पक्षाला फारच विरोध झाला, तेव्हां त्यांना सार्वत्रिक निवडणुका जाहीर करणें भाग पडलें. ह्या निवडणुकांतहि चर्चिल डंडीमधून निवडून आले. नवीन मंत्रिमंडळांत त्यांची बोर्ड ऑफ ट्रेडच्या अध्यक्षपदावरून गृहमंत्रीपदावर बढती झाली. गृहमंत्री या नात्यानें त्यांची कारकीर्द चांगलीच यशस्वी झाली. आणि इंग्लंडचा एक खंबीर आणि धाडसी भावी नेता म्हणून ते लोकांसमोर आले. त्यांनीं १९१० सालीं कोळशाच्या खाणींतील मजुरांचें बंड मेट्रोपोलिटिन हत्यारी पोलीस पाठवून मोडून काढलें, आणि १९११ सालीं जिवावर उदार होऊन लढणाऱ्या कांहीं अराजक म्हणवून घेणाऱ्या पिस्तुलवाऱ्यांविरुद्ध स्वतःच्या मार्गदर्शनाखालीं मोहीम काढली. ही घटना १९११ सालच्या सुरुवातीला लंडन शहरीं सिड्ने स्ट्रीटवर घडली.

१९११ सालच्या तीन जानेवारीच्या दिवशीं गृहमंत्री चर्चिल हे सकाळीं न्हाणीघरांत आंघोळीला गेले होते. इतक्यांत न्हाणीघराचें दार ठोठावलें गेलें. त्यांना सांगण्यांत आलें कीं,हाउंड्स्डिच येथील पोलिसाला ठार करणारे कांहीं अराज्यवादी सिड्ने स्ट्रीटवर १०० नंबरच्या घरांत एका खोलींत दडून बसले आहेत. त्यांच्यापाशीं पुष्कळ बंदुका आणि दारुगोळा व हात-बॉम्स् आहेत.

त्या जिवावर उदार झालेल्या अराज्यवाद्यांचा तलास पोलिसांना आदल्या रात्रीं लागला होता. पण त्यांनीं पोलिसांना शरण येण्यास साफ नकार

दिल्यानें त्यांच्याविरुद्ध कारवाई करणें आवश्यक झालें होतें व म्हणून ते ज्या इमारतींत दडून बसले होते ती इमारत खालीं करण्याचा तिथल्या रहिवाश्यांना इशारा देण्यांत आला होता. इमारत खालीं करण्यांत आल्यावर बंदूकधारी बदमाशांना शरण येण्याचा पुन: इशारा देण्यांत आला. त्याला त्यांनीं गोळीबारानें प्रत्युत्तर दिलें. एक सी. आय. डी. इन्स्पेक्टर त्या गोळीबारांत जखमी झाला. पोलिसांनीं त्या गोळीबारास गोळीबारानेंच प्रत्युत्तर दिलें.

पण ते बदमाश कांहीं केल्या शरण येण्यास तयार नाहींत हें जेव्हां पोलिसांनीं बघितलें, तेव्हां लश्कर बोलविण्याची आवश्यकता निर्माण झाली. पण त्याला गृहमंत्र्याची परवानगी हवी होती. ती परवानगी तावडतोब देण्यांत आली.

चर्चिल न्हाणीगृहांत आंघोळ करीत होतें. अंग पुसण्याच्या टॉवेला-शिवाय त्यांच्यापाशीं आणखी कोणतेंच वस्त्र नव्हतें. त्याच स्थितींत टॉवेल अंगाभोवतीं लपेटून ते सिड्ने स्ट्रीटवरील घटनेची माहिती जाणून घेण्यासाठीं टेलिफोनवर गेले. तदनंतर वीस मिनिटांच्या आंतच ते आपल्या कचेरींत गेले. परंतु तेथें आलेल्या संदेशांवरून परिस्थितीची स्पष्ट कल्पना होत नव्हती. बंदूकधारी लोक किती होते त्याचा संदेशांत उल्लेख नव्हता. परि-स्थितीची चक्षुर्वैसत्यम् पाहणी करण्याची आवश्यकता चर्चिलना वाटली व ते ताबडतोब सिडने स्ट्रीवर रवाना झाले. परंतु ह्या ठिकाणीं एक गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे ती ही कीं, कर्तव्यबजावणीपेक्षां त्यांत जिज्ञासाच अधिक होती.

गोळीबारास पहांटेस तीन वाजतां सुरुवात झाली होती व तो थांब-ण्याचीं चिन्हें दिसत नव्हतीं. मेट्रोपोलिटन पोलिसांपाशीं शॉटगन्स होत्या. तर स्कॉटिश आरक्षकांपाशीं रायफली होत्या. पण त्या दोघांच्याहि गोळी-बारास बंदूकधारी गुंड दाद देत नव्हते. शांतताप्रिय लंडनवासियांना ती घटना अभूतपूर्व होती गृहमंत्री चर्चिल हें एका वखारीच्या दारांतील आडोशास राहून पोलीस आणि सैनिक ह्यांच्या गोळीबाराचें निरीक्षण करीत होते. पण त्यांची उपस्थिति तेथें खरोखरच आवश्यक होती का ? बदमाशांचें पारिपत्य

त्यांच्या नेतृत्वाखालीं कीं वरीष्ठ अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखालीं चाललें होतें ? तो प्रश्न मोठा गुंतागुंतीचा होता व त्यामुळें गृहमंत्री आणि कारवाईचे अधिकारी हें दोघेहि पेचांत सांपडलें होते. तरीहि गोळीबार चालूच होता, आणि चर्चिल हेहि सिडने स्ट्रीटवरच होते. अशा स्थितींत कांहीं वेळ गेल्यावर ज्या इमारतींत गुंडांनीं आश्रय घेतला होता, तिच्यामधून धूर येऊं लागला. धूर म्हणजे आग होती, इमारतीस आग लागली होती व ती विझविण्याचें काम अग्निशामक लोकांचें होतें. आणि आगीची वार्ता कळतांच फायर ब्रिगेडचे लोक तेथें तत्काळ येऊन हजर झाले. ते शिडया आणि पाण्याचा बंब घेऊन आले होते. परंतु त्यांनीं जर आग विझविण्याचें काम सुरू केलें असतें, तर त्यांना बदमाशांच्या बंदुकीच्या गोळ्या लागून ते जखमी अथवा ठार होण्याची भीति होती.

पोलीस अधिकाऱ्यांनीं ती परिस्थिति फायर ब्रिगेडच्या लोकांना समजावून सांगितली. पण ते कांहीं केल्या ती ऐकून घेण्यास तयार होईनात. कारण, कर्तव्य म्हणजे कर्तव्य होतें ! शिवाय फायर ब्रिगेड हें वेगळें खातें असल्यानें त्यांनीं पोलिसांच्या सूचनेप्रमाणें आग विझवण्याचें काम पार पाडलें नसतें तर त्यांनीं पोलिसांचे हुकूम अमलांत आणले नाहींत असें सिद्ध होणार होतें. हा पेंचप्रसंग मोठा गंभीर स्वरूपाचा होता. आणि गृहमंत्री जर तेथें हजर नसते तर तो सुटण्याची फारच थोडी शक्यता होती. गृहमंत्री ह्या नात्यानें चर्चिल ह्यांनीं फायर ब्रिगेडच्या लोकाना आग विझविण्याचें काम सुरू न करण्याचा हुकूम केला. बंदूकधारी गुंड ज्या अर्थीं इमारतीबाहेर येत नव्हते, त्या अर्थीं ती इमारत जळून खाक व्हावी ही त्यांची इच्छा होती.

फायर ब्रिगेडनें आग विझविण्याचें काम बंद ठेवल्यानें इमारत जळून गेली व तिच्याबरोबर तींत आश्रय घेतलेले बदमाशहि जळून मेले. ते फक्त दोघे होते. त्यांतील एकजण पोलिसांच्या गोळीबारांत जखमी होऊन मरण पावला होता, तर दुसरा गुदमरून मरण पावला होता.

सिडने स्ट्रीटवरील प्रकाराचा वर्तमानपत्रांत बराच गवगवा झाला. पार्लमेंटमध्येंहि त्याचे पडसाद उमटले. विरोधी पक्षाचे नेते बाल्फर

ह्यांनीं चर्चिलच्या ह्या धाडसावर उपरोधिक टीकाहि केली. पण चर्चिल हे त्या टीकेस भीक घालणारे गृहस्थ नव्हते. मात्र पुष्कळ जणांची खात्री झाली कीं, चर्चिल जर सिडने स्ट्रीटवर उपस्थित नसते तर फायर ब्रिगेडचीं कांहीं माणसें कामास आलीं असतीं.

******

प्रकरण अकरावें

## पहिलें महायुद्ध

दि. २८ जून १९१४ रोजीं ऑस्ट्रियाचा युवराज फ्रांझ फर्डिनांड ह्याचा सर्व्हियांत सेरावेजो ह्या नांवाच्या शहरीं खून झाला. एक महिन्यानंतर दि. २९ जुलैला ऑस्ट्रो-हंगेरियन फौजा सर्व्हियावर चालून गेल्यानें पहिल्या महायुद्धाचा भडका उडाला. इंग्लंडला आपल्या इच्छेविरुद्ध त्या युद्धांत भाग घ्यावा लागला. विन्स्टन चर्चिल हे त्या वेळीं आरमारमंत्री होते. ते गृहमंत्री होते हें मागें आलेंच आहे. पण महायुद्धाचे ढग युरोपच्या क्षितिजावर झपाट्यानें गोळा होत असल्याचें पाहून पंतप्रधान ॲस्किथ ह्यांनीं चर्चिलकडे आरमारखातें सोपविलें होतें. चर्चिल त्या वेळीं अवघे ३७ वर्षांचे होते. ते जसे वयानें लहान होते, तसाच त्यांचा अनुभवहि कमी होता, म्हणून गृहखात्यासारखें महत्त्वाचें खातें त्यांच्या हातीं ठेवणें इष्ट नाहीं असा विचार करून पंतप्रधान ॲस्किथ ह्यांनीं तो बदल केला होता.

पहिलें महायुद्ध सुरू होतांच चर्चिलनीं तावडतोब ब्रिटिश आरमारास सज्ज राहण्याचा हुकूम केला. त्यांनीं आरमारांतील अधिकारीवर्गांत कांहीं बदलहि घडवून आणले.

ब्रिटिश आरमाराचें मुख्य काम म्हणजे ब्रिटिश सैन्याच्या फ्रान्समधील वाहतुकीला संरक्षण देण्याचें होतें. तें काम सुरळीत पार पडलें. सैन्यवाहतुकीस व्यत्यय आणण्याचा एकहि प्रकार जर्मन आरमाराकडून झाला नाहीं, एकहि सैनिक समुद्रांत बुडून मेला नाहीं.

ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यांत हेलिगोलांड व्हाइटची आरमारी लढाई होऊन तींत तीन जर्मन क्रूझरें बुडालीं आणि तिहींची भयंकर नासधूस झाली. ब्रिटिश आरमाराची यत्किंचितहि हानि झाली नाहीं. ब्रिटिश आरमारानें जर्मन आरमारावर मिळविलेला तो विजय दूरगामी स्वरूपाचा होता. त्या पराभवामुळें जर्मनीची घमेंड चांगलीच जिरली आणि दोस्तांच्या नैतिक सामर्थ्यांत भर पडली. चर्चिल आपल्या खात्यांत हिरीरीनें लक्ष घालीत असत. पण फुरसतीच्या वेळांत ते इतर खात्यांकडेहि लक्ष देत.

पहिल्या महायुद्धाच्या सुरुवातीपर्यंत ब्रिटिश हवाई खातें असें अस्तित्वात नव्हतें. विमानांची नुसती चांचणीच तेवढी चालू होती. पण महायुद्ध सुरू होतांच ब्रिटिश सरकारला स्वतंत्र हवाई दल निर्माण करणें आवश्यक झालें. त्या कामीं चर्चिल ह्यांचा मोठा हातभार लागला. इतकेंच नव्हे तर त्यांनीं विमानांतून जर्मनीवर उड्डाणेंदेखील केलीं. ब्रिटिश हवाई दलाच्या एका विभागाला ‘ नाविक हवाई दल ’ हें नांव देण्यांत आलें होतें. त्या दलांतील विमानांनीं जर्मनीच्या कांहीं विमानतळांवर यशस्वी बाँबहल्ले चढवून ते उध्वस्त केले. नाविक हवाई दल निर्माण करून देखील चर्चिल ह्यांचा उत्साह कमी झाला नाहीं त्यांनीं एक चिलखती गाडी बनविण्याच्या उद्योगांत नव्यानें लक्ष घातलें. त्याच प्रयत्नांतून अखेर रणगाड्यांचा जन्म झाला. हा शोध खरोखर चर्चिल ह्यांचा आहे असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. जर्मन सैनिकांच्या खंदकांच्या लढाईला शह देण्यासाठीं म्हणून चर्चिल ह्यांनीं ती चिलखती गाडी बनविण्याचा हुकूम शस्त्रविशारदांना केला होता, असा उल्लेख नाविक खात्याच्या कागदपत्रांत सांपडतो. चर्चिल ह्यांच्या आज्ञेवरून शस्त्रविशारदांनीं जो पहिला रणगाडा बनविला त्याचा नकाशा ॲड्मिरल बेकन ह्या नांवाच्या नाविक अधिकाऱ्यानें काढला होता.

चर्चिल ह्यांचे उपद्व्याप तेवढ्यानेंच थांबले नाहींत. त्यांच्या सुपीक डोक्यांत नाना प्रकारच्या कल्पना स्फुरत असत. १९१४ सालीं फ्रान्समध्यें जर्मन फौजांनीं जोर केला, तेव्हां फ्रान्सचे सरसेनापति जनरल ज्यॉफ ह्यांनीं ब्रिटिश युद्धखात्याला अशी विनंती केली कीं, जर्मनांना भिवविण्यासाठीं डंकर्क येथें कांहीं ब्रिटिश सैन्य उतरविण्यांत यावें. ब्रिटिश युद्धमंत्री लॉर्ड किचनेर ह्यांना ती सूचना पसंत पडली व त्यांनीं डंकर्कमध्यें सैन्य उतरविण्याचें काम चर्चिल ह्यांच्यावर सोपविलें.

चर्चिलनाहि ती कल्पना आवडली. पण त्यांनीं त्या कल्पनेला आपल्या एका वेगळ्या कल्पनेची जोड दिली. त्यांनीं ब्रिटिश नावाड्यांची आणि स्थानिक शेतकऱ्यांची एक सर्कस बनवून जर्मनांना सतावण्याची योजना आंखली. ह्या लोकांनीं मोटार बसेसच्या काफिल्यांवरून बेल्जियम खेड्यांतून आरडाओरड आणि जल्लोश करीत हिंडायचें होतें. ही योजना जेव्हां अमलांत आली, तेव्हां जर्मन सैन्य चांगलेंच गोंधळांत पडलें. त्यांना हें गौडबंगाल काय आहे तें कळेना. त्यांनीं सर्कसवाल्यांचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना त्यांत यश आलें नाहीं. जर्मन सैनिकांमध्यें गोंधळ माजवून लढाईकडे त्यांचें दुर्लक्ष करणें हा त्या सर्कशीचा उद्देश होता. तो उद्देश चांगलाच यशस्वी झाला. पण पंतप्रधान ॲस्किथ ह्यांना जरी सुरुवातीला त्या विनोदी गोष्टीचें कौतुक वाटलें असलें, तरी त्यांच्या गंभीर प्रकृतीला तो पोरकटपणा मानवण्यासारखा नव्हता. आणि चर्चिल हे गैरहजर असतां, त्यांचें खातें सांभाळण्याचें काम त्यांच्याकडे आलें तेव्हां त्यांनीं ती 'सर्कस' बंद करून टाकली. तरीहि दोस्तांची सेवा त्या सर्कसनें चांगलीच बजावली. जर्मन सेनाधिकाऱ्यांच्या कानांवर अशी बातमी आली कीं, सुमारें ४० हजार ब्रिटिश सैन्य बेल्जियममध्यें उतरलें असून त्या सैन्याकडून जर्मन फळीला धोका निर्माण झाला आहे. त्या बातमीप्रमाणें त्यांनीं आपल्या सैन्याला ताबडतोब माघारीचा हुकूम दिला. त्या माघारीमुळें फ्रान्समधील दोस्त फौजांचा बचाव झाला.

चर्चिल ह्यांचा भूसैन्यांतील आणखी एक गंभीर स्वरूपाचा हस्तक्षेप १९१४ सालच्या ऑक्टोबर महिन्यांत झाला. त्या महिन्यांत फ्रेंच फौजांनीं

यानंची निर्णायक लढाई जरी जिंकली असली, तरी त्यांची माघार थांबली नव्हती. जर्मन फौजा बेल्जियममध्यें सारख्या घुसत होत्या. लिएडा आणि नामूर हीं दोन महत्त्वाचीं शहरें जर्मन फौजांच्या हातांत पडलीं होतीं. फक्त अँटवर्प शहर तेवढें बेल्जियम फौजा लढवीत होत्या. पण जर्मन सेनाधिकाऱ्यांनीं अँटवर्प शहर घेण्याचा पणच केला होता. तें शहर पडलें असल्यास दोस्तांच्या डाव्या फळीस आणि कालव्यांतील फ्रेंच बंदरांना धोका निर्माण होणार होता. बेल्जियम फौजा जर्मनांचे अविरत हल्ले फार दिवस थोपवून धरूं शकत नव्हत्या, म्हणून त्यांनीं फ्रेंच आणि ब्रिटिश नेत्यांकडे मदतीची मागणी केली होती.

दि. २ ऑक्टोबरच्या रात्रीं चर्चिल एका खास गाडीनें लंडनहून डोव्हरला चालले होते. तिथून ते डंकर्कला निघायचे होते. गाडीनें अर्धें अंतर कापलें होतें, तोंच तिला माघारी परतण्याचा हुकूम झाला. युद्धमंत्री लॉर्ड किचनेर ह्यांनीं चर्चिलना माघारी परतण्याचा संदेश धाडला होता. त्यांच्या मनांत चर्चिलना अँटवर्पला धाडायचें होतें. अँटवर्प शहर बेल्जियम फौजांनीं दोस्त फौजांचें आगमन होईपर्यंत लढवावें म्हणून चर्चिल ह्यांनीं बेल्जियमच्या राजाला प्रवृत्त करण्यासाठीं तिकडे जायचें होतें. चर्चिलनीं ती कामगिरी ताबडतोब स्वीकारली व ते यत्किंचित्‌हि वेळ न गमावतां अँटवर्पला रवाना झाले. ब्रिटिश फौजांचें अँटवर्पमध्यें आगमन होईपर्यंत चर्चिल तेथें राहिले. एकूण आठ हजार ब्रिटिश नौसैनिक अँटवर्प शहरीं येऊन सहाव्या दिवशीं दाखल झाले.

त्या सैन्याची मदत मिळून देखील बेल्जियम फौजा अँटवर्प लढवूं शकल्या नाहींत. तथापि असें जरी असलें तरी चर्चिल ह्यांच्या त्या शहरांतील वास्तव्यामुळें बेल्जियन फौजांच्या नैतिक सामर्थ्यावर अनुकूल परिणाम झाल्यावांचून राहिला नाहीं. त्यांनीं सतत पांच दिवसपर्यंत जर्मन फौजांचे तीव्र हल्ले थोपवून धरले. आणि दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे बेल्जियन फौजांनी यशस्वी माघार घेतली. त्यामुळें बेल्जियन किनाऱ्याचें व कालव्यांतील बंदरांचें रक्षण झालें. अँटवर्पच्या लढाईंत ९०० ब्रिटिश नौसैनिक कैद, ५० ठार आणि १५० जखमी झाले. कांहीं बॅटॅल्लियन्सनीं डच हद्दींत प्रवेश केला. तेथें त्यांना स्थानबद्ध करून ठेवण्यांत आलें. पण चर्चिल ह्यांच्या

अँटवर्पमधील वास्तव्यामुळें त्या शहराचा बचाव तर झाला नाहींच, उलट तें शहर पडलें आणि ब्रिटिश नौसैनिकांची दाणादाण उडाली. म्हणून चर्चिलच्या हुजूरपक्षीय प्रतिस्पर्ध्यांनीं त्यांच्यावर खूप टीका केली. त्यांनीं चर्चिलना 'आरमाराचे होतकरू सेनापति' असें संबोधून त्यांची हेटाळणी केली. दुर्दैवाची गोष्ट ही कीं, पंतप्रधान ॲस्किथ ह्यांनीं आपल्या आरमार-मंत्र्याच्या हालचालींचें समर्थन करण्याचा यत्किंचितहि प्रयत्न केला नाहीं.

आरमारमंत्री ह्या नात्यानें चर्चिलच्या कारकीर्दींत जणूं कांहीं अपयशाची परंपरा सुरू झाली. १९१५ सालीं इंग्लंडला तुर्कस्थानमध्यें गॅलिपोली येथें भयंकर स्वरूपाचा पराभव सहन करावा लागला व त्याचें खापर आरमार-मंत्री चर्चिल ह्यांच्या माथीं फोडण्यांत येऊन त्यांना आपल्या मंत्रीपदाचा राजिनामा द्यावा लागला.

१९१४ सालच्या ऑक्टोबरअखेर तुर्कस्थाननें दोस्तांविरुद्ध जर्मनीच्या बाजूनें युद्ध पुकारल्यानें रशियाचें धाबें दणाणलें व त्यानें दोस्तांना गॅलि-पोलीमध्यें सैन्य उतरविण्याची विनंती केली. ती विनंती लक्षांत घेऊन अँग्लो-फ्रेंचांनीं गॅलिपोलीमध्यें सैन्य उतरवलें, पण त्या मोहिमेला अपयश येऊन अँग्लो-फ्रेंचांना डार्डानेल्समधून माघार घेणें भाग पडलें. त्या अप-यशाबद्दल टोरी विरोधकांनीं सरकारला धारेवर धरलें. चर्चिलच्या बेगुमान-पणाचा त्यांना आधींच राग होता. त्यांनीं त्यांच्या राजिनाम्याची मागणी केली. त्या गंडांतराचा फायदा घेऊन त्यांनीं उदारमतवाद्यांना संयुक्त सरकार बनविण्यास भाग पाडलें. त्यांत चर्चिलचा बळी पडला हें सांगण्याची जरुरी नाहीं !

डार्डानेल्सच्या अनर्थानें चर्चिल ह्यांचें राजकीय जीवन खलास झालें किंवा त्यांच्या शत्रूच्या शब्दांत सांगायचें झाल्यास 'ते पार भुईसपाट' झाले! परंतु पराभव सहन करून अज्ञातवासांत जाण्याइतके चर्चिल कच्च्या दिलाचे गृहस्थ नव्हते. त्यांनीं तो पराभव मुकाट्यानें सहन केला व शत्रूशीं लढण्याकरितां ते आघाडीवर रवाना झाले.

त्या वेळीं सर जॉन फ्रेंच हे फ्रान्समधील ब्रिटिश फौजांचे सरसेनापति होते. त्यांनीं चर्चिलना एका ब्रिगेडचें नेतृत्व देऊं केलें. परंतु त्यांना युद्धाचा प्रत्यक्ष

अनुभव घ्यायचा होता. म्हणून ते नुसते एका बटॅलियनचे कमांडर झाले. त्यांचा हुद्दा मेजरचा होता.खंदकांतील युद्धाचा महिनाभर अनुभव घेतल्यावर ते नंतर ब्रिगड कमांडर झाले. परंतु जनरल सर जॉन फ्रेंच हे इंग्लंडला गेले असतां त्यांनीं, चर्चिलकडे एका ब्रिगेडचें आधिपत्य देण्यांत आल्याचें पंतप्रधान ॲस्किथ ह्यांना सांगितलें. तेव्हां ॲस्किथ पार गडबडून गेले व जनरल फ्रेंच ह्यांना म्हणाले, "कृपाकरून त्यांच्याकडे ब्रिगेडचें आधिपत्य देऊं नका. त्यांच्याकडे एक बटॅलियन दिली तरी बस् आहे."

पंतप्रधान ॲस्किथ् ह्यांना चर्चिलचा चळवळेपणा माहीत होता. त्यांच्यापाशीं एका ब्रिगेडचें आधिपत्य सोंपविलें तर ते आपल्या सैन्याला बर्लिनवर चाल करून जाण्याचाहि हुकूम करतील, अशी भीति वाटून त्यांनीं सर फ्रेंच ह्यांना त्यांचा हुद्दा कमी करण्यास सांगितलें असें ॲस्किथ ह्यांच्याशीं निकटवर्ती संबंध असलेल्या एका गृहस्थानें लिहून ठेवलें आहे.

जनरल फ्रेंच ह्यांनीं आपल्या अधिकारांत कदाचित् चर्चिलना एका ब्रिगेडचा कमांडर केलें असतें. परंतु त्याच वेळीं त्यांना माघारीं बोलाविण्यांत येऊन त्यांचे जागीं सर डग्लस हेग ह्यांची फरान्समधील ब्रिटिश फौजांचे सरसेनापति म्हणून नेमणूक झाली. सर जॉन फ्रेंच आणि चर्चिल ह्या दोघांचे संबंध जितके जिव्हाळ्याचे होते, तितके सर हेग आणि चर्चिल ह्यांचे नव्हते. त्यामुळें सर हेग ह्यांनीं पंतप्रधान ॲस्किथ ह्यांच्या सूचनेप्रमाणें चर्चिलकडे एका बटॅलियनचें आधिपत्य सोपविलें. तो अपमान चर्चिल ह्यांना फार झोंबला, पण तरीहि त्यांनीं तो गिळून टाकला. ते सहाव्या रॉयल स्कॉच फ्युझिलियर्सचे कमांडर झाले, तेव्हां सर हेग व ॲस्किथ ह्यांनीं केलेला अपमान ते पार विसरून गेले व नवीन जीवनांत पूर्ण समरस झाले. एके काळीं आपण इंग्लंडचे गृहमंत्री आणि आरमारमंत्री होतों, हें विसरून जाऊन त्यांनीं आपल्या बरोबरीच्या अधिकाऱ्यांमध्यें आणि सर्वसामान्य सैनिकांमध्यें मिळून मिसळून वागण्यास सुरुवात केली. त्याचा परिणाम इष्ट तो होऊन सैनिकांमध्यें ते फार प्रिय झाले. परंतु त्यांचा चळवळेपणा हा त्यांचा स्वभावधर्मच होता. आघाडीवर देखील ते स्वस्थ बसूं शकले नाहींत. ते अधूनमधून शत्रूमध्यें घबराट निर्माण करण्याकरितां आपल्या सैनिकाना रात्रींच्या वेळीं किंवा दिवसां देखील अचानकपणें गोळीबार

करण्याचा हुकूम करीत. सबंध आघाडी शांत असतां अचानकपणें दोस्त फळींत गोळीबार सुरू झालेला पाहून जर्मन सैनिक बावचळून जात. चर्चिल ह्यांचा हा वात्रटपणा त्यांच्या सैनिकांपुरताच निव्वळ मर्यादित नसायचा. त्यांच्या सैनिकांनीं गोळीबार सुरू केला कीं, ते तोफखान्यावरील लोकांना टेलिफोन करून त्यांना गोलंदाजी करण्यास ते प्रवृत्त करीत. एकदां तर चर्चिल ह्यांच्या ह्या फाजील उत्साहामुळें सबंध आघाडीच पेटण्याचा धोका उद्भवला होता.

चर्चिल ह्यांच्या बटॅलियनला लागून असलेल्या आघाडीवरील इतर तुकड्यांना चर्चिल आणि त्यांचे सैनिक ह्यांचा आगाऊपणा सहन होत नसे. त्यांना युद्ध नको होतें. तथापि असें जरी असलें, तरी चर्चिल आपल्या सैनिकांच्या जीवनाची फार काळजी घेत. पण आपल्या जीविताविषयीं मात्र ते बेफिकीर असत. एके दिवशीं ते रणगाड्याच्या उपयोगासंबंधानें एक गुप्त कैफियत तयार करीत आपल्या कचेरींत खिडकीसमोरच बसले होते. त्यांच्या कचेरीची इमारत शत्रूपासून अवघ्या हजार यार्डांच्या अंतरावर होती. अकस्मात् शत्रूची गोलंदाजी सुरू झाली. तोफांचे गोळे अगदीं जवळ येऊन फुटत होते. पण चर्चिल कांहीं केल्या आपल्या खुर्चीवरून उठेनात. शेवटीं एक गोळा त्यांच्या खिडकीसमोरच येऊन फुटला तेव्हां ते कचेरींतून बाहेर पडले. सुमारें एक तासानें शत्रूची गोलंदाजी थांबली. चर्चिल आपल्या हेडक्वॉर्टर्सवर परत येतात तर त्यांचीं खोली तोफेच्या गोळ्यानें उध्वस्त झालेली ! खरोखर कोणती तरी दैवी शक्ति त्यांचें रक्षण करीत होती, ह्यांत शंका नाही.

१९१६ सालच्या मे महिन्यांत चर्चिलची बटॅलियन बरखास्त करून तिच्यामधील सैनिकांना इतर रेजिमेंटमध्यें घेण्यांत आलें. त्याच वेळीं इंग्लंडमध्यें एक राजकीय पेचप्रसंग निर्माण झाला. चर्चिल हे सक्तीच्या लश्करभरतीचे पुरस्कर्ते होते. पण ते मंत्रिमंडळांत असतांना तो प्रश्न अधांतरींच राहिला होता. आतां युद्धाची प्रखरता वाढल्यानें सक्तीची लश्करभरती करणें आवश्यक झालें होतें. परंतु त्यासाठीं पार्लमेंटमध्यें चर्चिल ह्यांच्या उपस्थितीची आवश्यकता होती.

बॅटेलियनच्या बरखास्तीचा हुकूम आल्यावर त्याचें शेवटचें लश्करी संचलन वेथ्यून ह्या शहरानजीक झालें. त्याच वेळीं एकमेकांचा निरोप घेण्याचाहि मेळावा भरला. पेयांची आणि मेवामिठाईची सरबराई झाली चर्चिल फार थकून गेले होते. आपल्या बटॅलियनमधील अधिकाऱ्यांना चांगली वागणूक मिळावी म्हणून मोठमोठ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटण्यासाठीं त्यांना पायपीट करावी लागली होती. ते निघून जात असलेले पाहून त्यांच्या बटॅलियनमधील सगळ्याच सैनिकांना वाईट वाटत होतें. त्यांचा अॅडज्यूटंट निरोप देण्याच्या समारंभांत म्हणाला, " मी माझ्या उभ्या आयुष्यांत कधीं भाषण केलें नाहीं, पण शेवटच्या घटकेस मी भाषण करण्याचें ठरविलें आहे. " नंतर बटॅलियनमधील सर्व सैनिकांच्या वतीनें तो म्हणाला कीं, " चर्चिल ह्यांच्यासारखा ' कमांडिग ऑफिसर ' कधींच भेटणार नाहीं." चर्चिल ह्यांचें निरोपाचें भाषणहि अत्यंत प्रभावी आणि हृदयस्पर्शी झालें.

शेवटीं ते मेळाव्याच्या आवारांतून बाहेर पडून त्यांना नेण्याकरितां आलेल्या मोटारीमध्यें चढले.तेव्हां अधिकाऱ्यांनीं आणि सैनिकांनीं टाळ्यांच्या कडकडाटांत त्यांना निरोप दिला.

******

प्रकरण बारावें

# पुनः पार्लमेंटमध्यें

चर्चिल युद्ध आघाडीवरून माघारी परतले आणि त्यांनीं संसदीय कामकाजांत भाग घेण्यास सुरुवात केली, तेव्हां त्यांच्या हातांत कोणतीच सत्ता नव्हती. ते पार्लमेंटचे एक नुसते सभासद होते. तथापि त्यांनीं एक भाषण करून स्वतंत्र हवाई खात्याच्या आवश्यकतेचें प्रतिपादन केलें. त्यांच्या भाषणाला कुणी विरोध केला नाहीं. आणि अशा रीतीनें सांप्रतच्या ब्रिटिश शाही हवाई खात्याची स्थापना झाली.

त्या दरम्यान डार्डानेल्सच्या मोहिमेची चौकशी करण्यासाठीं एक समिती स्थापन करण्यांत आली. चर्चिलनीं अहोरात्र खपून त्या मोहिमेच्या अपयशाची कारणमीमांसा करून एक कैफियत तयार केली. लॉर्ड क्रोमर हे त्या कमिशनचे अध्यक्ष होते. समितीमध्यें दहा सभासदांचा अंतर्भाव झाला होता. परंतु चौकशीचें काम संपण्यापूर्वीच लॉर्ड क्रोमर ह्यांचें निधन झालें. चौकशी समितीच्या दोन सदस्यांची मंत्रिमंडळांत वर्णी लागली. युद्धमंत्री लॉर्ड किचनेर जलमार्गें रशियास जातांना वाटेंत बेपत्ता झाले व पंतप्रधान ॲस्किथ ह्यांना राजिनामा देणें भाग पडल्यानें त्यांचे जागीं लॉइड जॉर्ज हे पंतप्रधान झाले. ॲस्किथ ह्यांच्याकडून चर्चिलना अन्याय झाला होता. त्या अन्यायाचें त्यांच्याकडून परिमार्जन न झाल्यानें चर्चिल व इतर कांहीं एम्. पी. ह्यांनीं ॲस्किथ ह्यांच्या राज्यकारभारावर हल्ले चढविण्यास सुरुवात केली होती. त्याचा इष्ट तोच परिणाम होऊन लॉईड जॉर्ज ह्यांनीं ॲस्किथ ह्यांना मंत्रिमंडळाचा राजिनामा देण्यास भाग पाडलें.

१९१६ सालीं लॉइड जॉर्ज हे पंतप्रधान झाले. टोरी पक्षाचा चर्चिल-विरुद्ध दांत होता, हें मागें आलेंच आहे. परंतु ॲस्किथ ह्यांनीं त्यांना मंत्रिमंडळांतून काढून टाकल्यानें आणि ते आघाडीवर लढण्याकरितां गेल्यानें,

टोरी सभासदांचा त्यांच्यासंबंधींचा विरोध आतां मावळला होता. लॉइड जॉर्ज ह्यांनीं चर्चिलना आपल्या मंत्रिमंडळांत घेतलें व त्यांच्याकडे दारूगोळा खातें सुपूर्त केलें.

चर्चिल हे लॉइड जॉर्ज ह्यांचे निकटवर्ति स्नेही असल्यानें त्यांना मंत्रिमंडळांत घेतांना त्यांनीं जरी थोडा पक्षपात दाखविला असला तरी चर्चिल ह्यांची कार्यक्षमता आणि कामसूपणा सगळयांनाच ठाऊक होता. दुसरी गोष्ट अशी कीं, डार्डानेलसच्या अपयशाची चौकशी करण्याकरितां जी समिती नेमण्यांत आली होती, तिनें चर्चिलना निर्दोषी ठरविलें होतें. तो सबंध अहवाल प्रसिद्ध झाला नाहीं. परंतु त्याचा जो सारांश प्रसिद्ध झाला त्यावरून कळून आलें कीं, चर्चिलची डार्डानेलस आणि गॅलिपोलीवरील स्वारीची योजना चांगली होती. पण युद्धमंत्री लॉर्ड किचनेर ह्यांच्या धर-सोडीमुळें ती यशस्वी झाली नाहीं. त्या अहवालांत मावळते पंतप्रधान ॲस्किथ ह्यांच्यावरहि सडकून टीका करण्यांत आली; कारण, त्यांनीं युद्ध-मंत्री लॉर्ड किचनेर ह्यांच्यावर आवश्यक तें दडपण आणलें नाहीं.

चर्चिलनीं दारूगोळा खात्याचें मंत्रिपद स्वीकारल्यावर मोठ्या जोमानें काम करण्यास सुरुवात केली. उत्साहाची कमतरता त्यांच्या अंगांत कधींच नव्हती. त्यांनीं अनेक योजना आंखून त्या कृतींत आणल्या. अमेरिकेनें युद्ध-प्रवेश केल्यानें तर त्यांना काम करण्यास भलताच हुरूप आला. आतां लढाई दोस्तांनीं जवळजवळ जिंकल्यासारखीच होती. सैन्यें पोटावर चालतात त्या म्हणीप्रमाणें युद्धें पैशावर चालतात असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. अमेरिका हा एक अमाप द्रव्य असलेला देश असल्यानें त्याच्याकडून दोस्तांना वाटेल तितका पैसा मिळणार होता. त्या पैशाच्या बळावर ते दीर्घ-काल युद्ध चालवून जर्मनीला जेरीस आणूं शकणार होते. आणि झालेंहि पण तसेंच. अमेरिकेच्या युद्धप्रवेशामुळें युद्धाचें पारडें फिरलें. भुकेकंगाल जर्मन सैन्यानें आपल्या नेत्यांविरुद्ध बंडाळी सुरू करून त्यांना शस्त्रें खालीं ठेवण्यास भाग पाडलें. पहिल्या महायुद्धाच्या अनर्थाचा सूत्रधार कैसर विलियम हा आपल्या कुटुंबांतील माणसांसह तटस्थ हॉलंड देशांत पळून गेला.त्याच्यामागें जर्मन सेनाधिकारी दातीं तृण धरून दोस्तांना शरण आले.

तहाच्या रात्रीं चर्चिल आपल्या पत्नीसह मोटारींत बसून पंतप्रधानांच्या निवासस्थानीं निघाले. रस्त्यावर लोकांच्या झुंडीच्या झुंडी लोटल्या होत्या. लोकांच्या आनंदाला उधाण आलें होतें. त्यांनीं चर्चिलची मोटार पाहतांच त्यांचा जयजयकार करण्यास सुरुवात केली. रस्त्यावरील गर्दीमुळें शोफरला गाडी सावकाश नेणें भाग पडलें. युद्ध जिंकण्यास ज्या नेत्यांनीं जिवापाड प्रयत्न केले त्यांत चर्चिल हे एक असल्याचें लोकांना आतां कळून चुकलें होतें. डार्डनेल्स आणि गॅलिपोलीचें गंडांतर लोक विसरून गेले होते. चर्चिलच्या कर्तबगारीनें त्यांच्या जीवनपटावरील तो काळा डाग पुसून टाकला होता.

पहिलें महायुद्ध समाप्त झाल्यावर ब्रिटिश वसाहतीमध्यें असंतोष माजला. कारण त्या वसाहतींना स्वातंत्र्य मिळालें नव्हतें. तहपरिषदेने त्यांच्या तोंडाला पानें पुसलीं होतीं. त्याची परिणति साहजिकच वसाहतींतील लोकांमध्यें असंतोष माजण्यांत झाली. ब्रिटिश सरकारला त्या असंतोषास तोंड द्यावें लागल्यानें महायुद्धामुळें आधींच रिकाम्या झालेल्या खजिन्यावर ताण पडूं लागला. १९२० सालीं एकाच वर्षांत ब्रिटिश सरकारला जवळ जवळ २० कोट पौंड वसाहतीमध्यें शांतता प्रस्थापित करण्यासाठीं खर्च करावे लागले. त्यामुळें परिस्थिति फार गंभीर झाली. वसाहतखातें सांभाळण्यासाठीं कुणातरी पोलादी हातांच्या मनुष्याची आवश्यकता होती. पण इंग्लंडमध्यें चर्चिलच्याशिवाय एकहि मनुष्य सरकारला तें खातें सांभाळण्यास लाभला नाहीं. शेवटीं सगळ्यांचाच आग्रह झाल्यानें चर्चिल तें खातें सांभाळण्यास तयार झाले. आणि त्यांनीं त्या खात्याचा कारभार यशस्वी रीतीनें हांकला.

आयर्लंड हा इंग्लंडच्या डोकेंदुखीचा नेहमींचाच प्रश्न होता. चर्चिल वसाहतमंत्री असतांना आयर्लंडला वसाहतीचें स्वराज्य मिळालें. एके दिवशीं आयर्लंडचा प्रख्यात सिनफेन प्रसिद्ध पुढारी मायकेल कॉलिन्स हा चर्चिलच्या घरीं भेटायला आला. ब्रिटिश सरकारनें कॉलिन्सना पकडून देणाराला किंवा त्यांना ठार करणारास ५० हजार पौंडांचें बक्षीस लावलें होतें. त्याचा कॉलिन्सना राग आला होता. त्या विषयावर त्यानें चर्चिलशीं हुज्जत घालण्यास त्यांनीं सुरुवात केली. चर्चिलनीं त्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला पण ते कांहीं केल्या ऐकेनात. तें पाहून चर्चिल आपल्या अभ्यासिकेंत गेले व

वर्तमानपत्राचें एक कात्रण आणून कॉलिन्सच्या हातीं दिलें. बोअर युद्धांत चर्चिल प्रिटोरियाहून फरारी झाले तेव्हां त्यांच्या शिरासाठीं बोअर सरकारनें जें २५ पौंडांचें बक्षीस लावलें होतें त्याचें तें कात्रण होतें. तें कात्रण बघतांच कॉलिन्स शांत झाले. चर्चिल त्यांना म्हणाले, "ब्रिटिश सरकारनें तुमच्या शिरासाठीं ५० हजार पौंडांचें बक्षीस लावल्याबद्दल तुम्ही क्रोधाविष्ट झालांत. आतां सांगा मला किती राग यायला पाहिजे होता तो !"

'आयर फ्री स्टेट' अस्तित्वांत आल्यावर मायकेल कॉलिन्सनीं पुढील उद्‌गार काढले : "चर्चिल ह्यांच्या मदतीशिवाय आम्हांला कांहींच करतां आलें नसतें." दोन दिवसांनंतर कॉलिन्स डब्लिन शहरीं दहशत-वाद्यांच्या गोळ्यांस बळी पडले.

चर्चिल ह्यांचें जीवन हें चढ-उतारांनीं भरलेलें आहे. ते जितके वर चढत तितकेच ते खालीं आपटले जात. १९२१ सालीं कुणाच्या ध्यानीमनीं नसतांना मंत्रिमंडळांतून एकदम त्यांना अर्धचंद्र देण्यांत आला. टोरींच्या विरोधामुळें लॉईड जॉर्ज ह्यांना आपल्या मंत्रिमंडळाची पुनर्घटना करणें भाग पडलें. त्या वेळीं लोकांची अशी समजूत होती कीं, चर्चिल ह्यांना फडणीसखातें मिळाल्याशिवाय राहणार नाहीं. कारण, त्यांच्याशिवाय लोकांना फडणीसखातें सांभाळण्यास दुसरा लायक मनुष्य दिसत नव्हता. परंतु चर्चिलच्या टोरी हितशत्रूंनीं पंतप्रधान लॉईड जॉर्ज ह्यांना धमकी दिली कीं, चर्चिलना मंत्रिमंडळांत घेतल्यास आम्ही संयुक्त मंत्रिमंडळ बरखास्त करूं. त्या धमकीमुळें पंतप्रधान लॉईड जॉर्ज ह्यांना चर्चिलना रजा देणें भाग पडलें. परंतु चर्चिलना रजा दिल्यानें देखील लॉईड जॉर्ज ह्यांचें मंत्रि-मंडळ टिकलें नाहीं. टोरींनीं त्यांना अखेर दगा दिलाच. त्यांनीं पेंचप्रसंग निर्माण करून लॉईड जॉर्जना मंत्रिमंडळ बरखास्त करण्यास भाग पाडलें व त्यांचे जागीं बोनार लॉ ह्यांना मंत्रिमंडळ बनविण्यास लावलें. तदनंतर ज्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या त्यांतहि चर्चिलचा पराभव झाला.

१९०० सालापासून पहिल्या प्रथमच पार्लमेंटमध्यें चर्चिलचा आवाज लोकांना ऐकूं आला नाहीं. पुष्कळांना त्यांच्या गैरहजेरीमुळें चुकल्याचुकल्या-सारखें वाटलें. त्यांचे प्रतिस्पर्धी स्क्रायमगेऊर हे व्हिस्कीबंदीचे पुरस्कर्ते

होते. ते चर्चिलना १९०६ सालापासून विरोध करीत होते. शेवटीं पंधरा वर्षांच्या चिकाटीनंतर त्यांना चर्चिलचा पराभव करण्यांत यश आलें होतें. तें पाहून चर्चिलच्या एका चाहत्यानें पुढील उद्गार काढले. "एका व्हिस्की ड्रॅष्टचाला मोठ्या पदास चढविण्यासाठीं देण्यांत आलेली ही किंमत खरोखरीच मोठी म्हटली पाहिजे." ही घटना १९२२ सालीं घडली. चर्चिल त्या वेळीं सत्तेचाळीस वर्षांचें होते. त्यांच्या आतांपर्यंतच्या आयुष्यांत त्यांनीं जसे मोठे विजय मिळविले होते, तसेच मोठे पराभवहि खाल्ले होते. ते आतां मध्यम वयांत प्रविष्ट झाले होते, परंतु त्यांना सार्वजनिक जीवनांतून निवृत्त होण्यास अद्याप पुष्कळ अवकाश होता. पार्लमेंट हेंच त्यांच्या कर्तबगारीचें खरें क्षेत्र होतें, त्या क्षेत्रांतून अकस्मात् गचांडी मिळाल्यामुळें ते खिन्न झाले, हताश झाले. त्यासंबंधीं आपल्या एका मित्रापाशीं बोलतांना ते म्हणाले, "शेकोटी-समोर आरामखुर्चीवर बसून मी सध्यां झोपा काढीत आहें. हें जीवन आरोग्यदायक नाहीं हें मला माहीत आहे. पण काय करणार? ह्या जगांत मनुष्य अधिकाराशिवाय कांहीं करूं शकत नाहीं." निवडणुकांतील पराभवा-मुळें चर्चिल अवघ्या आठवड्यांत म्हातारे झाल्याचें लोकांना वाटलें. परंतु त्यांच्या बाह्य शरीरावर जरी त्या पराभवाचा प्रतिकूल परिणाम झाला असला तरी त्यांचा लढाऊ बाणा, तारुण्यसुलभ स्वभाव आणि अजोड आत्म-विश्वास ह्यांच्यावर त्याचा काडीचाहि परिणाम झाला नव्हता. लंडन शहरीं करमत नव्हतें म्हणून ते सहा महिने रिव्हिएराला जाऊन राहिले. कान्न येथील जुगारांत त्यांनीं बराच पैसा घालविला. पण पैसा जरी गेला असला, तरी त्यांचे दिवस तिकडे चांगले गेले.

चर्चिलना आतां पैशांची विवंचना करण्याची जरुरी नव्हती. ते वर्तमान-पत्रांत आणि नियतकालिकांत लेख लिहून खोऱ्यानें पैसा ओढीत होते. त्यांच्या लेखांना भारंभार मोबदला मिळत असे. शिवाय त्यांची आई लेडी रँडॉल्फ हिनें १९२१ सालीं मरतेसमयीं चर्चिलना दीड लक्ष पौंड मागें ठेवले होते.

चर्चिलनीं आपल्या सार्वजनिक जीवनास ऐन तारुण्यांत सुरुवात केली तेव्हां ते मध्यम वर्गातील एक गरीब तरुण होते. त्यांचें उत्पन्न बेताचें असल्यानें

आपली राहणीहि त्यांनीं काटकसरीची ठेवली होती. पण आतां मुबलक पैसा हाताशीं असल्यावर त्यांनीं आपल्या राहणींत बदल केला होता. ते ऐषआरामांत राहूं लागले होते. त्यांच्याकडे पै-पाहुण्यांची मोठीच वर्दळ सुरू असलेली दिसून येई. आपल्या आईच्या मृत्यूनंतर चर्चिलनीं एक्लेस्टन स्क्वेअरवरील आपलें मोठें घर मजूर पक्षाला वि न टाकून ते ससेक्स स्क्वेअरवरील एका भाडयाच्या घरांत रहावयास गेले. तदनंतर लवकरच त्यांनीं आपल्या लेखनव्यवसायांत मिळविलेल्या पैशांतून केंट परगण्यांत सांप्रतची 'चार्टवेल मॅनॉर' ही शेतवाडी खरेदी केली. त्या ठिकाणीं येऊन राहिल्यावर त्यांनीं The World Crisis हा पहिल्या महायुद्धाचा चार खंडांचा इतिहास लिहिण्यास प्रारंभ केला.

त्यांना चार मुलें होतीं. तीन मुली आणि एक मुलगा रँडॉल्फ. त्यांची १९१८ सालीं जन्मलेली मुलगी वयाच्या तिसऱ्या वर्षींच मरण पावली होती. चर्चिलची पत्नी ही एक चांगली गृहिणी होती. ती घरगुती कामें सांभाळून चर्चिलचीं घराबाहेरील कामें देखील सांभाळीत असे. चर्चिलच्या खाण्या-पिण्याकडे तिचें विशेष लक्ष असे. त्यांना काय हवें, काय नको, कोणते पदार्थ त्यांना विशेष आवडतात ते तिनें जाणून घेतलें होतें. आजदेखील चर्चिलच्या खाण्या-पिण्याकडे तिचें लक्ष असतें.

मंत्री असतांना चर्चिल ह्यांच्या जिवाला धोका पोचूं नये म्हणून काळजी घेण्यांत येत असे. आयरिश बंडाळीचे वेळीं ते वसाहतमंत्री होते तेव्हां आयरिश दहशतवाद्यांकडून त्यांचा खून होण्याची भीति लोक बोलून दाखवीत असत. म्हणून स्कॉटलंड यार्डनें त्यांच्या संरक्षणाची सर्व प्रकारें काळजी घेतली होती. एका चांगल्या माणसाचा त्यांच्यावर पहारा ठेवण्यांत आला होता. चर्चिलना सफ्राजेटस्‌नीं मारहाण केली होती. संपवाल्यांनीं त्यांना धमक्या दिल्या होत्या, आणि कॉमन्सगृहांत त्यांच्यावर एक ग्रंथ फेंकून मारण्यांत आला होता. स्कॉटलंड यार्डनें त्यांच्या रक्षणार्थ सार्जंट (नंतर सी. आय. डी. इन्स्पेक्टर) डब्ल्यू. एच्. थॉम्सन ह्यांची नेमणूक केली. ते त्यांच्याकडे तब्बल पंधरा वर्षें राहिले. चर्चिलसारख्या चळवळ्या गृहस्थांचा शरीररक्षक होणें हें मोठें बिकट काम होतें. परंतु इन्स्पेक्टर थॉम्सन ह्यांनीं तें काम संयमानें आणि कुशलतेनें पार पाडलें. त्या कामाबद्दल चर्चिल इन्स्पेक्टर

थॉम्सन ह्यांच्यावर निहायत खूष होते. त्यांच्या सरकारी पगाराशिवाय ते त्यांना स्वतःच्या पदरचे आणखी थोडे पैसे देत.

चर्चिलना The World Crisis हा पहिल्या महायुद्धाचा इतिहास लिहिण्यास तब्बल दोन वर्षें लागलीं. त्याच वेळीं सर बोनार लॉ ह्यांचे जागीं स्टन्ले बॉल्ड्विन हे पंतप्रधान झाले. १९२३ सालीं चर्चिलना वेस्ट लिचेस्टर मतदार संघांत निवडणुकीला उभें राहण्याची सूचना केली असतां, त्यांनीं ती मान्य केली. पण त्यांचा पेथिक लॉरेन्स ह्यांनीं पराभव केला. पेथिक लॉरेन्स हे स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळावा म्हणून भांडणारे एक प्रख्यात सफराजेट होते. त्यासाठीं त्यांना तुरुंगवासहि भोगावा लागला होता. त्या निवडणुकींत पराभव झाल्यावर चर्चिलनीं उदारमतवादी पक्षाचा राजिनामा दिला व ' कॉंस्टिटच्यूशनलिस्टस् ' पक्षाचे ते सभासद झाले. त्याच वेळीं त्यांच्या कांहीं मित्रांनीं त्यांना वेस्टमिनिस्टर मतदार संघांत निवडणुकीला उभें राहण्याचा सल्ला दिला. कॅ. ओथो निकोल्सन ह्या नांवाचा हुजूरपक्षीय उमेदवार चर्चिलचा प्रतिस्पर्धी होता. त्याशिवाय आणखी दोन उमेदवार ही निवडणूक लढवीत होते. त्यांतील एकजण फेन्नर ब्रॉक्वे हे मजूर पक्षाचे उमेदवार होते, तर स्कॉट डकर्स हे जहालमतवादी होते. हा चौरंगी सामना मोठा चुरशीचा होऊन त्यांत चर्चिलना पुनः पराभूत व्हावें लागलें. ही निवडणूक १९२४ सालीं झाली. चर्चिलचे प्रतिस्पर्धी कॅ. ओथो निकोल्सन हे बहुमतानें निवडून आले.

लागोपाठ दोन निवडणुकांत पराभव खावा लागल्यानें चर्चिल फार खिन्न आणि उदास झाले. त्यांच्या नशिबीं पुनः शेकोटीसमोर आरामखुर्चींत बसून झोपा काढण्याचें आलें !

******

प्रकरण तेरावें

# पराभवांतून विजयाकडे

चर्चिल ह्यांचा वेस्टमिनिस्टिर मतदार-संघांत जरी पराभव झाला असला,तरी ते खचून गेले नाहींत. प्रत्येक पराभवांतून ते विजयी होण्याच्या अदमनीय आशेनें पुनः निवडणूक लढवीत. १९२४ सालीं त्यांना इप्पिंग मतदार संघांतून पुनः निवडणूक लढविण्याची संधि मिळाली. आणि या वेळीं ते आपल्या तीन प्रतिस्पर्ध्यांचा प्रचंड बहुमतानें पराभव करून निवडून आले. रॅम्से मॅक्डोनॉल्ड ह्यांचें मजूरपक्षीय मंत्रिमंडळ गडगडलें आणि स्टॅन्ले बॉल्डविन ह्यांनीं पुनः हुजुरपक्षीय मंत्रिमंडळ बनविलें. आश्चर्याची गोष्ट ही कीं, ह्या मंत्रिमंडळांत चर्चिल ह्यांना फडणीस म्हणून घेण्यांत आलें. चर्चिल ह्यांच्या पक्षाचें आणि टोरी पक्षाचें सूत निवडणुकांपूर्वीच जमलें होतें. चर्चिलनीं उदारमतवादी पक्षाकडील आपले संबंध तोडल्यामुळें, आणि मजुर पक्षाशीं त्यांचें कधींच पटण्यासारखें नसल्यानें टोरी हा एकच पक्ष त्यांना आतां जवळचा होता. त्या पक्षाशीं मैत्री केल्याचें चांगलें फळ त्यांना ताबडतोब मिळालें. त्यांच्या भावी पंतप्रधानकीचा मार्ग आतां मोकळा झाला होता. कारण, असा अलिखित संकेत पडून गेला होता कीं, जो कुणी अर्थमंत्री होत होता तो पुढें पंतप्रधान होत होता.

१९२४ ते १९२९ ह्या दरम्यानच्या काळांत चर्चिल हे इंग्लंडचे फडणीस होते. त्यांनीं आपली अर्थमंत्रीपदाची कारकीर्द यशस्वीपणें पार पाडली. त्यांनीं सोन्याच्या किंमती स्थिर ठेवण्यासाठीं पुष्कळ उपाययोजना केली. त्या प्रयत्नामुळें बाजारांत पौंडाची पत सुधारली. कारण, महायुद्धा-नंतर इंग्लंडची सोन्याची गंगाजळी संपुष्टांत आल्यामुळें पौंडाची किंमत घसरली होती. अमेरिकेंत तर पौंडाची किंमत अधिकृत किंमतीपेक्षां दोन टक्के कमी होती. पौंड घसरल्यामुळें इंग्लंडच्या व्यापार-उदिमावर अनिष्ट

परिणाम झाला होता. चर्चिल ह्यांनीं सोन्याच्या किंमती कायम ठेवून पौंडाची पत सुधारली व त्याचा इष्ट तो परिणाम लगेच दिसूं लागला.

पण कुठल्याहि लोकशाहीप्रधान देशांत सरकार पक्षानें जरी लोकांचें कल्याण करण्याचा कितीहि प्रयत्न केला तरी त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांना आणि टीकाकारांना त्याच्यावर टीका करायला वाव असतोच असतो. पराचा कावळा करून ते टीकेची झोड उठवून देण्यास कमी करीत नसतात. चर्चिल ह्यांनीं इंग्लंडची घसरत चाललेली आर्थिक स्थिति सांवरून धरण्याचा प्रयत्न केला. पण एक दोन अर्थशास्त्रज्ञांनीं आणि मजूर-पक्षीय एम्. पीं. नीं त्यांच्या धोरणावर टीका केलीच. इतकेंच नव्हे, तर कोळशाच्या खाणीमालकांनीं मजुरांचा पगार कमी केल्याच्या कारणावरून मजूरनेत्यांनीं सरकारला सार्वजनिक संपाची धमकी दिली.

खाणीमालकांचें असें म्हणणें होतें कीं, कोळशाच्या किंमती खालीं गेल्यानें मजुरांचा युद्धकालांतील पगार आम्हांस देणें मुश्किल झालें आहे. आणि त्यांचें म्हणणें गैरवाजवीहि नव्हतें. पण सरकार तटस्थ आणि खंबीर राहिलें.

मजर नेत्यांनीं आपली धमकी खरी केली. सार्वत्रिक संप सुरू झाला. त्याचा पहिला तडाखा वृत्तपत्रांना बसला. कारण छापखान्यांतील कामगार संपावर गेल्यानें वृत्तपत्रांचें प्रकाशन बंद पडलें.

चर्चिलनीं संपाला तोंड देण्याचा पूर्वीच निर्धार केला होता. त्यांनीं 'ब्रिटिश गॅझेट' ह्या नांवाचें दैनिक सुरू केलें. 'मॉर्निंग पोस्ट' दैनिकानें आपला छापखाना आणि कचेरी सरकारच्या दिमतीला दिली. चर्चिल 'ब्रिटिश गॅझेट'चे संपादक झाले. ता. ५ मेला गॅझेट सुरू झालें तेव्हां त्याचा पहिल्या दिवसाचा खप २३००० अंकांचा होता. आठवड्याअखेर तो खप दहा पटींनीं वाढला. एका आठवड्याच्या आंतच सार्वत्रिक संपाचे तीन तेरा वाजले. परंतु कोळसा खाणकामगारांनीं मात्र संप नेटाने पुढें चालू ठेवला त्या संपामुळें कोळशाच्या धंद्याची अतोनात हानि झाली. इंग्लंडच्या इतिहासांतील तो एक अत्यंत विध्वंसक असा संप म्हणून समजला जातो. त्या संपामुळें राष्ट्रीय हानि जशी मोठी झाली. तशीच चर्चिलची वैयक्तिक हानिहि मोठी झाली. ते नुकतेच वर येऊं पहात होते, पण संपकाळांत त्यांनीं जें धोरण स्वीकारलें, त्यामुळें त्यांच्यावर भयंकर टीका होऊन त्यांच्या

लोकप्रियतेवर तिचा अनिष्ट परिणाम झाला. लोक त्यांच्याकडे खलनायक म्हणून पाहूं लागले.

१९२९ सालीं बॉल्डविन ह्यांचें टोरी मंत्रिमंडळ गडगडलें आणि चर्चिलना मंत्रिपदावरून खालीं उतरावें लागलें. सतत दहा वर्षेंपर्यंत त्यांच्या-कडे कोणतेंच अधिकारपद आलें नाहीं. तो काल त्यांनीं आपल्या शेतवाडीवर लेखन-वाचन करण्यांत घालविला. त्यांनीं अमेरिकेंतहि एक व्याख्यानाचा दौरा काढला. त्यांचा बोअर युद्धाच्या वेळचा दौरा चांगलाच किफायतशीर झाला होता. ह्या वेळींहि तो किफायतशीर झाल्यावांचून राहणार नाहीं अशी त्यांना आशा वाटत होती, परंतु एका अपघातात सांपडल्यामुळें त्यांना तो दौरा रद्द करावा लागला. न्यूयॉर्क शहरीं एका दुपारीं ते बरूच ह्या नांवाच्या आपल्या एका मित्राकडे गेले होते. मित्राच्या घराचा नंबर शोधीत ते रस्त्या-वरून चालले असतां, एका टॅक्सीचा त्यांना धक्का बसला. त्यांना लगेच रुग्णालयांत नेण्यांत आलें. तेथें त्यांनीं बिछान्यावर पडल्या पडल्या 'माझा अमेरिकेंतील अपघात' ह्या नांवाचा लेख लिहून तो एका अमेरिकन नियतकालिकाला अडीच हजार डॉलर्संना विकला. हॉस्पिटलमधून बाहेर पडल्यावर ते विश्रांतिसाठीं बहाम्स बेटांत गेले.

कांहीं आठवड्यांनीं इंग्लंडला माघारीं परतल्यावर त्यांनीं एका प्रचंड लेखनकार्यास हात घातला. 'The World Crisis' हा त्यांचा पहिल्या महायुद्धाचा इतिहास कल्पनातीत यशस्वी झाला होता त्या ग्रंथानें त्यांना पैसा आणि कीर्ति हीं दोन्हीहि मिळवून दिलीं. हा ग्रंथ प्रकाशित होण्यापूर्वीं त्यांच्या लेखनाला विशेष भाव नव्हता. परंतु त्या ग्रंथाचे चारहि खंड जेव्हां वेगवेगळ्या वेळीं प्रसिद्ध झाले, तेव्हां त्यांना अकस्मात् मोठी प्रसिद्धि मिळाली. जगाच्या चारहि कोपऱ्यांत त्या ग्रंथाविषयीं जिज्ञासा निर्माण झाली. कारण तो एक विवाद्य ग्रंथ होता. त्या ग्रंथानें त्यांना जवळजवळ साडेपांच लक्ष रुपये मिळवून दिले. ह्या ग्रंथांत महायुद्धाची जेवढी तपशीलवार माहिती आढळते तितकी माहिती अन्य कुठल्याच ग्रंथांत आढळायची नाहीं. त्याचें कारण हें कीं, युद्धकालांत चर्चिल अधिकारावर होते हें तर झालेंच शिवाय सबंध युद्धकालीन कागदपत्रें त्यांच्या नजरेखालून गेलीं होतीं. त्याचा त्यांनीं पुरेपूर उपयोग करून घेतला.

7180-1

टीकाकार पूर्वी चर्चिलच्या लेखनाला नाकें मुरडीत असत. पण 'The World Crisis' चे खंड जसजसे प्रकाशित होऊन ते वाचकांमध्यें लोकप्रिय होऊं लागले, तेव्हां टीकाकारांनाहि चर्चिलच्या लेखनासंबंधीं विचार करावा लागला. सुविख्यात गुप्तपोलीस कादंबरीकार सर ऑर्थर कॉनन डॉइल ह्यांनीं तर एकदम जाहीर केलें, कीं, " चर्चिल हे आजच्या काळांतील एक सुंदर शैलीनें लिहिणारे लेखक असल्याचा साक्षात्कार मला केव्हांच झाला होता. " राजकवि जॉन मास्फिल्ड ह्यांनींहि चर्चिल हे सिद्धहस्त लेखक असल्याचें मान्य केलें. अशा बड्या साहित्यिकांकडून प्रशंसा झाल्यावर टीका-कारांचा निरुपाय होणें साहजिकच होतें. फक्त आर्नोल बेनेट ह्या कादं-बरीकारानें मात्र चर्चिलची प्रतिभा निसर्गदत्त नसल्याची टीका केली. सुविख्यात कादंबरीकार एच्. जी. वेल्स ह्यांनीं चर्चिलची स्तुति केली, परंतु ते उदारमतवादी विचारसरणीचे असल्यानें त्यांनीं त्या दृष्टिकोनांतून त्यांच्यावर थोडी टीका केली. ' लंडन मर्क्युरी ' ह्या नियतकालिकानें मात्र चर्चिलना 'महत्त्वाकांक्षी आणि कच्चे ' असें म्हटलें. तथापि, अशा तुरळक प्रतिकूल टीकांचा अपवाद सोडल्यास The World Crisis हा ग्रंथ इंग्लंड-अमेरिकेंत श्रेष्ठ ठरला व चर्चिलना इंग्लंडच्या श्रेष्ठ ग्रंथकारांमध्यें स्थान प्राप्त झालें.

The World Crisis ला ह्या ग्रंथानें मिळवून दिलेल्या अलोट कीर्तीनें चर्चिलना नवीन ग्रंथ लिहिण्यास हुरूप आला आणि त्यांनी आपला दहा वर्षांचा राजकीय अज्ञातवासाचा काल संपण्यापूर्वींच Life of Marlborough हा दुसरा प्रचंड ग्रंथ लिहून पूर्ण केला. त्या ग्रंथाची साधनसामग्री त्यांच्या हाताशींच होती. कारण ड्यूक ऑफ मार्लबरो ह्यांच्या घराण्यांतच त्यांचा जन्म झालेला होता.

१९३१ सालानंतर इंग्लंडची आर्थिक स्थिति ढासळत गेल्यामुळें १९३५ सालीं स्टॅन्ले बॉल्डविन ह्यांनीं राष्ट्रीय संयुक्त सरकार बनविलें. पण आपल्या मंत्रिमंडळांतील मंत्र्यांची निवड करतेवेळीं त्यांनीं चर्चिल ह्यांना वगळून नेविल चेंबर्लेन ह्यांना फडणीस म्हणून घेतलें. चर्चिलच्या मनाला ती गोष्ट लागल्याशिवाय राहिली नाहीं. परंतु त्यांनीं तो अपमान नेहमींप्रमाणें मुकाट्यानें सहन केला व ते मार्लबरोच्या चरित्रलेखनांत

गर्क झाले. राजकीय दृष्ट्या त्यांची स्थिति मोठी विलक्षण झाली होती. ते अद्याप पार्लमेंटचे सदस्य असल्यानें पार्लमेंटच्या बैठकींना नेमानें उपस्थित रहात. पार्लमेंटचे इतर सदस्य त्यांच्याकडे चमत्कारिक नजरेनें पहात. कांहीजण त्यांच्या भाषणाची टिंगलहि करीत. कारण ते अधिकारावर नसल्यानें त्यांच्या भाषणांना आतां किंमत उरली नव्हती. ते जरी मंत्रि-मंडळांत नसले, तरी पक्के साम्राज्यवादी होते. ब्रिटिश साम्राज्याच्या विघटनाचे वारे आतां वाहूं लागले होते. पण चर्चिल अद्याप काळाचीं पावलें ओळखण्यास तयार नव्हते. आणि म्हणून त्यांनीं हिंदुस्थानला साम्राज्यांतर्गत स्वायत्तता देण्यासहि विरोध केला. आणि महात्मा गांधी व पंडित जवाहरलाल नेहरू ह्या दोघां नेत्यांवर तोंडसुख घेऊन इंग्लंडमधील त्या दोघांच्या एका मोठ्या चाहत्या वर्गाचें शत्रुत्व संपादन केलें.

१९३६ सालीं सिम्प्सन अष्टम एडवर्ड प्रेमप्रकरण उद्भवलें. राजे अष्टम एडवर्ड हे मिसेस् सिम्प्सन ह्या नांवाच्या दोनदां घटस्फोट घतलेल्या अमेरिकन स्त्रीशीं विवाह करण्यास तयार झाले असतां, पंतप्रधान बॉल्डविन ह्यानीं त्या विवाहास विरोध केला. परंतु चर्चिल हे अष्टम एडवर्ड ह्यांचे स्नेही असल्यानें त्यांनीं त्या विवाहाचा जोरदार पुरस्कार केला. त्यांच्या मतें अष्टम एडवर्ड हे इंग्रज लोकांच्या स्वभावाला मानवणारे राजे असल्यानें त्यांना राजसंन्यास घेण्यास लावण्यांत इंग्लंडची मोठी हानि आहे. परंतु त्यांच्या आवाहनाकडे कुणींच लक्ष दिलें नाहीं. आणि अशा रीतीनें राजे अष्टम एडवर्ड ह्यांना प्रेमाखातर राज्यत्याग करावा लागला. राजत्यागाचे वेळीं राजे अष्टम् एड्वर्ड ह्यांनीं जें निरोपाचें प्रभावी भाषण केलें, तें भाषण तयार करण्याचे कामीं चर्चिलनीं त्यांना मदत केली. त्या भाषणाचा कच्चा मसुदा एडवर्डनीं लिहिला होता. चर्चिलनीं त्याच्यावर हात फिरवून त्यांत डौलदार आणि प्रभावी वाक्यांची पेरणी केली.

चर्चिल ह्यांची पार्लमेंटमधील आणि वर्तमानपत्रांतील दुसरी लढाई म्हणजे त्यांनीं फासिस्टांविरुद्ध सुरूं केलेली मोहीम होय. हिटलर आणि मुसोलिनी ह्या दोघांच्या आक्रमक राजकारणांतून दुसऱ्या महायुद्धाचा भडका उडाल्याशिवाय राहणार नाहीं, हें त्यांनीं आधींच ओळखलें होतें व म्हणून ते त्या दोघांचा बंदोबस्त करण्यास सरकारला प्रवृत्त करीत होते.

पण त्यांच्या ह्या इशाऱ्याकडे कुणींच लक्ष दिलें नाहीं. इतकेंच नव्हे तर, त्यांच्या भाषणाची अनेकांनीं हुर्यो केली. परंतु चर्चिल हा आपला भयंकर शत्रु असल्याची नाझी नेत्यांना कल्पना आली होती व म्हणून त्यांनीं त्यांच्यावर कडाडून हल्ला चढविण्यास सुरुवात केली होती.

त्या दरम्यान बॉल्डविन ह्यांच्या जागीं नेविल चेंबर्लेन हे इंग्लंडचे पंतप्रधान झाले होतें. त्यांचें फासिस्टांना चुचकारण्याचें धोरण परराष्ट्रमंत्री अँथनी ईडन ह्यांना पसंत न पडल्यानें त्यांनीं आपल्या परराष्ट्रमंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. त्यांच्या जागीं चेंबर्लेन ह्यांनीं नवीन परराष्ट्रमंत्र्यांची नेमणूक न करतां तें खातें स्वतःकडे घेतलें होतें.

चेंबर्लेन ह्यांच्या फासिस्टांना संतुष्ट करण्याच्या धोरणानें ते शेफारून जातील व त्यांच्या मागण्या वाढत जातील हें चर्चिल ह्यांनीं केव्हांच ताडलें होतें. तसेंच चेंबर्लेनना पंतप्रधानपदाचा राजिनामा द्यावा लागणार असल्याचेंहि भाकीत त्यांनीं तेव्हांच केलें होतें. म्हणून त्यांनीं काळाचीं पावलें ओळखून पुढची तयारी करण्यास सुरुवात केली. त्यांनीं फ्रान्सला जाऊन फ्रेंच पुढाऱ्यांशीं झपाटयानें बदलत जाणाऱ्या राजकीय परिस्थितीवर चर्चा केली. इंग्लंडला परतल्यावर त्यांनीं फ्रेंच पुढाऱ्यांशीं झालेल्या बोलण्याचा अहवाल ईडन ह्यांचे जागीं परराष्ट्रमंत्री झालेले वयोवृद्ध मुत्सद्दी लॉर्ड हॅलिफॅक्स ह्यांना सादर केला नंतर त्यांनीं पार्लमेंटमध्यें डरकाळी फोडली : "हत्यारबंद व्हा- - राष्ट्रसंघाच्या तत्त्वांना चिटकून राहा. राष्ट्रसंघामध्यें निष्क्रियता आली असल्यास आणि तो मोडकळीस आला असल्यास त्याची आम्ही पुनर्घटना केली पाहिजे. त्याच्या हुकुमांची अंमलबजावणी झाली पाहिजे. इंग्लंड आणि फ्रान्स हीं दोन्ही एकत्र झालीं आहेत. ह्या दोन्ही राष्ट्रांचें संयुक्त सामर्थ्य मोठें आहे. त्याला आव्हान देण्याचें धाडस कुणीहि करूं शकणार नाहीं. नाझी राक्षस छोटया राष्ट्रांवर झडप घालूं पाहत आहे. इंग्लंड-फ्रान्सनीं त्या राष्ट्रांना अभय दिलें पाहिजे. त्या राष्ट्रांना आम्हीं सांगितलें पाहिजे, 'तुम्ही नाझीचा प्रतिकार करण्यास जर तयार असाल तर आम्ही तुमच्या मदतीला धांवून येऊं.' ह्यासंबंधीं तुम्ही कोणतें पाऊल टाकायचें ठरविलें आहे ?"

परंतु चर्चिलच्या घोषणेकडे पंतप्रधान चेंबरलेन ह्यांनीं लक्ष दिलें नाहीं. ते शांतिदूताची भूमिका घेऊन छत्री सरसावून जर्मनीच्या वाऱ्या करूं लागले. हिटलरनें त्यांची कुवत ओळखली होती. त्यानें त्यांना बनविलें. एका बाजूनें शांतिपाठ म्हणून त्यानें दुसऱ्या बाजूनें झेकोस्लोव्हाकिया घशांत घातला व पोलंडचा घास घेण्याची तो तयारी करूं लागला. परंतु चेंबर्लेन अद्याप शुद्धीवर आले नाहींत. हिटलर आपणास मूर्ख बनवीत आहे हें त्यांच्या ध्यानीं आलें नाहीं आणि तें त्यांच्या ध्यानीं आलें तेव्हां फार उशीर झाला होता.

******

■ ■ ■ ■ ■ ■ ■

प्रकरण चौदावें

## इंग्लंडचे पंतप्रधान

दि. १ सप्टेंबर १९३९ रोजीं हिटलरनें पोलंडवर स्वारी केली. दि. ३ सप्टेंबरला इंग्लंड आणि फ्रान्स ह्या दोघांनीं जर्मनीशीं युद्ध पुकारलें. त्याच दिवशीं पंतप्रधान नेविल चेंबर्लेन ह्यांनीं युद्धमंत्रिमंडळाची नेमणूक केली. त्यांत चर्चिलना आरमारमंत्री म्हणून घेण्यांत आलें.

१९१४ सालीं पहिल्या महायुद्धाच्या सुरुवातीलाहि चर्चिल हे इंग्लंडचे आरमारमंत्री होते,आणि आतां दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीलाहि त्यांच्याकडे तें खातें आलें होतें. पहिल्या महायुद्धाच्या सुरुवातीला ब्रिटिश युद्धनौकांनीं जर्मन आरमाराचा अनेक ठिकाणीं पराभव करून त्याला सळो कीं पळो करून सोडलें होतें. पण या वेळीं जर्मनीपाशीं तेवढें बलाढ्य आरमार नव्हतें; त्याची मुख्य भिस्त पाणबुड्यांवर आणि बचावात्मक युद्धनौकांवर होती.

हिटलर अधिकारावर आला तेव्हांपासून चर्चिलनीं त्याला ओरबाडण्यास सुरुवात केली होती. चर्चिलचें नांव ऐकलें कीं, हिटलरचा नुसता जळफळाट होई. त्यानें युरोपची पांचावर धारण बसविली. त्याच्या धमक्यांनीं मोठमोठ्या मुत्सद्यांच्या छातींत धडकी भरे. स्टालिनसारख्या बेडर हुकूमशहाला देखील त्याच्याशीं मिळतें घेणें भाग पडलें होतें. परंतु जगामध्यें फक्त अशी एकच व्यक्ति होती कीं, हिटलरचा सारा दिमाख त्या व्यक्तीसमोर फिका पडे. अन् ती व्यक्ति दुसरी तिसरी कोणी नसून चर्चिल हे होते. त्यांनीं हिटलरला हिटलर ह्या नांवानें कधींच संबोधिलें नाहीं. ते त्याला ' कॉर्पोरल हिटलर ' ह्या नांवानें संबोधीत असत. तो उणेपणा काढला कीं, हिटलर रागानें काळानिळा होई.

चर्चिल आठ महिने आरमारमंत्री होते. इंग्लंडच्या इतिहासांतील ते अतिशय भयाण दिवस होते. जर्मन यू-बोटींनीं ब्रिटिश नौका बुडविण्याचा नुसता सपाटा सुरू केला होता. खुद्द इंग्लंडच्या स्कॅपा फ्लो ह्या प्रख्यात नाविक तळामध्यें शिरून जर्मन पाणबुड्यांनीं ' रॉयल ओक ' ह्या नांवाचें जहाज बुडविलें होतें व मॅग्नेटिक सुरुंग पेरले होते. अशा रीतीनें एकामागून एक अशा युद्धनौका आणि इतर जहाजे बुडत गेल्यानें इंग्लंडची स्थिति मोठी शोचनीय झाली होती. तो तडाखा अर्थात अनपेक्षित नव्हता. इंग्लंडची युद्धाची तयारी अगदींच तुटपुंजी होती. परंतु ती आणीबाणीची स्थिति फार काळ टिकणें शक्य नव्हतें. इंग्लंडची युद्धाची तयारी जोरांत चालली होती व त्याचें आरमार शत्रूशीं दोन हात करण्यास समुद्रावर निघालें होतें. अशाच परिस्थितींत एके दिवशीं ब्रिटिश युद्धनौकांनीं दक्षिण अमेरिकेंत युरुग्वे देशाच्या किनाऱ्यावर प्लेट नदीच्या मुखांत ' ग्राफ स्पी ' ह्या प्रख्यात जर्मन युद्धनौकेची मोठी हानि केल्याची बातमी इंग्लंडला येऊन थडकली. तदनंतर चौथ्या दिवशीं ' ग्राफ स्पी ' तिच्या खलाशांनीं उडवून टाकल्याची बातमी आली.

ब्रिटिश आरमाराचा तो विजय खरोखरच मोठा होता. कारण ग्राफ स्पी ही एक भयंकर युद्धनौका होती. तिनें अनेक ब्रिटिश जहाजांना पाण्याचा

तेळ दाखविला होता. अशा एका पराक्रमी आणि बलाढ्य युद्धनौकेचा नाश करून ब्रिटिश आरमारानें आपलें श्रेष्ठत्व पुन: एकदां सिद्ध केलें होतें. हिटलरच्या इभ्रतीवर तो मोठाच आघात होता. असें सांगतात कीं, 'ग्राफ स्पी'नें ब्रिटिश युद्धनौकांना भिऊन जलसमाधि घेतल्याची वार्ता चर्चिलना कळली तेव्हां ते आपल्या खोलींत लहान मुलासारखे नाचले. तो विजय इंग्लंडनें एकाद्या राष्ट्रीय विजयाप्रमाणें साजरा केला. परंतु त्या विजयाचा आनंद सदाकाल टिकणें अशक्य होतें. हिटलरच्या आक्रमणाला पायबंद घालणें दोस्तांना अशक्य झाल्यानें इंग्लंडमध्यें चेंबर्लेन सरकारविरुद्ध असंतोष माजत चालला होता. खुद्द टोरी पक्षामध्येंहि चेंबर्लेनवर टीका होत होती. तें घरांतलें भांडण उघडयावर आलें. टोरी सभासदांनीं पार्लमेंटमध्यें चेंबर्लेन ह्यांच्यादर प्रच्छन्न टीका केली. इंग्लंडचे नंतरचे टोरी पंतप्रधान मॅकमिलन आणि लियो अमेरी हे दोघे त्यांत अग्रेसर होते. अमेरी ह्यांनीं तर चेंबर्लेनना क्रॉम्वेलचे पुढील उद्गार उद्धृत करून जागा खालीं करण्याची ताकीद दिली: " तुम्ही इथें कांहीं चांगलें न करतां फार वेळ बसून आहांत. माझा तुम्हांला हुकूम आहे कीं तुम्ही येथून निघून जा . . . "

चेंबर्लेन ह्यांना आपल्या पक्षांतील लोकांची टीका फार झोंबली व त्यांनीं आपल्या मंत्रिमंडळाचा राजीनामा दिला. इंग्लंडचे राजे जॉर्ज ह्यांनीं लगेच चर्चिलना राजवाडयांत बोलवून मंत्रिमंडळ बनविण्यास सांगितलें. तो बनाव अगोदरच तयार होता.

चर्चिल हे एके दिवशीं आपल्या एका मित्रापाशीं म्हणाले होते, "मी राजकारण कधींच सोडलें असतें; परंतु मला पंतप्रधान होण्याची आशा आहे." कित्येक वर्षांपासून उराशीं बाळगलेली ती महत्त्वाकांक्षा शेवटीं फलद्रूप झाली होती. पण कोणत्या परिस्थितींत? इंग्लंड जीवन-मरणाच्या युद्धांत गुंतलें असतांना! चर्चिलकडे सर्वपक्षीय संयुक्त मंत्रिमंडळ बनविण्याची मागणी करण्यांत आली. ती मागणी चर्चिलनीं मान्य केली. १९४० च्या वसंत ऋतूंत त्यांनीं सर्वपक्षीय सरकार स्थापन केलें. दि. १० मेला ते अधिकारावर आले. त्यांचें नांव इंग्लंडच्या इतिहासांत पिट, ग्लॅडस्टन, डिझ्राएली आणि फॉक्स ह्या धुरंधर पंतप्रधानांच्या नामावळींत अजरामर झालें आहे. 'ते डयूक ऑफ मार्लबरो ह्यांच्याहि पुढें गेले,' असे उद्गार त्यांच्या एका सल्लागारानें

काढले. पंतप्रधान झाल्यावर चर्चिलनी जें पहिलें भाषण पार्लमेंटमध्यें केलें, तो वक्तृत्वाचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून समजला जातो. इंग्लंडच्या महान् वक्तृत्वामध्यें त्या भाषणाला अमर स्थान प्राप्त झालें आहे.

चर्चिल ह्यांच्यावर नेहमीं टीका होत आली आहे, कीं ते युद्धपिपासु आहेत. युद्ध म्हटलें की त्यांना चेव येतो. पण वस्तुस्थिति तशी नाहीं. त्यांच्या निकटवर्ती सहवासांत राहण्याचा योग ज्या लोकांना आला आहे त्यांचें असें म्हणणें आहे, कीं, चर्चिल हे युद्धाचे सर्वांत मोठे विरोधक आहेत. त्यांच्यावर युद्धपिपासूपणाचा आरोप त्यांच्या शत्रूंनींच आणि टीकाकारांनीं केला आहे. शत्रूचीं युद्धाच्या दिशेनें पावलें पडूं लागलीं कीं, तें धोक्याचा लाल कंदील दाखवीत म्हणून शत्रु त्याच्यावर ते युद्धपिपासु असल्याचा आरोप करीत. मात्र एक गोष्ट खरी कीं, त्यांच्या पराक्रमाला युद्धकालांतच मोठा वाव मिळतो. १९४० पासून १९४६ पर्यन्त त्यांची कर्तबगारी जगाच्या निदर्शनास आली.

पंतप्रधान झाल्यावर चर्चिल आपल्या पत्नीसह १० डाउनिंग स्ट्रीटवर इंग्लंडच्या पंतप्रधानांच्या अधिकृत निवासस्थानीं रहावयास गेले. तिथून त्यांनीं युद्धाचीं सूत्रें मोठ्या कुशलतेने हलविलीं.

चर्चिलच्या दिमतीला एक विमान आणि एक आगगाडी देण्यांत आली होती. त्यांचें आतां वय झालें असल्यानें विमानाचा प्रवास त्यांच्या रक्त-दाबाला झेपण्यासारखा नव्हता. पण त्यांना विमानांत त्रास होऊं नयें म्हणून अंड्याच्या आकाराची एक खास खोली बनविण्यांत आली. ती दहा फूट लांब होती व तिचें वजन दोन टन होतें. ह्या खोलीचा मुख्य विशेष हा कीं, ती कुठल्याहि विमानांत बसवितां येत असे. असें सांगतात कीं, दुनियेमध्यें तशा प्रकारची ती पहिलीच खोली होती.

त्यांची आगगाडी मूळ इंग्लंडच्या राजाराणींसाठीं बांधण्यांत आली होती. त्यांनीं ती घेण्यासाठी चर्चिलना आग्रह केला. राजेसाहेबांना मोटारीनें प्रवास करणें आवडे. पण ही गाडी मुळींच सुबक नव्हती. ती कोणाच्या नज-रेंत भरूं नये म्हणून मुद्दाम चिखलानें माखलेली ठेवण्यांत आली होती. गाडीच्या नोकरवर्गाला ती छानदार असावी असें वाटे. परंतु शत्रुविमानांचें

आणि शत्रुहस्तकांचें तिच्यांकडे लक्ष जाऊं नये म्हणून ती सरकारनें तशीच ठेवली.

इंग्लंडचे पंतप्रधान म्हणून चर्चिलनीं कधींच दिमाख दाखविला नाहीं. ते नेहमीं निगर्वी राहिले. त्यांना सरकारांतील ज्या माणसाकडून माहिती हवी असे त्या माणसाला ते आपणांकडे बोलावून घेत किंवा त्याला फोन करीत आणि नेहमीं बोलतांना तें 'कृपा करून' ह्या वाक्याचा उपयोग करीत. त्यांनीं आपणांभोंवतीं तज्ज्ञ लोकांचा संच जमविला होता.

मागें सांगितलेंच आहे कीं, सार्जंट (नंतर इन्स्पेक्टर) थॉम्सन हा स्कॉटलंडयार्ड इन्पेक्टर चर्चिलचा शरीररक्षक होता. थॉम्सन केव्हांच सेवानिवृत्त होऊन आपल्या खेडयांत भुसार आणि किराणा मालाचें दुकान थाटून राहिले होते. अकस्मात् एके दिवशीं त्यांना पॅरिसहून पुढील तार आली : " मला बुधवारीं ४॥ वाजतां क्रॉयडनच्या विमानतळावर भेटावें. चर्चिल. " ती तार म्हणजे हुकूमच होता. आणि चर्चिलच्या तशा हुकुमाची थॉम्सनना पूर्वींपासूनच संवय होती. तार हातीं पडतांच, त्यांनीं दुकान बंद केलें व आपलें रिव्हॉल्व्हर बरोबर घेऊन गाडींत बसून क्रॉयडनचा रस्ता धरला. आपल्या जुन्या शरीररक्षकाला भेटण्यास चर्चिलना आनंद वाटला. त्यांनीं थॉम्सनना दर आठवडयास पांच पौंड पगार देऊं केला. थॉम्सनना दुकानांत त्याहून अधिक कमाई होत असे, पण त्यांनीं मुकाटयानें तो पगार मान्य केला.

चर्चिलना पॅरिस येथें कांहीं फ्रेंचांकडून कळलें होतें कीं, शत्रूच्या गुप्त-हेरांकडून त्यांच्यावर हल्ला होण्याची भीति आहे. तो धोका लक्षांत घेऊन चर्चिलनीं आपल्या जुन्या शरीररक्षकाला पुनः कामावर बोलाविलें होतें. परंतु शत्रूच्या हल्ल्याचा धोका असूनदेखील चर्चिल निर्भयपणें सगळीकडे हिंडत. त्यांचा शरीररक्षक त्यांच्याबरोबर नांवालाच असे. ते त्याला इतर कामेंच अधिक सांगत. एके दिवशीं आपल्या खासगी आगगाडींतून बाहेर पडतांना चर्चिल थॉम्सनना म्हणाले : " थॉम्सन, ते कागद गोळा करून घेऊन या बघूं ? " त्यावर थॉम्सन चर्चिलना म्हणाले : " मी हें काम आनंदानें करतों, परंतु मी कागद गोळा करावयास लागलों, तर बाहेर मी तुमच्यावर पहारा करूं शकणार नाहीं. " तें ऐकतांच चर्चिलनीं थॉम्सनकडे रागानें बघितलें. परंतु,

प्लॅटफॉर्मवर ते थॉम्सनची वाट पहात राहिले. थोडक्यांत सांगायचें म्हणजे चर्चिलचें रक्षण करणें हें एक बिकट काम होतें. पण तें इन्स्पेक्टर थॉम्सननीं यशस्वीपणें बजावलें. थॅाम्सननीं आपल्या आठवणी प्रसिद्ध केल्या असून त्यांत ह्या घटनांचा निर्देश केला आहे.

एके दिवशीं चर्चिल १० डाउनिंग स्ट्रीटवर आपल्या सरकारी निवास-स्थानीं दारावर उभे राहून बाहेर स्फोट पावणाऱ्या बॉंबगोळ्यांची बरसात पहात होते. अकस्मात् जवळच एका बॉंबचा प्रचंड स्फोट झाला. इन्स्पेक्टर थॉम्सन तिथें जवळच होते. " या बाजूनें कांहींतरी येत आहे " ते मोठ्यानें ओरडले व चर्चिलना उचलून त्यांनीं आंत टाकलें. चर्चिलना त्यांचा राग आला व थॉम्सनच्या अंगावर वसकन ते ओरडले, "काय माणूस आहे !" पण चर्चिलचा राग जागच्या जागींच गारठून गेला. त्यांच्याजवळ उभा असलेला एक सरकारी मनुष्य बॉंबची कपची लागून जखमी झाला होता. ती कपची चर्चिलना लागली असती तर ? जर्मन विमानें १० डाउनिंग स्ट्रीटवर घिरट्या घालीत असत. चर्चिल बॉंबहल्ल्यांत ठार झाले तर ते अर्धे युद्ध जिंकणार होते. इन्स्पेक्टर थॉम्सनना त्या धोक्याची जाणीव झाली होती, व म्हणून ते १० डाउनिंग स्ट्रीटचा आपल्या संभाषणांत " मृत्यूचा सांपळा " असा उल्लेख करीत. पण चर्चिल म्हणायचे, " हिटलरच्या सोयीप्रमाणें मी माझी राहणी बदलणार नाहीं. " त्यांच्या ह्या उद्‌गारांत केवढा अर्थ भरलेला होता ! त्यांनीं आपल्या देशबांधवांना निर्भय बनविलें तें अशा रीतीनें.

जर्मन विमानांच्या ' ब्लीट्झ क्रिग'मध्यें देखील चर्चिलचें जेवण सावकाश चाले. त्यांच्या जवळपास इमारती कोसळत बॉंबगोळ्यांचा प्रचंड स्फोट होई. पण त्यांच्या चेहऱ्यावरील एक रेषा देखील हलत नसे. नेपोलियन बोनापार्टच्या जीवनचरित्राचा त्यांनीं सखोल अभ्यास केला होता. नेपोलियन भर लढाईंत देखील आपल्या घोड्यावर बसलेल्या स्थितींत थोडा वेळ झोंप घेत असे. त्याच्या जवळपास तोफांचे गोळे फुटत आणि बंदुकांच्या गोळ्यांचा वर्षाव होई. पण तो मृत्यूला कधींच भ्याला नाहीं. शेवटीं सगळ्यांनींच आग्रह केल्यामुळें चर्चिल एका सुरक्षित इमारतींत रहावयास गेले. पण तेथें देखील त्यांचा सहलीचा रिवाज मोडला नाहीं. भर बॉंबहल्ल्यांत ते आपली सिगार पेटवून आणि सोन्याच्या मुठीची काठी उचलून १० डाउनिंग स्ट्रीटवरील

बागेंत सहलीस जात. एके दिवशीं इन्स्पेक्टर थॉम्सननीं त्यांच्या डोक्यावरील साधी हॅट काढून स्टील हेल्मेट तिच्या जागीं ठेवली. चर्चिलनीं ती स्टील हेल्मेट काढून झुडुपांत भिरकावून दिली.

एके रात्रीं इंग्लंडचे राजेसाहेब राणीसह चर्चिलकडे जेवावयास होते. जेवण आटोपलें होतें आणि मुखशुद्धीचा फलाहार चालू होता. इतक्यांत बॉब-हल्ल्याचा भोंगा वाजला. राजेसाहेब राणीसह बॉबप्रतिबंधक निवाऱ्यांत गेले पण चर्चिल बाहेर येरझारा घालीत राहिले. तें पाहून राजेसाहेब रोषयुक्त स्वरांत म्हणाले, " चर्चिल, तुम्ही इथं आमच्यापाशीं आलांत तर बरं नाहीं का ? " पण चर्चिलनीं निवाऱ्याचा आश्रय घेतला नाहीं. राजेसाहेबांनीं चारदां बोलवूनदेखील ते बाहेर येरझारा घालीतच राहिले.

युद्धकालांत चर्चिलशीं ज्या ज्या लोकांचा संबंध आला त्या सगळ्यांना त्यांच्यामधील निर्भयवृत्तीचा साक्षात्कार झाला. डंकर्कच्या माघारीच्या वेळीं त्यांनीं फ्लॅंडर्समधील ब्रिटिश सेनाधिकाऱ्यांना स्वतः मार्गदर्शन केलें. बेल्जियमचा राजा लिओपाल्ड ह्यानें दोस्तांशीं दगलबाजी करून आपल्या सैन्याला जर्मनांना शरण जाण्याचा हुकूम दिला. त्यामुळें दोस्त फौजांची डावी बगल उघडी पडली. चर्चिलनीं लगेच ब्रिटिश सेनाधिकाऱ्यांना तार धाडली, " उत्तरेकडे कालवा बंदराच्या दिशेनें चाल करा. " आणि दि.२६ मे १९४० रोजीं पहाटेस साडेसहा वाजतां डंकर्कहून स्थलांतराच्या तांतडीच्या आवश्यकतेची बातमी आली तेव्हां, चर्चिल लगबगीनें आपल्या बिछान्यावरून उठले व आपल्या दातांच्या कवळ्या तोंडांत न बसवतांच त्यांनीं टेलिफोन उचलला. आपण दातांच्या कवळ्या लावलेल्या नाहीत ह्याची त्यांना दिवसभर आठवण झाली नाहीं. त्याच स्थितींत ते दिवसभर काम करीत राहिले. त्यांचा आवाज लोकांना विलक्षण वाटला, पण त्यांच्या हुकुमावरून आणि वाक्यांवरून तो आवाज त्यांचाच असल्याचें लोकांनीं ताडलें. त्यांनीं टेलिफोन हातांत धरूनच सबंध राष्ट्राला डंकर्कच्या किनाऱ्यावर जर्मनांच्या कोंडीत सांपडलेल्या ३५०००० ब्रिटिश आणि फ्रेंच सैन्यावरील मृत्यूच्या टांगत्या तलवारीची जाणीव करून दिली व त्या सैन्याला माघारी आणण्याकरितां नौका पाठविण्याची व्यवस्था केली. एकाच तासाच्या आंत रेडिओवरून आणि वर्तमानपत्रांतून मागणी प्रसिद्ध झाली : " विन्नी (विन्स्टन)नां नौका

पाहिजेत." ती मागणी जाहीर होण्याचाच अवकाश इंग्लंडच्या सर्व लहान मोठ्या बंदरांतून सर्व प्रकारच्या नौका डंकर्कच्या दिशेनें मार्ग आक्रमण करत्या झाल्या. ब्रिटिश लश्करी इतिहासाचें तें एक शौर्यपूर्ण आणि रोमांचकारी प्रकरण आहे. सुमारें एक हजार नौका त्या दिवशीं डंकर्ककडे रवाना झाल्या. त्या नौकांमध्यें युद्धनौका, उतारवाहू नौका, पाणसुरुंग काढणाऱ्या नौका, पडाव, अशा नाना प्रकारच्या नौका होत्या. पण ती नुसती सुरुवात होती. थेम्स नदींत आणि इतरत्र माणसें आपल्या खासगी नावांमध्यें उड्या मारून द्रुतगतीने डंकर्कच्या दिशेनें निघालीं. श्रीमंत लोकांच्या लक्षावधि रुपय किमतीच्या सहलीच्या नौका, कोळ्यांच्या शिडाच्या होड्या, शर्यतीच्या होड्या, सगळ्या सगळ्या नौका डंकर्ककडे रवाना झाल्या. थोडक्यांत सांगायचें म्हणजे सुरुवातीपासून अखेरपर्यंत डंकर्कहून सैन्य काढून घेण्याची ती प्रचंड मोहीम शिस्तींत आणि निर्भयपणें पार पडली.

ब्रिटिश आरमारानें आणि खासगी नावांनीं डंकर्कहून ३३८००० सैनिक इंग्लंडला आणले. एकीकडे आरमाराची पाठ थोपटतांना पंतप्रधान चर्चिल ह्यांनीं हवाई दलाविषयींहि गौरवपूर्ण उद्‌गार काढले. ते म्हणाले, "जर्मन आणि ब्रिटिश हवाई दलांच्या सामर्थ्याची ही एक महान् चांचणी होती. आणि त्या चांचणींत ब्रिटिश हवाई दल विजयी झालें." आणि खरोखर ब्रिटिश विमानांनीं जर डंकर्क येथें जर्मन विमानांशीं प्राणपणानें झुंज दिली नसती, तर त्या हजार नौका आणि ३३८००० सैनिक जर्मन विमानांच्या बॉंबहल्ल्यांत ठार झाले असते.

चर्चिलनीं डंकर्कच्या माघारीला विजयाचें स्वरूप दिलें नाही. मात्र ती यशस्वी माघार असल्याचें त्यांनीं सांगितलें. त्यांनीं कांहींच लपवून ठेवलें नाहीं. त्यांनीं इंग्लंडचें चित्र जसेंच्या तसे चितारलें. ते म्हणाले, "आम्ही १००० तोफा मार्गे सोडून आलों. आमचीं सर्व वाहनें–चिलखती गाड्या आणि रणगाडे–शत्रूच्या हातीं पडले आतां. कांहीं कांही म्हणून शिल्लक नाहीं."

युरोप गेलें होतें, रशियानें फासिस्टांशीं हातमिळवणी केली होती. आणि अमेरिका तटस्थ होती. चर्चिलनीं आपल्या मन्त्रिमंडळाची बैठक बोलाविली. त्यांच्या तोंडांतून निघणारें तें भयंकर कटु सत्य ऐकण्यासाठीं सर्व मंत्री त्यांच्या-भोंवतीं गोळा झाले. पण त्या दिवसाइतकें अवसान त्यांच्यामध्यें त्यांना इतर

कोणत्याच वेळीं आढळलें नाहीं. ते त्यांना म्हणाले, " मित्रांनो आपण आतां एकटे आहोंत. माझ्याविषयीं बोलायचें झाल्यास मला ही गोष्ट आनंददायी वाटते." केवढे धीरोदात्त उद्‌गार !

******

प्रकरण पंधरावें

## विजय

संयुक्त सरकारांत पंतप्रधानानें निःपक्षपाती असायला हवें.चर्चिलनी शक्यतों निःपक्षपाती राहण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांच्या मजूरपक्षाच्या द्वेषामुळें त्यांना सर्वस्वीं निःपक्षपाती राहणें कांहीं शक्य झालें नाहीं. उदाहरणार्थ क्लेमंट ॲटली हे मजूर पक्षाचे नेते होते. पण, चर्चिलनी त्यांच्याकडे लॉर्ड प्रीव्ही सीलचें क्षुल्लक खातें सोपविलें. ॲटली ह्यांच्या मनाला ती गोष्ट लागल्याशिवाय राहिली नाहीं. चर्चिलच्या निकटवर्ती गोटांतील लोक सांगतात कीं, चर्चिलना ॲटलीविषयीं नेहमींच तिरस्कार वाटत असे. ज्या ज्या वेळीं त्यांना संधि सांपडली, त्या त्या वेळीं त्यांनीं ॲटलीचा पाणउतारा केला. नंतर हेंच ॲटली इंग्लंडचे पंतप्रधान झाले. त्या वेळीं चर्चिलना त्यांची थट्टा आणि पाणउतारा केल्याबद्दल पश्चात्ताप झाला असेल कीं काय तें अद्याप कळलेलें नाहीं. परंतु एकमात्र खरें कीं, चर्चिलच्या जिभेला हाड नाहीं. त्यांनीं कुणाचाच मुलाहिजा कधीं बाळगला नाहीं. त्यांनीं ओरबाडे काढल्याशिवाय कुणाला सोडलें नाहीं.

युद्धकाळांत या ना त्या कारणावरून चर्चिलच्या सगळ्याच सहकाऱ्यांना त्यांच्या जिभेचा फटका बसला आहे. युद्धकाळांत सतत

पांच सहा वर्षेपर्यंत पंतप्रधान म्हणून राष्ट्राचा गाडा हांकणें ही कांहीं लहान सहान गोष्ट नव्हती. पण चर्चिलनीं तें काम यशस्वीपणें आणि कुशलतेनें पार पाडलें. त्यांनीं हजारों मैलांचा प्रवास केला. ते आपल्या कचेरींत दिवसभर काम करीत, पण संध्याकाळीं घरीं आल्यावर देखील मध्यरात्र उलटेपर्यंत आपल्या अभ्यासिकेंत काम करीत बसलेले आढळत. त्यांचे सल्लागार आणि डॉक्टर त्यांना फार श्रम न घेण्याचा सल्ला देत, परंतु त्या सल्ल्याकडे ते लक्ष देत नसत. सर्व गोष्टी स्वतःच्या डोळ्यांनीं बघितल्याशिवाय त्यांच्या मनाला स्वस्थता लाभत नसे. डॉक्टर्सच्या आणि सल्लागारांच्या सल्ल्याविरुद्ध ते फ्रान्सवरील स्वारीचे दिवशीं एका विनाशिकेंत बसून फ्रान्सच्या किनाऱ्यापर्यंत गेले. जनरल स्मट्स् आणि जनरल सर ॲलनब्रुक हे दोघे त्यांच्याबरोबर होते. जर्मन तोफखाना दृष्टिपथांत आल्यावर चर्चिलनीं विनाशिकेच्या कप्तानाला तोफा डागून जर्मनांना अभिवादन करण्याचा हुकूम केला ! ती गोष्ट अर्थातच धोक्याची होती. कारण विनाशिका किनाऱ्यापासून अगदीं जवळ आणि जर्मन तोफांच्या माऱ्याच्या टप्प्यांत होती. तिनें तोफा डागल्या असत्या तर जर्मन तोफा प्रत्युत्तर दिल्याशिवाय रहाणार नव्हत्या. क्षणभर विनाशिकेच्या कप्तानानें चर्चिलचा हुकूम अमलांत आणूं नये असा विचार केला. पण त्याला तें शक्य झालें नाहीं. कारण चर्चिल हे पंतप्रधान आणि त्याचे वरिष्ठ होते. त्यानें तोफ डागण्याचा हुकूम केला. परंतु जर्मनांनीं प्रत्युत्तर न केलेलें पाहून चर्चिलची तीव्र निराशा झाली !

आणखी एकदां तें लढाईंत शिरणाऱ्या एका रणगाड्यावर चढण्याचा प्रयत्न करीत होते, पण त्यांना मागें लोटण्यांस आलें. रशियानें जर्मनीशीं शांततेचा करार करून आणि पोलंडच्या पाठींत खंजीर खुपसून दगलबाजी केली असतांहि व जर्मनीनें रशियावर स्वारी करतांच, चर्चिलनीं रशियाला अभय दिलें. वास्तविक स्टालिनचें आणि चर्चिलचें कधींच पटण्यासारखें नव्हतें. परंतु जर्मनीचा पाडाव करण्यासाठीं म्हणून चर्चिलनीं स्टालिनशीं दोस्ती केली. आणि जपाननें पर्लहार्बरवर बॉंबहल्ला केला तेव्हां चर्चिलनीं जपानशीं युद्ध पुकारून अमेरिकेला जागतिक युद्धांत ओढलें. असा दूर-दृष्टीचा आणि निष्णात डावपेची नेता इंग्लंडला लाभला म्हणूनच दोस्तांना जर्मनीचा पाडाव करणें शक्य झालें.

हिटलरनें युद्ध जिंकण्यासाठीं जे जे प्रयत्न केले, ते चर्चिलनीं हाणून पाडले. प्रे. रुझ्वेल्ट ह्यांनीं दोस्तांना सर्वतोपरी मदत केली. अमेरिकेच्या मदतीशिवाय आपणांला युद्ध जिंकणें कदापिहि शक्य होणार नाहीं, हें चर्चिल जाणून होते, आणि म्हणून त्यांनीं प्रे. रुझ्वेल्ट ह्यांच्या मागें युद्धाच्या सुरुवातीलाच अमेरिकेनें युद्धप्रवेश करावा म्हणून टुमणें लावलें होतें. परंतु अमेरिकेनें थांबावें आणि बघावें ह्या मताचा एक प्रबळ गट असल्यानें पर्लहार्बरच्या बाँबहल्ल्यापर्यंत प्रे. रुझ्वेल्टना युद्धप्रवेश करणें शक्य झालें नाहीं.

प्रे. रुझ्वेल्ट ह्यांच्या निधनाची बातमी कळली तेव्हां चर्चिल ढसढसां रडले. ह्या बेडर वृत्तीच्या नेत्याच्या डोळ्यांत अश्रु क्वचितच दिसले असतील. " भयंकर ! भयंकर ! " ते इन्स्पेक्टर थॉम्सनना म्हणाले. नंतर कांहीं वेळानें ते म्हणाले. " ते आमचे मोठे मित्र होते. आम्हांला मदतीची जरुरी होती, तेव्हां त्यांनीं आम्हांस अमर्याद मदत केली. मी एका मोठ्या मित्राला मुकलों आहें. आम्हांला आतां सुरुवात नव्यानें करावी लागेल. "

युरोपांत जर्मनीचा पाडाव जवळ आला तेव्हां अमेरिकेच्या व दोस्तांच्या सहकार्याचीं गोड फळें बघण्यास रुझ्वेल्ट जगले नाहींत म्हणून चर्चिलना फार वाईट वाटलें. पण मुसोलिनीला इटालियन गनिमांनी उत्तर इटालींत ठार केल्याची वार्ता त्यांना कळली तेव्हां ते प्रे. रुझ्वेल्ट ह्यांच्या मृत्यूचें दु:ख विसरून गेले व ते आनंदानें उद्‌गारले, "तो दुष्ट अखेर ठार झाला! " तदनंतर अगदींच थोड्या दिवसांनीं जर्मनीचा पाडाव झाला.अनादिकालापासून अधूनमधून बुभु:कार करून उठणाऱ्या व अख्ख्या युरोपला सळो कीं पळो करून सोडणाऱ्या जर्मन हूणांचा पुन: एकदां बंदोबस्त झाला. विजयाची वार्ता जाहीर होतांच अवघें इंग्लंड चर्चिलच्या अधिकृत निवासस्थानीं १० डाउनिंग स्ट्रीटवर लोटलें. त्यांनीं त्या प्रचंड जमावाला अभिवादन केलें व ते मोटारींत बसून पार्लमेंटकडे निघाले. ती मिरवणुक मोठी प्रेक्षणीय होती. रणांगणावरून लढाई जिंकून राजधानींत विजयी प्रवेश करणाऱ्या पराक्रमी सेनापतिप्रमाणें चर्चिल पार्लमेंटकडे निघाले होते. मिरवणूक पार्लमेंट चौकांत पोहोंचण्याच्या आधींच चर्चिल आपल्या मोटारीच्या समोरच्या जागेवर उभे राहिले होते. नेहमींप्रमाणें आज त्यांनीं डोक्यावर आपली प्रसिद्ध टोपी

घातली नव्हती. ते लोक त्यांचा जयजयकार करीत होते आणि ते त्यांना हात हलवून हंसत विजयाच्या खुणा करीत होते. एके ठिकाणीं त्यांना आठवण झाली, कीं आपली सिगारांची पेटी मागें राहिली आहे. ते शरीररक्षक थॉम्सनना म्हणाले, "थॉम्सन ॲनेक्समध्यें जा आणि माझी एक सिगार घेऊन ये. त्यांना ती बघायची आहे."

कॉमन्सगृह चिक्कार भरलें होतें. मुंगी रिघायलाहि जागा नव्हती त्या प्रसंगीं कॉमन्समध्यें उपस्थित असलेल्या एका एम्. पी.नें लिहिलें आहे, "मी चर्चिलना सतत दहा वर्षेपर्यंत मागच्या बांकावर बसलेले पाहिलें आहे. त्या वेळीं त्यांचा पडता काळ होता. नंतर ते पंतप्रधानाच्या जागेवर बसले व त्यांनीं गंभीर नजरेनें राष्ट्राला सांगितलें कीं, निष्ठुर बातम्यांशिवाय आणखी कशाची अपेक्षा करूं नका.

"दोस्त फौजांच्या विजयाच्या बातम्या ते रंगांत येऊन मोठ्या उत्साहानें सांगत व लोकांना अधिक कष्ट करण्याचा उपदेश करीत. विजयाप्रमाणें पराभवाच्या बातम्याहि त्यांनीं राष्ट्रापासून लपवून ठेवल्या नाहींत. पण त्या बातम्या सांगतांना ते कधींहि खिन्न अथवा उदास होत नसत. मीं त्यांना चांगल्या आणि वाईट वेळींहि बघितलें आहे. आनंदी आणि चिडलेले, पण पण नेहमीं हजरजबाबी. त्यांच्यापाशीं अचूक शब्द नेहमीं तयार असत."

ज्या दिवशीं विजयानंतरची पार्लमेंटची पहिली बैठक झाली, त्या दिवशीं पंतप्रधान चर्चिल ह्यांचें प्रचंड स्वागत झालें. सभासदांनीं पार्लमेंटचे नियम विसरून जाऊन बाकांवर उभें राहून मोठमोठ्याने गिल्ला केला आणि कागद हलविले. चर्चिल आपल्या नेहमींच्या जागेवर उभे राहिले त्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रु वहात होते व ते नुसती मान हलवीत होते. विजयाची औपचारिक वार्ता पार्लमेंटला विदित करण्यासाठीं ते उभे होते.

पण पुढें दोन महिन्यांनीं २६ जुलैला पार्लमेंटच्या निवडणुका झाल्या. ब्रिटिश जनतेनें चर्चिलना पंतप्रधानपदावरून खालीं उतरविलें. ज्या जनतेनें विजयाचे दिवशीं त्यांचा प्रचंड जयजयकार केला त्याच जनतेनें त्यांनीं पंतप्रधानपद सोडावें असा कौल दिला. त्या निवडणुकांत मजूर पक्ष बहुमतानें निवडून आला. चर्चिलच्या मंत्रिमंडळांत लॉर्ड प्रिव्ही सील सारखें क्षुल्लक मंत्रीपद उपभोगणारे क्लेमंट ॲटली चर्चिलच्या जागीं इंग्लंडचे पंतप्रधान

झाले. खरोखर नियतीनें चर्चिलवर उगविलेला तो मोठाच सूड होता! कारण चर्चिलनीं ॲटली ह्यांचा नेहमींच पाणउतारा केला होता.

पण चर्चिलना पराभवाचें कांहींच वाटलें नाहीं. तसे पराभव त्यांनीं पूर्वी खाल्ले होते. ते एका लोकशाहीप्रधान राष्ट्रांत राहत होते, कीं जें राष्ट्र लोकशाहीचें माहेरघर म्हणून समजलें जात होतें. लोकशाही ही चंचल आहे हें चर्चिलना माहीत होतें. दुसरी गोष्ट, त्या पराभवाचें दुःख करण्यास चर्चिल आतां कांहीं पंचविशींत नव्हते. ते साठी ओलांडून वृद्धापकालांत प्रवेश करीत होते. त्यांची इंग्लंडचे पंतप्रधान होण्याची महत्त्वाकांक्षा फलद्रूप झाली होती. एक यशस्वी लेखक, हुशार नेता आणि फर्डा वक्ता म्हणूनहि त्यांनीं युरोप-अमेरिकेंत कीर्ति संपादन केली होती. त्यांचा संसार सुखी होता. घरांत मुलेंबाळें आणि प्रेमळ गृहिणी होती. त्याशिवाय त्यांना आणखी काय हवें होतें? तसें पाहिलें तर ते जगांतील सुखी गृहस्थ नव्हते का? पण तरीहि ते सार्वजनिक आणि राजकीय जीवनांतून निवृत्त झाले नाहींत. त्यांनीं पार्लमेंट-मध्यें विरोधी पक्षाचें नेतेपद स्वीकारलें.

मानपानाविषयीं चर्चिल उदासीन होते. असें सांगतात कीं, ड्यूक होतां का म्हणून त्यांना विचारण्यांत आलें होतें, पण त्यांनीं त्या गोष्टीस नकार दिला. ज्या डंडी मतदार संघांतून चर्चिल नेहमीं पार्लमेंटच्या निवडणुकीला उभे राहत, त्या मतदार संघानें त्यांना डंडी शहराचें स्वातंत्र्य बहाल करण्याचें ठरविलें होतें, पण त्यांनीं त्यास नकार दिला. तसेंच ऑक्सफर्ड विद्यापीठांतील विद्यार्थ्यांनीं त्यांना भाषण करण्यास पाचारण केलें असतां त्या पाचारणाकडे त्यांनीं दुर्लक्ष केलें. ह्याच विद्यार्थ्यांनीं युद्धापूर्वी "आम्ही आमच्या राष्ट्रा-साठीं लढणार नाहीं" असा सभा भरवून ठराव केला होता. त्यांच्याविषयीं बोलतांना चर्चिल उपहासानें म्हणाले होते, "ते लढणार नाहींत आणि त्यांना वल्हींहि पेलतां येत नाहींत."

निवडणुकांनंतर चर्चिल आपल्या पत्नीसह विश्रांतीसाठीं दक्षिण फ्रान्सला गेले. तेथें कॅनेडियन जनरल रेमॉंड ब्रुतिनेल ह्यांनीं त्यांना रहावयास एक किल्ला दिला. परंतु चर्चिल दांपत्याला खाण्यापिण्याच्या बाबतींत विशेष चैन करतां आली नाहीं. त्यांना तेथें निव्वळ लश्करी शिध्यावर रहावें लागलें. १९४६ सालीं ते अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले. अनेक विद्यापीठांनीं त्यांना मानाच्या

पदव्या अर्पण केल्या. मिसुरी येथील वेस्टमिनिस्टर कॉलेजांत बोलतांना त्यांनीं रशियाविरुद्ध पहिला बाँबगोळा टाकला. प्रे. ट्रूमन त्यांच्या शेजारीं व्यासपीठावर बसलेले होते. रशियाच्या आक्रमणाला शह देण्याकरितां इंग्लंड आणि अमेरिका ह्या दोन्ही राष्ट्रांनीं आपली मैत्री पक्की केली पाहिजे, असें ते म्हणाले. महायुद्धानंतर रशियाविरुद्ध केलेल्या त्या पहिल्याच भाषणानें जगांत मोठी खळबळ उडाली. रशिया गडबड करणार आहे हें चर्चिलनीं पॉट्सडॅम परिषदेच्या वेळींच ताडलें होतें. त्या भाषणामुळें चर्चिलवर पुष्कळ टीका झाली. पण ते म्हणाले, " मी जें काय बोलतों तें नेहमींच विचारपूर्वक बोलतों. आणि माझें भाकीत कधींच खोटें होत नाहीं."

अमेरिकेहून चर्चिल युरोपच्या प्रवासास गेले. स्वित्झर्लंडला त्यांची स्विस बँक कॉर्पोरेशनचे डायरेक्टर आल्फ्रेड ह्यांनीं जिनीवा सरोवराच्या कांठावर राहण्याची व्यवस्था केली. त्या गांवचा मेयर त्यांचा स्वखुशीनें आचारी बनला, तर त्याची पत्नी धोबीण बनली. मेयर त्यांना 'हीज हायनेस' म्हणून संबोधायचा तर ते त्याला 'युवर ऑनर' म्हणून संबोधायचे. या दौऱ्यावरून परतल्यावर चर्चिल लंडन शहरीं हाईडपार्क गेटवर एका छोटया घरांत रहावयास गेले. त्यांनीं सहा चिटणीस ठेवले, ते त्यांच्याबरोबर लंडन ते केंटमधील त्यांची इस्टेट चार्टवेल ह्यांच्या दरम्यान ये-जा करतात. त्यांची चार्टवेलची शेतवाडी युद्धानंतर करमाफ करण्यांत आली. पण चर्चिलच्या पश्चात ती 'राष्ट्रीय विश्वस्तां'कडे जाणार आहे. युद्धानंतर लंडन शहरांतील एका उत्साही हॉटेलवाल्यानें चर्चिलना चार्टवेलनजीक एक मोठी हवेली अर्पण केली. चर्चिलनीं त्याबद्दल त्या हॉटेलवाल्याचे आभार मानले व ती त्यांनीं जखमी सैनिकांची सेवा करणाऱ्या 'ब्रिटिश लिजन'ला देऊन टाकली.

चर्चिलचे सहा चिटणीस लेखनाचें काम करतात. चर्चिलना History of English speaking People हा ग्रंथ लिहिण्यास तीस वर्षें लागलीं. हा ग्रंथ साडेचार लक्ष शब्दांचा आहे. दुसऱ्या महायुद्धाचा इतिहास लिहिण्यासहि त्यांनीं लगेच सुरुवात केली. सगळे कागदपत्र त्यांच्या हाताशींच होते. त्यामुळें The Second World War चा The Gathering Storm हा पहिला खंड पुरा करण्यास त्यांना फार दिवस लागले नाहींत. हा खंड १९४८

सालच्या ऑक्टोबर महिन्यांत प्रकाशित झाला. महायुद्धानंतर चर्चिल ह्यांच्या हातून लिहिला गेलेला दुसऱ्या महायुद्धाचा इतिहास म्हणून त्याचा बोलबाला झाला आणि अल्पावधींतच 'बेस्ट सेलर' होण्याचें भाग्य ह्या खंडाला मिळालें. तिसरा खंड १९५० सालच्या उन्हाळ्यांत प्रकाशित झाला. असें सांगतात कीं, पहिल्या खंडाच्या २०५००० प्रती कांहीं तासांच्या आंतच खपल्या. हा विक्रम खरोखरच मोठा म्हटला पाहिजे. कारण एखाद्या कादंबरीच्या नशिबांत देखील पहिल्या दिवशीं इतक्या प्रती खपण्याचें भाग्य नसतें, मग इतिहास सोडाच ! त्या खंडाच्या लक्षावधि प्रति खपल्या असून जगांतील अनेक प्रमुख भाषांत त्याचीं भाषांतरें झालीं आहेत. Their Finest Hour ह्या खंडाच्या २७६००० प्रति पहिल्याच दिवशीं खपल्या.

१९५० सालीं पार्लमेंट बरखास्त होऊन नवीन निवडणुकांचे नगारे वाजले. चर्चिल हुजूर पक्षातर्फे निवडणुकीला पुन: उभे राहिले. ही त्यांची अठरावी निवडणूक आणि सर्वसामान्य तेरावी होती. वयाच्या पंचाहत्तराव्या वर्षी ते विरोधी पक्षांतील सर्वांत वृद्ध उमेदवार होते. ह्या निवडणुकांत मजूर पक्ष अल्प बहुमतानें विजयी झाला. ह्या अल्प बहुमतांत मजूर पक्षाला सरकार चालविणें अशक्य झाल्यानें १९५१ सालच्या आक्टोबर महिन्यांत मजूर सरकारनें पार्लमेंट बरखास्त करून सार्वत्रिक निवडणुका जाहीर केल्या.

******

■ ■ ■ ■ ■ ■ ■

प्रकरण सोळावें

# निवृत्ति

दि. १६ आक्टोबर १९५१ रोजीं चर्चिल राजेसाहेबांकडून मंत्रिमंडळ बनविण्याची आज्ञा घेण्यासाठीं बकिंगहॅम राजवाडयांत गेले. त्या वर्षीच्या निवडणुकांत हुजूर पक्षाला पार्लमेंटमध्यें मताधिक्य प्राप्त झालें असल्यानें, हुजूर पक्षीय सरकार अधिकारावर येणें अपरिहार्य होतें. अशा रीतीनें चर्चिल इंग्लंडचे दुसऱ्यांदा पंतप्रधान झाले. परंतु निवडणुकांमध्यें त्यांची अपेक्षा पूर्णांशानें फलद्रूप झाली नव्हती. त्यांच्या पक्षाला पार्लमेंटमध्यें मिळालेलें बहुमत अगदींच कमी होतें. त्यामुळें त्यांना राज्यकारभार आपल्या मनाप्रमाणें हांकणें अशक्यच झालें. मजूर पक्षीय सभासदांकडून त्यांच्या राज्यकारभारावर आणि धोरणावर वारंवार टीका होऊं लागली. त्या स्थितींत त्यांनीं कसेंबसें वर्ष दीड वर्ष रेटलें. पण १९५२ सालच्या उन्हाळयांत आर्थिक पेचप्रसंग उद्‌भवल्या-मुळें आपल्या राज्यकारभाराला राष्ट्राची मंजुरी आहे कीं नाहीं तें बघण्याची आवश्यकता त्यांना भासली व त्यांनीं फेरनिवडणुका जाहीर केल्या. मजूर पक्षाच्या राजवटींत जेव्हां असाच आर्थिक पेंचप्रसंग निर्माण झाला होता, तेव्हां त्यांनीं देखील जनतेचा कौल घेतला होता.

१९५२ च्या फेरनिवडणुकांत १,३७६ उमेदवारांनीं निवडणुका लढविल्या. त्यांतील ६१७ मजूर पक्षीय उमेदवार होते. तितकेच टोरी आणि टोरी-पुरस्कृत उदारमतवादी उमेदवार होते. मतदानास दि. २५ आक्टोबरला सुरुवात झाली व एक दोन दिवसांत निकाल जाहीर झाले. टोरी पक्षाचा ह्या फेरनिवडणुकांत विजय झाला. त्यांचे मजूरपक्षापेक्षां वीस उमेदवार अधिक निवडून आले.पण मतें मात्र मजुरांना टोरीपेक्षां अधिक पडलीं.टोरींना ४७·९८ टक्के पडलीं, तर मजुरांना ४८·७७ टक्के. तरीहि पार्लमेंटमध्यें

टोरी बहुसंख्य असल्यानें, मंत्रिमंडळ त्यांचेंच आलें. ह्या मंत्रिमंडळांत वऱ्याच जुन्या टोरींना मंत्रिपदें मिळालीं. त्यांत अँथनी ईडन हे एक होते. त्यांच्याकडे परराष्ट्र खातें देण्यांत आलें. चर्चिलनीं आपल्याकडे संरक्षण खात्याशिवाय आणखी तीन खातीं ठेवलीं. ह्या वेळीं टोरी मंत्र्यांनीं आपल्या पगारांत राष्ट्रीय बचत म्हणून बरीच कपात केली. पंतप्रधानांचा वार्षिक पगार १० हजार पौंड होता, तो त्यांनीं ७ हजारांवर आणला. इतर मंत्र्यांचेहि पगार कमी करण्यांत आले.

नवीन पार्लमेंट नवंबर महिन्यांत उघडलें. चर्चिलनीं मंत्रिमंडळाची जबाबदारी पत्करतांना जें भाषण केलें, तें त्यांच्या वक्तृत्वकलेला साजेसेंच होतें. त्या वर्षाअखेर त्यांनीं अमेरिकेची वारी केली. त्यांना ह्या वेळीं ‘ सोसायटी ऑफ सिन्सिनाती ’ ह्या संस्थेनें आपला सभासद करून घेतलें. हा मान अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धांत ज्या लश्करी अधिकाऱ्यांनीं जॉर्ज वॉशिंग्टन ह्यांच्या नेतृत्वाखालीं काम केलें होतें त्यांच्याच वंशजांना तेवढा मिळतो. चर्चिलना तो त्यांच्या आईच्या घराण्याच्या वतीनें मिळाला. त्यांच्या आईचा पणजोबा त्या युद्धांत जॉर्ज वॉशिंग्टनच्या नेतृत्वाखालीं लढला होता.

चर्चिल ह्यांनीं अमेरिकन काँग्रेससमोर भाषण करून इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या ऐक्यावर भर दिला. त्या वारींत त्यांनीं इंग्लंडला बरीच आर्थिक मदत आणि पोलादाचा पुरवठा आणला. मजूर पक्षीय सभासद अर्थात् त्यांच्या अमेरिकेच्या आर्जवांवर टीका केल्याशिवाय राहिले नाहींत. १९५३ सालीं दोन मोठ्या जागतिक घटना घडल्या. रशियाचा हुकूमशहा स्टालिनचा मृत्यु आणि जनरल आयसेनहॉवर ह्यांची अमेरिकेच्या अध्यक्षपदीं झालेली निवड. पैकीं जनरल आयसेनहॉवर ह्यांच्या अध्यक्षपदामुळें पश्चिम युरोप आणि अमेरिका ह्यांच्या राजकीय संबंधांवर कांहीं अनिष्ट परिणाम होण्याची शक्यता नव्हती. मात्र रशियामध्यें येणारी नवीन राजवट स्टालिनपेक्षां अधिक पश्चिम विरोधक असण्याची भीति होती. आणि शेवटीं झालेंहि पण तसेंच. पंतप्रधान मालेन्कॉव ह्यानें स्टालिनचा राजकीय वारसा पुढें चालविण्यास सुरुवात केली.

१९५३ सालच्या मे महिन्यांत राणी एलिझाबेथ हिचा राज्यारोहण समारंभ झाला. त्या वर्षीच्या फेब्रुवारींत राजे सहावे जॉर्ज ह्यांचें देहावसान झाल्यानें त्यांची थोरली कन्या गादीवर आली होती. राज्यारोहणाच्या सोहळ्यास राष्ट्रकुलांतील सर्व देशांचे पंतप्रधान जमले होते राज्यारोहणा-नंतरच्या पहिल्या आठवड्यांत राष्ट्रकुलांतील देशांच्या पंतप्रधानांची परिषद झाली. तिचें अध्यक्षस्थान चर्चिल ह्यांनीं स्वीकारलें होतें. परिषदेच्या एकूण आठ पूर्ण बैठकी झाल्या. त्या सगळ्यांना चर्चिल उपस्थित होते. आधींच राज्यारोहण समारंभाच्या तयारींत त्यांच्या प्रकृतीवर ताण पडला होता, त्यांत ह्या परिषदेची भर पडली. त्याचा अनिष्ट परिणाम त्यांच्या प्रकृतीवर होऊन ते आजारी पडले. त्यांच्या डॉक्टरांनीं त्यांना एक महिन्याची विश्रांति घेण्याचा सल्ला दिला. त्यांच्या शरीराच्या डाव्या बाजूस अर्धांगवायूचा किंचित झटका बसला होता. त्यांचें वय आतां एकोणऐंशीं वर्षांचें होतें, म्हणून लोकांना त्यांच्या प्रकृतीची काळजी वाटणें साहजिकच होतें. पहिल्या झटक्यानंतर दुसरा आणि कदाचित तिसराहि झटका येण्याची भीति होती.

पण त्या आजारांतून ते बरे झाले व पंतप्रधान म्हणून त्यांनीं काम करण्यास पुन: सुरुवात केली. परंतु त्यांच्या अंगांत आतां पूर्वीची ताकद नसल्यानें पंतप्रधानकीचें काम त्यांना झेपण्यासारखें नव्हतें. तें काम आणखी कुणाकडे तरी देण्याची आवश्यकता निर्माण झाली होती. आणि तसें झाल्यास अँथनी ईडन हे त्यांचे वारसदार म्हणून ठरले गेले होते. सतत वीस वर्षांपासून त्या दोघांचा घरोबा होता त्यांत पुन: ईडननीं चर्चिलच्या पुतणीशीं विवाह केल्यानें त्या संबंधांना नात्याचें स्वरूप प्राप्त झालें होतें. ईडनच्या सल्ल्याशिवाय चर्चिल कोणताच राजकीय निर्णय घेत नसत. पण चर्चिल आजारी पडले तेव्हां पंतप्रधानकीची धुरा वाहण्यास ईडन इंग्लंडमध्यें नव्हते. ते एका मोठ्या आजारांतून उठले होते व विश्रांतिसाठीं परदेशांत गेले होते. त्यांच्या-शिवाय पंतप्रधानकीचीं सूत्रें आणखी कुणाच्या हातीं सुपूर्त करणें चर्चिलना इष्ट वाटलें नाहीं, त्या दरम्यान इकडे युरोपमधील राजकीय वातावरण बिघडलें गेल्यानें चर्चिलना युरोपांत १ लक्ष सैन्य ठेवण्याचा निर्णय घ्यावा लागला. तो निर्णय त्यांना फ्रान्सच्या भीतीचें निवारण करण्यासाठीं घ्यावा लागला होता.

इंग्लंडच्या इतिहासांत आतांपर्यंत युरोपांत सैन्य ठेवण्यांत आलें नव्हतें. त्या दृष्टीनें बघितलें असतां इंग्लंडच्या परंपरागत धोरणांत झालेला तो प्रचंड बदल होता. प्रे. आयसेनहॉवर ह्यांनीं त्या निर्णयाचें 'आमच्या कालांतील सर्वांत मोठें राजकीय महत्कृत्य' म्हणून स्वागत केलें. पण त्या महान् घटनेचें श्रेय चर्चिलनीं आपणांकडे न घेतां आपले परराष्ट्रमंत्री अँथनी ईडन ह्यांना दिलें.

१९५४ सालच्या नोव्हेंबर महिन्यांत चर्चिलना ऐंशीवें वर्ष लागलें. त्यांचा वाढदिवस मोठ्या थाटांत साजरा झाला. जगामध्यें असा वाढदिवस समारंभ आतांपर्यंत दुसऱ्या कुठल्याच व्यक्तीचा झालेला नसेल! राणी व्हिक्टोरिया हिला तिच्या महोत्सवांमध्यें जी आदरांजलि वाहण्यांत आली, त्यांची कदाचित् चर्चिलच्या ऐंशीव्या वाढदिवससमारंभाशीं तुलना करतां येईल. ह्या समारंभांत सारें इंग्लंड सामील झालें होतें. त्या प्रसंगीं सर्व राजकीय पक्ष आपला विरोध विसरून गेले होते. जगाच्या सर्व कोनाकोपऱ्यांतून चर्चिलवर अभिनंदनाचा पाऊस पडला.

ज्या दिवाणखान्यांत सतत दहा शतकेंपर्यंत इतिहासाचीं आवर्तनें झालीं, त्या वेस्टमिन्स्टर हॉलमध्यें तो इतिहासप्रसिद्ध वाढदिवस समारंभ साजरा झाला. इंग्लंडमधील सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांनीं आणि सदस्यांनीं चर्चिलना आदरांजलि वाहिली. चर्चिलचे विरोधक क्लेमंट अॅटली ह्यांनीं "सर्वोच्च उंचीला हात पोहोचविणारा शेवटचा मोठा वक्ता" म्हणून चर्चिल ह्यांचा गौरव केला. ते चर्चिलचें अभिनदन करतांना म्हणाले : "मी सीझरला मूठमाती देण्यासाठीं आलेलों नाहीं, तर त्याचीं स्तोत्रें गाण्यासाठीं आलेलों आहें. तुम्ही खरोखर सीझर आहांत ह्यांत शंका नाहीं. कारण, ज्या महायुद्धाचा इतिहास तुम्हीं घडविला, त्याच्यावर तुम्ही सीझरप्रमाणें भाष्य लिहून देखील मोकळे झालांत."

१९५५ साल उजाडलें तरी देखील चर्चिल अधिकारावर होते. त्यांच्या हातून इंग्लंडची सेवा अजूनहि व्हायची होती. अमेरिकेंत हायड्रोजन बॉंब तयार झाल्याची बातमी त्यांना कळली. तो बॉंब हिरोशिमावर टाकलेल्या अणुबॉंबपेक्षां ६०० ते ७०० पटींनीं प्रभावी होता.

१९५५ सालच्या फेब्रुवारींत ब्रिटिश सरकारनें हायड्रोजन बॉंब बनविण्याचा संकल्प जाहीर केला. ती कल्पना चर्चिल ह्यांचीं होती यांत शंका नाहीं. शांततेच्या काळांत देखील त्यांना इंग्लंड सामर्थ्यवान हवें होतें. अमेरिकेनें एच्. बॉंब बनविला होता आणि रशियाहि तो बनविण्याच्या मार्गावर होता. अशा परिस्थितीत इंग्लंड मागें राहणें इष्ट नव्हतें. मजूर पक्षीय विरोधकांनी विशेषें करून बेव्हन ह्यांनीं चर्चिलवर ह्या बाबतींत टीका करण्यास कमी केलें नाहीं. परंतु हजरजबाबी चर्चिल वादविवादांत आपल्या विरोधकांना पुरून उरले होते.

पण, मार्च महिन्यांतील एका शनिवारीं ब्रिटिश लोक सकाळचीं वर्तमानपत्रें उघडून बघतात तर चर्चिल महामंत्र्यांचीं वस्त्रें खालीं ठेवणार असल्याची वार्ता त्यांना वाचावयास मिळाली! त्यांचे जागीं परराष्ट्रमंत्री ईडन हे पंतप्रधान होणार होते. दि. ३१ मार्च हा ह्यांच्या आयुष्यांतील पंतप्रधानकीचा शेवटचा दिवस होता. त्या दिवशीं त्यांनीं पंतप्रधान ह्या नात्यानें पृच्छकांच्या प्रश्नांना उत्तरें दिलीं. ते म्हणाले, " मला असें वाटतें कीं, युरोप आणि उत्तर अमेरिका जितकीं निकटवर्ती येतील तितकें चांगलें." दि. ४ एप्रिलला १० डाउनिंग स्ट्रीटवर मोठी गडबड उडाली. पंतप्रधान पदावरून खालीं उतरतांना चर्चिल ह्यांनीं जो खाना दिला त्याला इंग्लंडची राणी एलिझाबेथ उपस्थित होती. ह्या मेजवानीला प्रमुख मंत्री आणि मोठमोठे लोक उपस्थित होते. पंतप्रधानांच्या निवासस्थानाबाहेर प्रचंड जनसमुदाय जमलेला होता. चर्चिल निवृत्त होत असलेले पाहून इंग्लंड गहिंवरून आलें होतें.

दि. ५ एप्रिलला सर्व औपचारिक बाबी पार पडल्या. दुपारीं भोजनापूर्वी चर्चिलनीं आपल्या सहकाऱ्यांचा निरोप घेतला. नंतर बकिंगहॅम राजवाड्यांत जाऊन त्यांनीं राणीसाहेबांना आपला राजिनामा सादर केला.

दि. ६ ला सर अॅंथनी ईडननीं पंतप्रधानपद स्वीकारलें. चर्चिलनीं चहापान आटोपल्यावर १० डाउनिंग स्ट्रीट वरील पंतप्रधानाचें अधिकृत निवासस्थान खालीं केले. बाहेर जमलेल्या लोकसमुदायाला चर्चिलनीं विजयाची खूण केली व मोटारींत बसून ते केंटकडे निघाले.

******

परिशिष्ट

# चर्चिलचीं संस्मरणीय भाषणें

■ ■ ■ ■ ■ ■ ■ ■

डंकर्कच्या माघारीच्या वेळीं चर्चिलनीं केलेलें भाषण :

" मी परवांचे दिवशीं आपणांला एका प्रचंड लश्करी पराभवाची हकीकत सांगितली. फ्रेंचांना माहीत होतें कीं त्यांची फळी सेदां येथें आणि म्यॅज नदीवर फुटली आहे. परंतु ही गोष्ट माहीत असूनदेखील त्यांनीं बेल्जियममधील आपलें उत्तरेकडील सैन्य मागें घेतलें नाहीं. ह्या चालढकलीचा परिणाम असा झाला कीं, फ्रेंच हायकमांडला पंधरा लश्करी तुकडयांना मुकावें लागलें व फ्रान्समध्यें लढणारें सबंध ब्रिटिश सैन्य निष्क्रिय बनलें. आमच्या आरमारानें डंकर्क येथून ब्रिटिश सैन्य आणि १२०००० फ्रेंच सैन्य इंग्लंडला आणलें. परंतु ह्या सैन्याला त्याचा सबंध दारूगोळा आणि हत्यारें माघारी टाकून यावें लागलें. ही हानि भरून काढण्यास पुष्कळ दिवस लागणार आहेत. फ्रेंच सैन्यानें शत्रूला चांगलाच प्रतिकार केला. त्यानें शत्रूची प्रचंड हानि केली. परंतु हें जरी खरें असलें, तरी फ्रान्सला अत्याधुनिक आणि सुसज्ज अशा पंचवीस लश्करी तुकडयांना मुकावें लागल्यानें त्यांची कधीं न भरून निघणारी अशी हानि झाली. हें पंचवीस तुकडयांचें सैन्य जर लढत राहूं शकलें असतें, तर आज युद्धाचा रागरंग वेगळाच दिसला असता. अवघ्या तीन ब्रिटिश तुकडया फ्रेंचांबरोबर लढत राहूं शकल्या. त्यांची हानी पुष्कळ झाली परंतु त्यांनीं चांगलीच मर्दुमकी गाजविली.

मी हें पराभवाचें रडगाणें गात आहें हें मला माहीत आहे. त्याचा परिणामहि विपरीत होण्याचा संभव आहे. आम्ही पराभवाचें सिंहावलोकन करणें इष्ट नाहीं. पण वस्तुस्थिति आपणांसमोर मांडली पाहिजे. आम्हांला गतकालाचा विचार करण्यास सवड नाहीं. आम्ही आतां भविष्यकालाचा विचार केला पाहिजे. सभागृहांतील कांहीं सदस्य माझ्या पूर्वीच्या

राज्यकर्त्यांवर भयंकर क्रोधाविष्ट झाले आहेत. आमच्या फ्रान्समधील लष्करी पराभवाला ते कारभारी जबाबदार आहेत असा त्यांचा त्यांच्यावर उघड आरोप आहे. परंतु माझें असें मत आहे कीं, हा आरोप निरर्थक तर आहेच; परंतु धोक्याचाहि आहे. कारण आम्ही जर भूतकाल आणि वर्तमानकाल त्यांच्यामध्यें भांडण लावून बसलों, तर आम्ही भविष्यकालास मुकूं अशी मला भीति वाटते. म्हणून मी सांप्रतचें सरकार आणि मागील सरकार ह्या दोघांमध्यें भेद करूं शकत नाहीं. हें सरकार आणीबाणीच्या परिस्थितींत स्थापन झालें असल्यानें आमच्यामध्यें एकोपा निर्माण करणें हें त्याचें प्रधान कार्य आहे. त्या सरकारला दोन्हीहि सभागृहांचा एकमतानें पाठिंबा मिळाला आहे. आम्ही ह्या देशाचा राज्यकारभार हाकून युद्ध चालू ठेवणार आहोंत. मला आपणांस विनंति करावयाची आहे कीं, जो मंत्री आपलें दैनंदिन कार्य करील त्याच्याविषयीं लोकांनीं मनांत आदर बाळगला पाहिजे. आणि ह्या मंत्र्याच्या हाताखालीं काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनींहि त्याच्याकडे आदरानें पाहिलें पाहिजे. त्याशिवाय आमचें ध्येय आम्हांला साध्य करतां येणार नाहीं. कारण सामर्थ्याचें आणि शक्तीचें केंद्रीकरण झाल्याखेरीज आमची महान कामगिरी आम्ही पार पाडूं शकणार नाहीं.

आमचा शत्रु मोठा आहे ह्याची मला जाणीव आहें, परंतु मला आशा आहे कीं, माझे देशबांधव ह्या शत्रूला तोंड देण्याची धमक आमच्यामध्यें आहे हें जगाला दाखवून दिल्यावांचून राहाणार नाहींत. प्रत्येक स्त्रीला व प्रत्येक पुरुषाला आपल्या वंशाचे सर्वोत्कृष्ट गुण दाखविण्याची संधि आतां लाभणार आहे. मी आपणांला छातीठोकपणें सांगतों कीं ह्या युद्धांत जय आपलाच होणार आहे.

५

गेल्या महायुद्धांत सुरुवातीच्या चार वर्षांत दोस्तांच्या वांट्याला एकामागून एक असे पराभव आले. आम्हांला पराभव आणि भीति ह्यां-शिवाय दुसरें कांहीं माहीत नव्हतें. शत्रु आमच्यावर एकामागून एक असे टोले हाणीत होता. आमची हानी भयंकर होत होती, पदोपदीं आम्हांला संकटांना तोंड द्यावें लागत होतें. आमची प्रत्येक गोष्ट अयशस्वी होत

होती. परंतु ह्या चार वर्षांत आमचें नैतिक धैर्य जर्मनांच्या पेक्षां मोठें होतें, त्यांना विजयामागून विजय मिळत होते, परंतु तरीहि त्यांचें नैतिक धैर्य दिवसेंदिवस खचत चाललें होतें. त्या चार वर्षांत आम्हीं एकमेकांना प्रश्न करायचे. आम्हीं हें युद्ध कसें जिंकणार? पण ह्या प्रश्नाचें उत्तर कुणीहि देऊं शकत नव्हता. शेवटीं आमच्या ध्यानीं मनीं नसतांना आमचा भयंकर शत्रु आमच्यासमोर आकस्मितपणें कोसळून पडला.

फ्रान्सचें काय होणार आहे, फ्रेंच प्रतिकार चालू राहाणार आहे कीं, काय तें मला माहीत नाहीं. परंतु दोस्तीच्या कराराप्रमाणें फ्रेंचांनीं प्रतिकार चालू ठेवला पाहिजे. फ्रेंच लोकांनीं दाखविलेलें धैर्य असीम आहे. त्यांचें आम्हीं अनुकरण केलें पाहिजे. आणि आमच्या दीर्घ प्रयत्नांना जर विजयाचें फळ आलें, तर त्याचा वांटा सगळ्यांनाच लाभणार आहे. सगळ्यांचें स्वातंत्र्य पुनरपि प्रस्थापित होणार आहे. फ्रान्सची लढाई संपली आहे आणि ब्रिटनच्या लढाईस सुरुवात झाली आहे. ह्या लढाईच्या यशापयशावर ख्रिश्चन संस्कृतीचें भवितव्य अवलंबून आहे. ह्या लढाईवर आमचें जीवन, आमचें प्रदीर्घ सातत्य, आमच्या संस्था आणि आमचें साम्राज्य ह्यांचेंहि भवितव्य अवलंबून आहे. शत्रूचा मोहरा आतां आमच्याकडे वळणार आहे. त्याच्या विषास आतां आम्हांस तोंड द्यावें लागणार आहे. हिटलरला आतां कळून चुकलें आहे कीं, आमच्या बेटाचा नाश केल्याशिवाय त्याला हें युद्ध जिंकतां येणार नाहीं. आम्हीं जर त्याला तोंड दिलें, तर संबंध युरोपचा उद्धार होणार आहे. आणि संबंध जगाला स्वातंत्र्याचा प्रकाश दिसणार आहे. पण आमचा जर पराभव झाला तर संबंध जग, अमेरिकादेखील एका नवीन अंधार-युगांत (Dark Age) खितपत पडणार आहे. तेव्हां जगावर अशी भयानक आपत्ति येऊं नये म्हणून आम्ही आमच्या कर्तव्याला जागूं या.

■ ■ ■

**दि. ८ मे १९४५ रोजीं जर्मनीनें शरणागती पत्करली त्या वेळीं केलेलें भाषण :**

"काल पहांटेस २ वाजून ४१ मिनिटांनीं जनरल गोडल व दर्यासारंग डॉएनिट्झ् ह्या दोघांनीं जर्मन राष्ट्राच्या वतीनें बिनशर्त शरणागतीवर

सह्या केल्या. ह्या शरणागतीच्या कराराप्रमाणें आज मध्यरात्रीपासून युद्ध-बंदी अंमलांत येणार आहे. जर्मन युद्ध आतां संपुष्टांत आलें आहे. १९३९ च्या सप्टेंबर महिन्यांत जर्मनीनें मोठ्या तयारीनें पोलंडवर स्वारी केली. पोलंडशीं आमचा परस्पर सहाय्याचा करार झालेला होता. त्या कराराप्रमाणें आम्ही पोलंडच्या स्वातंत्र्यासाठीं जर्मनीशीं युद्ध पुकारलें. फ्रान्सनें जर्मन फौजांचा निधड्या छातीनें प्रतिकार केला. परंतु त्याचा पराभव झाल्यावर सतत एक वर्षपर्यंत आम्हांला हें युद्ध जर्मनीशीं एकट्यानेंच लढावें लागलें. एक वर्षानें आम्हांला रशियाची दोस्ती लाभली, पुढें अमेरिका आपल्या अमर्याद साधनांसह आणि सामर्थ्यासह ह्या युद्धांत पडली. शेवटीं सबंध जगच आमच्यासमोर शरणागति पत्करणाऱ्या ह्या दुष्ट शक्तीविरुद्ध उभें ठाकलें. एक शत्रु बाद झाला आहे पण दुसरा—जपान — अजून लढत आहे. आतां आम्ही आमचें सारें सामर्थ्य ह्या शत्रूच्या निर्मूलनावर केंद्रित केलें पाहिजे.

■ ■ ■

जपानच्या शरणागतीनंतर दि.१६ मे १९४५ रोजीं केलेलें भाषण :

" जपानचा पराभव झाला आहे व जगांत सर्वत्र शांतता प्रस्थापित झाली आहे. एकाच महिन्यामागें अतिपूर्वेकडील रक्तरंजित युद्ध चालू ठेवण्यासाठीं आम्हांला प्रचंड तयारी करण्याचा निर्णय घ्यावा लागला होता.

दि. १७ जुलैला पॉट्सडॅम परिषद चालू असतां मेक्सिकोच्या वाळवंटांत अणु बाँबचा स्फोट यशस्वी झाल्याची आनंदाची बातमी आली. त्या बातमीची वाट आम्ही मोठ्या उत्कंठेनें पाहात होतों. तदनंतर कांहीं दिवसांनीं मेक्सिकोच्या वाळवंटांत झालेल्या स्फोटाचा तपशील आमच्या हातांत पडला. हा अहवाल मिळाल्यावर आमची सर्वांची पूर्ण खात्री झाली कीं, मानवी जीवनांत आतां एका नवीन शक्तीचा जन्म झाला आहे. जपानवर अणुबाँब टाकण्याचा निर्णय जरी प्रे. ट्रूमन ह्यांनीं घेतला असला तरी त्यांनीं आमचा ह्या बाबतींत सल्ला घेतला होता. आणि अँग्लोअमेरिकन करारान्वयें त्यांनीं आमचा सल्ला घेणें हें त्यांचें कर्तव्य होतें. अमेरिकेनें

आमचा सल्ला घेतल्यावर पॉट्स्डॅम येथेंच मीं जपानवर अणूबाँब टाकण्याच्या अमेरिकेच्या योजनेला संमति देऊन टाकली. प्रे. ट्रूमन ह्यांनीं मार्शल स्टालिन ह्यांनाहि जपानवर एक अत्यंत प्रभावी असा बाँब टाकण्यांत येणार असल्याचें कळविलें होतें. हा अणुबाँब टाकल्यानें जपानशीं चालू असलेलें युद्ध अखेर समाप्त झालें.

परंतु अणुबाँबचा उपयोग करण्यापूर्वीं जपानला एक आणीबाणीचा खलिता पाठविणें आवश्यक होतें. हा खलिता दि. २६ जुलैला जाहीर करण्यांत आला. जपाननें शरणागति पत्करल्यावर त्याला जें अभय देण्यांत आलें तें फारच उदार आहे असें म्हटलें पाहिजे. कारण, जपाननें जी दगलबाजी केली, त्या दगलबाजीप्रमाणें त्या औदार्यास तें पात्र नाहीं.

कांहीं जणांचें असें म्हणणें आहे कीं, जपानवर अणुबाँब टाकायला नको होता. पण ही विचारसणी मला मान्य नाहीं. कारण, आमची पूर्ण खात्री झाली आहे कीं, ह्या सहा वर्षांच्या युद्धांत जपान किंवा जर्मनीला दोघांना जर अणुबाँबसारखें एकादें प्रभावी अस्त्र सांपडलें असतें तर त्याचा त्यांनीं आमच्यावर बेधडकपणें उपयोग करून आमचा नाश करण्यास कमी केलें नसतें. हा बाँब जर जपानवर टाकण्यांत आला नसता तर जपानवर स्वारी करण्याकरतां आम्हांला दहा लक्ष अमेरिकन आणि अडीच लक्ष ब्रिटिश सैन्याचा बळी द्यावा लागला असता.

अणुबाँबनें जगांत शांतता प्रस्थापित केली. परंतु ह्या शांततेचें पालन फक्त माणसांनींच करायचें आहे. आणि मानवतेच्या आणि मानवी संस्कृतीच्या रक्षणासाठीं त्यांनीं ह्या शांततेचें रक्षण केलें पाहिजे. अणूबाँबच्या शोधाचें गुपित फुटलें जाऊं नये व इतर राष्ट्रांना तें कळूं नये असें प्रे. ट्रुमन ह्यांचें मत आहे. त्यांचें हें मत मला पूर्णपणें मान्य आहे. कारण जगाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें हा गोप्याचा स्फोट होणें इष्ट नाहीं."

******

97539

REFBK 0012431
REFBK-0012431